ग्रं. सं. टाणें
निबंध
सं. क्र. 2092

# तुकारामाची रांडापोरे



REFBK-0021681

५४५५८
१२।३।८१
निबंध

२०१२

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ५४५५८ वि. निबंध
क्रमांक २०१२ नों. दि. १२।३।८१

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
समृद्धी योजना
१९७०

२१६८१
निबंध
वि.क्र.
२०१२

# तुकारामाची रांडापोरे

( संतविषयक लेखांचा संग्रह )

लेखक

भाऊ मांडवकर

२०१२ निबंध
वि. क्र. २१६८१

REFBK-0021681

सेवा प्रकाशन, अमरावती - २.

मूल्य तीन रुपये

सेवा प्रकाशन : क्रमांक २५

लेखक : भाऊ मांडवकर

प्रकाशिका : सौ. सिंधू मांडवकर
सेवा प्रकाशन,
अमरावती २ (महाराष्ट्र)

सर्वाधिकार : सुरक्षित

प्रथमावृत्ती : १५ मे १९६८

मुद्रक : व. म. गुप्ते
व्यवस्थापक–
वि. गो. जोशी
सुभाष मुद्रणालय, तपोवन–अमरावती

मूल्य–तीन रुपये

वंदनीय राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज

**यांना**

सादर समर्पण

# पार्श्वभूमी

अगदी लहानपणी एकादशीनिमित्त होणाऱ्या जागृती-भजनांत जाऊन रमण्याचा मला नाद होता. श्री जंगली महाराज आमच्या गावात आले असता त्यांच्या कीर्तनात आईवडिलांनी नेल्याचे पुसटसे स्मरते. त्यांचे छायाचित्र आमच्या पडक्या घरात कित्येक दिवस टांगलेले होते. ही घटना १९३८ पूर्वीची आहे. इ. स. १९३९ किंवा १९४१ साली श्री गाडगे महाराजांचे कीर्तन आमच्या गावी झाले. ते मी आवडीने ऐकले. त्यापूर्वी व त्यानंतर आमच्या गावी गाडगे महाराजांचे शिष्य किसन महाराज खर्डेकर त्यांची रसाळ कीर्तने झाली. त्यांचाही परिणाम मनावर झाला. त्यावेळी मी फार तर प्राथमिक शाळेत शिकत असेन. मराठी तिसरीत शिकत असताना तुकारामाचा प्रचंड गाथा ग्राम-वाचनालयातून वाचायला मागितला असता त्यावेळचे विद्यार्थी-ग्रंथपाल श्री. चिंतामण हेटे मला हसले होते. तो गाथा मी (कै.) मोतीराम अमृतकर यांच्या मध्यस्थीने मिळविला व कित्येक अभंग पाठ केले. ते मी भजनांतून म्हटले. (कै.) अढाल यांनी आम्हाला टाळ वाजवायला शिकविले. चुकले असता सावरले. कळंबला शिकत असतानाच महारपुऱ्यात गाडगे महाराजांच्या पद्धतीने मी कीर्तने केली व ती ऐकण्यास मला सत्श्रोते मिळाले. १९४२ च्या दरम्यान गाडगेबाबांच्या शिष्यांबरोबर पळून जाण्याचाही मी विचार केला होता. त्याच दरम्यान श्री चिंधे महाराजांचे खंजिरी भजन ऐकले. त्यामुळेच पुढे त्यांच्या भजनांचा अभ्यास करण्याची इच्छा झाली. या पुस्तकातील 'श्री चिंधे महाराजांची काव्यसाधना' या लेखाचे मूळ त्यात आहे. १९४५ साली राळेगाव येथे श्री तुकडोजी महाराजांनी चातुर्मास घेतला. त्याच वेळी त्यांचा परिचय झाला. त्यापूर्वी विश्वशांतिसप्ताहाच्या निमित्ताने १९४२ च्या क्रांतीपूर्वी संत तुकडोजींनी भारतभर दौरा केला होता. यवतमाळलाही ते आले होते. त्यावेळी

गावातील तरुणांबरोबर मी पायी गेलो होतो.पण चालण्यामुळे इतका थकलो होतो की 'मंगलमय नाम तुझे' हे भजन सुरू होताच मी झोपलो व 'बना रहे दरबार' या शेवटच्या भजनाला जागा झालो नंतर पैदल गावी आलो.१९४५ साली सेवामंडळात काम करण्याचा योग येऊन नंतर तुकडोजींच्या वाङ्-मयाचा, कार्याचा व जीवनाचा परिचय झाला. १९४६ सालानंतर काही महिने नागपूरला राहून शिक्षण घेण्यासाठी मला त्यांनी आर्थिक मदत दिली. एकीकडे वारकरी भजने व कीर्तने यांची आवड लहानपणी तुकाराम व गाडगेबाबा यांच्यामुळे निर्माण झाली व काही अभंगही तिसरीत शिकताना रचले; तर दुसरीकडे तुकडोजींमुळे मनावर संतसाहित्याचा सामाजिक ठसा उमटला. आडकुजी महाराज, आर्वीच्या संत मायबाई हे लेख त्या वातावरणाच्या समरसतेतून लिहिले गेले. आडकुजी महाराजांवरील लेख प्रा. गुणवंतराव काळे यांनी तुकडोजींच्या जन्मदिनोत्सवा-निमित्ताने लिहवून घेतला तर त्यांच्याचमुळे घाईने लिहिलेल्या मायबाईचरित्राला नंतर मला पुस्त्या जोडाव्या लागल्या. मध्यप्रदेश सरकारने नेमलेल्या स्वातंत्र्यसंग्रामेतिहास समितीला माहिती पुरविण्याच्या निमित्ताने लिहिलेल्या विस्तृत माहितीमधला 'मातृभूमी'ने छापलेला संक्षिप्त भाग म्हणजे 'श्रीतुकडोजींच्या काव्यातील सूक्ती.–' 'संत तुकडोजी आणि साहित्य' हा लेख 'रोहिणी'च्या संपादकाच्या मागणीवरून संत विशेषांकासाठी लिहिला व तोच नंतर प्रा. गुणवंतराव काळे यांच्या प्रयत्नांनी निघालेल्या 'राष्ट्रसंत श्री तुकडोजी : व्यक्तित्व आणि कर्तृत्व' (१९६१) या पुस्तकातील विभिन्न लेखकांच्या लेखसंग्रहात छापला. 'तरुणभारता'ने या पुस्तकावर अभिप्राय देताना फक्त दोनतीन लेखांचीच मुक्तकंठाने प्रशंसा केली, त्यात हा लेख होता.

'माणुसकीची गोष्ट' हा लेख म्हणजे गाडगेबाबा व तुकडोजीबाबा यांच्या कार्यामुळे हेलावलेल्या मनाचे प्रांजळ प्रदर्शन! धनगर समाजातील संतांवरचा लेख माझे मित्र प्रा. एम्. अे. महात्मे (अमरावती) यांनी अमरावतीच्या 'अहिल्यावाणी'साठी आग्रहाने लिहून घेतला. तो त्रोटक आहे, याची जाणीव आहे. विदर्भातील साहित्याचा इतिहास लिहिण्यासाठी

सामुग्री जमविताना मिळालेल्या माहितीच्या आधारे 'विदर्भातील प्राचीन चरित्रलेखन' हा लेख लिहिला. तो 'इतिहास' मात्र अजून अप्रसिद्ध आहे.

डॉ. वि. भि. कोलते यांचा मजवरील लोभ माझ्या संतसाहित्याच्या आवडीमुळेच वाढला असे मला वाटते. माझ्या अभ्यासाच्या वेगळचा आवडींमुळे मूलभूत विचार करताकरताच त्यांचेही विचार आणि वाङ्मय वाचनात येई. 'बरे झाले कुणबी केलो,' 'गुरू नसल्याचे शल्य की समाधान?' या लेखांची निर्मिती होण्यामागे अशाच काही अंतःप्रेरणा एम्. ए. ला शिकत असता कारणीभूत झाल्या. 'तुकारामाची रांडापोरे' हा त्याच वेळचा लेख. 'संतवाङ्मयातील अश्लीलता' या विषयावर प्रबंध लिहायचा सल्ला प्रा. गिरीश राठींनी दिला आहे. बघू या तो संकल्प कधी पूर्णतेकडे धावतो ते!

एम्. ए. नंतर लगेच 'प्राध्यापकी' करताकरता 'संतवाङ्मयातील वर्णव्यवस्थे'वर संशोधन करावयाच्या निमित्ताने वाचन सुरू केले. लेखनही झाले.'नामयाची जनी' व 'नामदेवाच्या जनाईकृत शब्दचित्रा'चे मूळ त्या अभ्यासात आहे. 'संत नामदेवदर्शन' हे माझे पुस्तकही त्या अभ्यासातूनच तयार झाले. (कै.) डॉ. पंजाबराव देशमुख यांनी आत्मीयतेने त्या पुस्तकास पुरस्कार लिहिला.

अमरावतीला श्री. चंद्रकांत निंभोरकरांनी महानुभावीय पोथ्या अभ्यासास दिल्या. 'कवी शिवराम किंकर' या लेखातील. माहिती अशीच एक पोथी चाळताचाळता मिळाली. हा लेख श्री. निंभोरकर यांनी 'नवभारता'त आल्यावर आपल्या 'महानुभाव' मासिकात छापला.

हे संताविषयक लेख आधी मासिकादिकांतून प्रकाशित झाले आहेत. पुस्तकरूपाने छापून काढताना त्यांच्यात सोयीसाठी किंचित फेरबदल केले आहेत. फार मोठे बदलसुद्धा करता आले असते. पण ते बदल न ठरता नवे लेखन ठरले असते. त्यामुळे मूळ भाव कायम ठेवला आहे. लेखांच्या शेवटी प्रकाशनकाल आहे. लेखनकालही त्या त्या दरम्यानचाच आहे.

अमरावती
दि. १५ मे १९६८

आपला नम्र
**भाऊ मांडवकर**

# तुकारामाची रांडापोरे
## ( संतविषयक लेखांचा संग्रह )

## — लेखांचा क्रम —


१. नामयाची जनी .... ९–१२
२. जनाबाईने रेखाटलेले नामदेवांचे शब्दचित्र .... १३–१९
३. कवी शिवराम किंकर .... २०–२८
४. श्री चिंधे महाराजांची काव्यसाधना .... २९–३५
५. विदर्भातील प्राचीन चरित्रलेखन .... ३६–४२
६. माणुसकीची गोष्ट .... ४३–४८
७. श्री संत आडकुजी महाराज .... ४९–६०
८. श्री तुकडोजींच्या काव्यातील सूक्ती .... ६१–६६
९. संत तुकडोजी आणि साहित्य .... ६७–८०
१०. आर्वीच्या संत मायबाई .... ८१–८४
११. धनगर समाजातील काही विद्यमान संत .... ८५–८६
१२. गुरू नसल्याचे शल्य की समाधान ? .... ८७–९३
१३. 'बरे झाले कुणबी केलो' .... ९४–९८
१४. तुकारामाची 'रांडापोरे' .... ९९–१०२

२०९२ निबंध
२१६८७

# १. नामयाची जनी

जनाबाईच्या नावावर आवटे–गाथ्यात ३५१ अभंग आहेत. संत-कवींनी आपल्या अभंगपदांच्या शेवटी आपल्या नावाची कर्ता म्हणून टीप टाकली आहे. हे नाव एकेरी असले तरी तीनचार पद्धतींनी ते टाकल्याचे दिसून येते. जनाबाईनेही आपल्या अभंगांत ही टीप विभिन्न पद्धतींनी टाकली आहे. फक्त तीन अभंगांत (१८, ६५, १४८) टीप नाही. 'जनाबाई' अशी टीप दोन अभंगांमध्ये आहे. (१३० व १३९) जनाबाईने 'जनी म्हणे' किंवा 'जनी' ही सर्वसाधारण टीप अधिक अभंगांत टाकली आहे व ते युक्तही आहे. असे अभंग ३५१ मध्ये १९१ आहेत. जनाबाई ही 'दासी' होती, हेही तिने आपल्या त्या कामाचा व पदाचा उल्लेख करून टीपेत स्पष्ट केले आहे. 'दासी जनी'ने आपली ही ओळख ६९ अभंगांतून करून दिली आहे. 'जनी दासी' एकूण ८ अभंगांत आली आहे. 'दासी जनी नामयाची' अशी टीप २२७ व्या अभंगात आहे, तर १६६ व्या अभंगात 'जनी दासी नामयाची' अशी टीप आहे. 'नामयाची दासी' असलेले अभंग ११ आहेत. उरलेले ६१ अभंग 'नामयाची जनी' या टीपेचे आहेत. त्यांतील ३ अभंगांत 'नामयाचे जनी' असे असून ३ अभंगांत 'जनी नामयाची' असे आहे.

'नामयाची जनी' म्हणून जवळीक दाखविण्याचा हा प्रकार काहीसा समर्थनीय आहेच. पण त्यात मला अभिप्रेत झालेला आशय वेगळाच असून त्यातून मला नामदेवांच्या धडाडीचा कमालीचा प्रत्यय येतो !

जनाबाईच्या जन्ममृत्यूचे शक उपलब्ध नाहीत. जनाबाईच्या अंगा-

खांद्यावर नामदेव खेळले असतील, असे वाटत नाही. दमा आणि कुरुंड या दंपतीने या अनाथ बालिकेला दामाजींच्या स्वाधीन केले. म्हणजे दामाजींच्या मुलाच्या वयात बसणारेच तिचे वय असले पाहिजे! जनाईचे व नामदेवाचे वय म्हातारी–बालक या साच्यात बसेल असे नाही. कारण जनाई म्हातारी असती तर ती दामाजीपंतांच्या वयाच्या दर्जात बसू शकली असती. पण ज्याअर्थी बालिका म्हणून ती दामाजींच्या स्वाधीन केली जाते; त्याअर्थी दामाजीच्या मुलाबाळांच्याच वयाची असू शकेल. दामाजीपंतांनी या मुलीचा स्वीकार केला, त्यावेळी दामाजींचे वय निश्चितच २०–२५ च्या नंतरचे असावे व त्या दरम्यान नामदेवांचाही जन्म धरला तर नामदेव व जनाई हे समकालीन ठरतात. गोरोबा सोडले तर नामदेव हेच संतमंडळात सर्वात वयस्कर होते. म्हणजे इतर संत हे नामदेवांहून लहानच होते. जनाबाईही नामदेवांहून मोठी नसावी, असे म्हणण्यासाठी हा पुरावादेखील उपयोगाला येऊ शकतो.

जनाबाई ही नामदेवांपेक्षा मोठी नसावी. ती लहान असावी किंवा समवयस्क असावी. ज्यावेळी नामदेवाचे प्रचारकार्य पंढरीच्या वाळवंटात चालू होते, त्यावेळी ज्ञानेश्वरांची भेट होण्याला वेळ होता. अशा या ऐन उमेदीत नामदेव तारुण्याच्या ऐन भरात होते. त्यांची शक्ती भागवतांच्या वारकरी मार्गाद्वारे जनतेचा उद्धार करून समाजसेवा साधण्यात खर्च होत होती. जनाबाई व इतर भिन्नजातीय संत यांचा संग्रह नामदेवांजवळ वाळवंटात होत होता.

एकीकडून जनाबाई शूद्र होती. दुसरीकडून ती नोकर होती. विठानारांना विठूच्या पायी जे स्थान होते, तेही तिला नव्हते. जनाईचे स्थान दूर दारी होते. अशाही स्थितीत शक्य त्या प्रमाणात सवलती देऊन नामदेवाच्या पित्यांनी तिचा प्रतिपाल आपल्या घरात करणे हे काही लहानसहान काम नव्हते. नोकरीला म्हणून का होईना, जनाईचा सांभाळ दामाजींनी करावा ही घटना त्या घरातील पुरोगामित्वात बसणारी होती. पण त्याहिपेक्षा पुरोगामिता नामदेवांची होती. नामदेवांच्या सहवासाने ती देवभजनी लागली, ती आपल्या क्षेत्रात प्रगट झाली आणि

नामदेवांच्या तोडीची अभंगकारही ठरली. ही योग्यता आल्यावर ती संतमंडळीत वावरून स्वतःला 'नामयाची जनी' म्हणवून घ्यायला लागली.

अध्यात्माच्या, भक्तीच्या क्षेत्रातून व्यवहाराच्या पायरीवर उतरल्या-नंतर जनाई आणि नामदेवांच्या निमित्ताने त्यावेळचा व्यावहारिक जन-वृंद समोर ठाकतो. साधारण जनता कधीच पुरोगामी नसते. ती सनातन व रूढ विचारांनी बुरसटलेली असते. नामदेवांचा काळ याला अपवाद असणार नाही.

समजा, एक पुरोगामी तरुण आहे. त्याच्या घरी एक तरुण मुलगी पाळली जाते. त्या तरुणाचे शिक्षण झाल. तो वक्ता झाला. ती मुलगीही मुलाचे पाहूपाहू प्रतिकूलतेत हिरीरीने काही शिकली. प्रगत झाली. पाहू-पाहू वक्तेपण तिला साधले. दोघेही विशिष्ट प्रमाणात एका पातळीत आले. त्यांचे नाते बहीणभावाचे किंवा तत्सम, अविकृत असे असले तरीही एखाद्या समारंभात तो तरुण अध्यक्ष असताना ती तरुणी म्हणाली, "श्री. अमके यांची मी आहे." अशा वेळी त्याचा परिणाम काय होईल? लोक विकृतीने बघू लागतील. नामदेवांच्या घरात वाढलेली, अविकृत भावाने जगणारी जनाई सर्रास भजन–कीर्तनांत 'नामयाची जनी' म्हणते. त्यात वाईट नसले तरी काही लोक निश्चितच विकृतीकडे कलणारे असतील ! –आणि तरीही नामदेवांनी ते सारे टीका–भार हसतहसत झेलले असतील ! विशुद्ध आत्म्याला या कस्पटांची तमा ती काय? पण वाता-वरणाला तोंड देणाराच महात्मा असे मुलखावेगळे प्रयोग पचवून हसू व हसवू शकतो. 'अमक्याची अमुक' अशी टीप कोणत्या स्त्री–संताने वापरली असे आढळत नाही. नामदेवांच्या जीवनात मात्र हे अचाट मनोधैर्याचे उदाहरण आढळते.

हे नामदेवांसारख्या धडाडीच्या कार्यकर्त्यालाच शक्य आहे. आपणच मोठे करून वाढविणाऱ्या साऱ्या लहानसान संतांना अत्यंत आदर देणारा जो नामदेव सावतांना 'सावता सागर आगर प्रेमाचा' म्हणू शकतो, चोखोबांच्या अस्थी आणून त्यांच्याच समाधीजवळ स्वतःही चिरंतन

झोप घेऊ शकतो, तीर्थयात्रांपेक्षा घरातील जीवनाला महत्व देऊ शकतो, पंजाबातील-धर्मांतराला आळा घालू शकतो, रकट्याच्या लंगोटीवर जीवन जगून रकट्याच्या लंगोटीतल्या लोकांना मार्ग दाखवू शकतो तोच नामदेव 'नामयाच्या जनी'चे सूर ऐकून कधीमधी उसळलेल्या टीकांचे झोतही सहन करू शकतो आणि त्यामुळे उद्भवलेली सारी विषे पचवू शकतो ! 'नामयाची जनी ' म्हणूनच जनाला प्रिय झाली आणि ती 'नामयाची' म्हणूनच गाजत राहिली ! मीराबाईच्या भजनांतील काहीशी उच्चस्तरीय विकृतियुक्त भक्ती जनाबाईच्या अभंगांत नसली तरी व्यवहारी जगाशी तिला, नामदेवांला किंवा नामदेवांच्या कुटुंबाला तोंड द्यावे लागले नसेल, असे निखालस म्हणता यावयाचे नाही !

" श्रीगुरुदेव "
दिवाळी अंक १९५९

# २. जनाबाईने रेखाटलेले नामदेवांचे शब्दचित्र

जनाबाई ही नामदेवांच्या घरी काम करणारी दासी. नामदेवांच्या घरी ती नोकर म्हणून वावरली व नामदेवांच्या कृपेने तरली ! नामदेवांच्या या उपकारांची जाणीव जनाईच्या अभंगांमधून ठायीठायी प्रकट झाली आहे. जनाबाई नामदेवांची समकालीन. तिने नामदेवांना अगदी जवळून पाहिले. त्यामुळे तिने स्वतः नामदेवांसंबंधी जे लिहून ठेवले त्याला विशेष महत्व आहे. नामदेवांचे खरे व यथार्थ मूल्यमापन जनाबाईने केले. जनाईच्या शब्दांमधून साकार होणारे नामदेवांचे शब्दचित्र या दृष्टीने सुंदर आहे.

**नामदेवांचा जन्म**

जनाबाईने वर्णिल्याप्रमाणे आदिठाणे येथे नांदणाऱ्या कान्हाईला गोणाईने नवस केला–

ऐसा पुत्र देई भक्त । ज्याला आवडे पंढरीनाथ ।।

'गोणाईचा हा शुद्ध भाव' पाहून देव प्रसन्न झाले. फलतः तिच्या पोटी नामदेव जन्माला आले. त्यामुळे दामाशेटींनाही 'हरुष' झाला.

जनीच्या म्हणण्याप्रमाणे नामदेव हा युगानुयुगे अवतार घेत आला आहे. हिरण्यकश्यपूचा मुलगा भक्त प्रल्हाद, रामभक्त अंगद, द्वापारयुगात उद्धव, तोच कलीत नामदेव होय, अशी जनाईची वाणी आहे.

### नामदेवांचे कुटुंबीय

नामदेवांच्या घरी चौदा जीव असून ते सर्वच हरिभक्त होते. राजाई ही नामदेवांची पत्नी आणि नारा, विठा, गोंदा व महादा हे त्यांचे चार पुत्र ! लाडाई, गोडाई, येसाई व साखराई ह्या चौघी नामदेवांच्या सुना होत. गोणाई ही नामदेवांची आई आणि दामाशेटी हे वडील ! नामदेवांच्या बहिणीचे नाव आऊबाई व मुलीचे नाव लिंबाई असे होते. या चौदा जणांशिवाय पंधरावी 'वेडीपिशी जनी दासी' होती ती निराळीच !

### 'देव नाम्यासवे जेवी फार'

नामदेव देवाला विसंबत नसत. देवही नामदेवांना विसरत नसे ! 'देवच नामयाचे द्वारी सेवा करी.' 'माझा विठोबा येईल तेव्हाच मी जेवीन' हा नामदेवांचा हट्ट गोणाबाईजवळ चालायचा ! नामा देवावाचून जेवायचा 'खोळंबलाय' म्हणून समजले म्हणजे प्रत्यक्ष परमेश्वर, ज्याचा वसुदेवालाही पार कळला नाही तो देव, नाम्यासवे जेवण करायचा. देव जेव्हा 'फक्त भावार्था विकला' असतो तेव्हा असेच होते.

नामदेवांच्या मुलाच्या बारशालाही देव आलाच पाहिजे !

एकदाची गोष्ट ! दिवाळीचा सण आला. नामा राऊळात गेला. त्याने पांडुरंगाला घरी येण्याचे निमंत्रण दिले. देव आले. गोणाईने उटणे केले व दामाशेटीने विठ्ठलाला स्नान घातले. देवाची पूजा-आरती आटोपली. नंतर जेवणे झाली. देव जेवून तृप्त झाले. जेवणानंतर दासी जनीने देवाला विडे दिले !

### देव व नामदेव यांची गट्टी

नामदेव देवाशी लगट करीत बसले की गोणाई देवाशी भांडे–

माझा नामा मज देई । जीव देईन तुझे पायी ।।

नामदेव दिल्याशिवाय देवाची सुटका नसे. देव म्हणत, "तुझा नामा घेऊन जा !" गोणाई नामदेवांना हाती धरून घरी घेऊन येई.

नामदेव राऊळात गेल्यावर देव त्यांच्याशीच काय, पण अवघ्यांशीच बोलत असत. नामदेवांनी देव अशा रीतीने अवघ्यांनाच स्वस्त करून दिला होता !

कधी एक प्रहर रात्र झाल्यावर देव नामदेवांकडे यायचा. घरात दिव्य प्रभा दाटायची व देव आणि नामदेव एकमेकांना दृढालिंगन देऊन भेटायचे !

**देव नामदेवांचा चाकर**

बरेचदा 'हाटी जायाची तातडी' असायची व नामा पैलथडी असायचा ! कधीकधी नामदेवांच्या घरी खायलाही काही नसे. अशा वेळी नामदेव घरी नसताना देव स्वतः शेट होऊन राजाईकडे येई व द्रव्य देई. 'नाम्याला छळू नका' हे देवाचे राजाईला सांगणे असे. नामदेव आले की देव निघून जाई. नामदेव मात्र असल्या परक्या धनाला शिवत नसत. ते द्रव्य ते वाटून देत.

एकदा पंढरीला भिवरेच्या पुराच्या पाण्याचा त्रास होऊ लागला. पाणी पायरीस लागले. संतजन मिळाले व नामदेवांजवळ गेले. त्यांच्या विनंतीप्रमाणे नामदेव विठोबाजवळ गेले व त्यांनी 'भिवरेस उतार द्या' म्हणून विनविले. देवाने नामदेवाची लाज राखली ! पूर उतरला !

एकदा आषाढीला उपवासी पाहून नामदेवांसाठी देवाने गरुड पाठविला. नामदेवांचे घर जेव्हा जोराच्या पावसाने पडले तेव्हा देवाने मजूर होऊन त्यांचे घर बांधून दिले. त्यासाठी भिंती उभारून देवाने छप्पर शाकारले व घर सावरले !

एकदा देवाने गंमतच केली. तो विप्रवेषाने नामदेवांकडे आला व त्याने मरणाचे सोंग केले. प्रेत स्मशानात नेले गेले. प्रेत सरणावर ठेवले. अग्नी लावल्या गेला. अग्नीची आच लागताच देव घाबरला व तो सरणावरून खडबडून उठून बसला.

**नामदेव तीर्थाला जातो !**

जनाबाईने लिहिलेल्या 'तीर्थावळी'च्या अभंगांमधूनही नामदेवांच्या स्वभावचित्रावर प्रकाश पडतो.

ज्ञानेश्वरांना तीर्थे पाहावयाची होती म्हणून ते पांडुरंगाजवळ गेले व त्यांनी नामदेवांस बरोबर नेण्याची इच्छा व्यक्त केली. नामदेवांना तीर्थाला पाठविण्यास देवाचीही भूमिका पूर्णतः अनुकूल नव्हतीच. पण 'न धाडल्यास ज्ञानेश्वरांस राग येईल' या भावनेने देव कबूल झाले! वस्तुतः मुळातच नामदेवांना एका पंढरी–पंढरीनाथाशिवाय नाना तीर्थे वा देवदेवळे यांचा वडिवार पसंत नव्हता, हे या संदर्भावरून दिसून येते. नामदेवांचे स्पष्ट मत होते –

कटावरी कर नाही ज्या देवाचे । न घे मी तयाचे दरुशन ।।

नामदेव तीर्थाला जाणार नाहीत ह्याची देवालाही कल्पना होती. म्हणून देवाने त्यांना गळ घातली –

जाय बरोबरी नामया तू जाय । न चले उपाय काही तेथे ।।

'भीड' म्हणूनच नामदेवांनी ही तीर्थयात्रा मान्य केली! वस्तुतः तीर्थादिकांसाठी 'चालायची सवय' ही त्यांच्या जीवनकक्षेतील मूळ भाव नव्हतीच!

खरे म्हणजे नामा – पांडुरंग हे एक झाले होते. म्हणून, नामदेवांचे पंढरपूर सोडणे म्हणजे देवाचे अस्तित्वच नसणे असे झाले होते!

या तीर्थावळीतील जनाईकृत अभंगांतून तीर्थादिकांची अनावड हा नामदेवांचा स्वभावविशेष दिसून येतो.

**कीर्तनकार नामदेव**

जनसेवी कीर्तनकार नामदेवांचे चित्र जनाईने हुबेहूब उभे केले आहे. नामदेवांच्या चित्रणासाठी पुढील यथार्थ अभंगाइतका चांगला अभंग मराठीत सापडणार नाही –

सुंबाचा करदोडा रकटयाची लंगोटी । नामा वाळवंटी कथा करी ।।

सुंबाच्या करदोडयात अन् रकटयाच्या लंगोटीत उभे केलेले नामदेवांचे हे रूपडे अगदी वास्तव आहे. विशाल वाळवंटांत 'पुंडलिकापाशी नामा कीर्तनासी उभा' राहिला की –

येऊनिया पांडुरंगे । स्वये टाळ धरी अंगे । गाऊ लागे बरोबरी ।

इतकेच नव्हे तर –

(१) ब्रह्मादिक देव येवोनि पाहाती । आनंदे गर्जती जयजयकार ।।

(२) नामदेवा–कीर्तनी । ध्वजा आल्या स्वर्गाहुनी ।।

'विठो माझा लेकुरवाळा' या अभंगात जनीने लेकुरवाळ्या विठोबाच्या संसाराचे मोठे सुंदर रूप साकार केले आहे. त्यात 'नामा देवाची करांगुळी धरताना' दिसतो. या संत–संसारात 'ज्ञानेश्वरासारखे नामयाचे जिव्हार' आणि 'नामयाचा गुरू । तो हा सोपान सद्‌गुरू' पण असायचा! अशा कीर्तनप्रसंगाचे वर्णन जनाई करते –

एकच टाळी झाली चंद्रभागे वाळवंटी ।<br>
नामदेव कीर्तन करी पुढे नाचे पांडुरंग ।<br>
जनी म्हणे बोला नामदेवा अभंग ।

–नामदेवांनी कीर्तनप्रथेचा पसारा महाराष्ट्रात मांडला; त्याचे हे जिवंत प्रात्यक्षिक जनाईने पाहिले व ते दृश्य रंगविताना लाह्या वाटणारे ज्ञानदेव आणि कीर्तनरंगी रंगणारे नामदेव वर्णनातून साकार केले!

**ऋणनिर्देश**

नामदेवांनी महाराष्ट्रभर वारकरी मंडळाची लाट पसरविली व पांडुरंग–नामसंकीर्तनाच्या आधारे तरण्याची सोपी वाट साऱ्यांना दाखविली. अनेक अनाथ नामदेवांनी तारले–

धन्य नामदेव धन्य पंढरीनाथ । तयाने अनाथ उद्धरिले ।।

या अनेक अनाथांत जनीही तरली. 'नामयाची जनी पालट पै झाला' या शब्दांत तिने ही कबुली दिली. नामदेवांचे हे ऋण सांगताना ती नामदेवांना आईबापांचे स्थान देते. आईबापावाचून असलेल्या जनाईचे नामदेव पालक झाले होतेच नाहीतरी! जनी म्हणते–

धन्य मायबाप नामदेव माझा । तेणे पंढरीराजा दाखविले ।।

'नामयाची दासी' म्हणूनच 'विठोबाची जोडी झाली' हे कृतज्ञतापूर्वक मान्य करते.

**नाम्यासंबंधीची जवळीक**

नामदेवांच्या घरादारात वावरून जनी नाममय झाली. ती नामदेवांच्या प्रेमळ पंखांखाली सुखी झाली ! ‘ विषयाचा कंटाळा ’ आला की पंढरीनाथाकडे चलण्याचा ती नामदेवांना आग्रह करू शकते; इतकी दोघात जवळीक निर्माण झाली होती ! ‘ नामयाची जनी ’ अशी टीप अभंगांत टाकून जनीने नामदेवांबावतीतली जवळीक प्रकर्षाने दाखवून दिली ! ‘ नामा बोध करी ’ व ती त्याप्रमाणे वागे. ‘ थोर सुकृतांच्या राशी ’ तिला नामदेवांच्या बोधातून लाधल्या. ‘ गुरु–आज्ञेत ती पाळली ’ गेली. ती म्हणते–

मज भरवसा नाम्याचा । गजर दासी जनीचा ।।

नामदेवांना ‘ नाम्या ’ म्हणून जवळीकीचा तिने कळस केला व नामदेवांच्या प्रेमळ व ममताळू स्वभावाची अंतिम सीमा त्या शद्बांतून व्यक्त केली !

ही आपुलकी इतकी वाढली की देवनामाच्या गजराने आनंदरूप झाल्यावर तिने नामदेवांनाही रूपकादी रचनेत गोवून टाकले–

धरा सतरांचा हो मेळा . . . .
नामा दामा दोनी काळू । नामा विठा दमामे पैलू ।।

प्रारब्धीगतीसंबंधीही नामदेवांशीच तिचे हितगुज चाले–

दुःखसुख तेथे पाहुनी प्रमाण ।
करिती समान क्रीयमाण ।।
दुरुनी पाहती दावी दासी जनी ।
म्हणे नामयासी पाहावे स्वामी ।।

नामदेवांच्या भक्तिप्रतापाने तिच्याही ‘ शिरी विठोबाचा हात ’ आला. मग–

जनी दृष्टी पाहे । जिकडेतिकडे हरी आहे ।।
नामयाचा प्रसाद । झाला जनीला आनंद ।।

सर्वत्र हरिदर्शन घेणाऱ्या जनीला दळताकांडता देव मदत करू लागला. ही खूण फक्त नामदेवांनाच कळणार–

कोण तुझे बरोबरी । साद देतो निरंतरी ।।
खूण कळली नामदेवा । विठ्ठल श्रोता जनीच्या भावा ।।

–हा भाववेडा विठ्ठल नामदेवांच्या अभावी जनीला सापडलाच नसता. नामदेवांना सापडलेले माणिक जनीने हातात घेतले. हे खरे म्हणजे नामदेवांचेच महात्म्य होय! त्यात त्यांचेच कौतुक असल्याचे ती सांगते–

नामदेवाचे कौतुक । मला सापडे माणिक ।।

**वैष्णवांचा राव : नामदेव**

नामदेवांचे खरे व यथार्थ मूल्यमापन जनाबाईने केले. 'नामदेव वैष्णवांचा राव' असल्याचे तिचे स्पष्ट मत आहे. या उद्‌गारांतून तिने तत्कालीन संतमंडळातील नामदेवांच्या सर्वश्रेष्ठत्वाची ग्वाही दिली आणि तो ठेवा आपल्याकडे अनायासे आल्याबद्दल धन्योद्‌गार काढले–

नामयाचे ठेवणे जनीस लाधले ।<br>
धन्य सापडले विटेवरी ।।<br>
धन्य माझा जन्म, धन्य माझा वंश ।<br>
धन्य विष्णुदास स्वामी माझा ।।

याही अभंगात तिचा स्वामी भक्त नामदेव हाच धन्यतेस पात्र असल्याची तिची भाषा आहे.

नामदेवांसारखा महान संत नामदेवच, ही सत्यस्थिती जनीने एकाच ओळीत सांगून नामदेवांच्या तोडीचा कुणीच संत तिच्या काळापर्यंत नव्हता (आणि नाही) हे तिने ठासून प्रतिपादन केले–

मागे संत झाले । नाम्याऐसे कोण बोले ।।

–आणि, हे खरेच नाही काय? महाराष्ट्रातील अन् महाराष्ट्राबाहेरीलसुद्धा उपेक्षितांना मायेने गोंजारणाऱ्या संतांच्या परंपरेचा पायंडा पाडणारा लोकसेवी व लोकाभिमुख असा कळकळीचा व तळमळीचा संत नामदेवांपूर्वी दुसरा कोण झाला?

"गावकरी"<br>
दि. १ जानेवारी १९६१

# ३. कवी शिवराम किंकर

शिवराम किंकर ह्या कवीची फारच कमी माहिती उपलब्ध आहे. डॉ. य. खु. देशपांडे यानी या कवीबद्दल दिलेली माहितीही अल्प असून 'महाराष्ट्र सारस्वता'च्या पुरवणीत त्याच माहितीची पुनरुक्ती करण्यात आली आहे. [१] शिवराम किंकराने लिहिलेल्या 'गोपिकास्वयंवरा'ची व त्या अनुषंगाने ग्रंथकर्त्याची माहिती देताना डॉ. य. खु. देशपांडे यांनी लिहिले आहे.–"हा गोपिकास्वयंवर ग्रंथ ओवीबद्ध ४० अध्याय असून अपूर्ण आहे. तो श्रीशारंगधर मुनीचा शिष्य शिवराम किंकर याने केला आहे. काल निश्चित मिळाला नाही. मात्र भाषेच्या घाटणीवरून १७ व्या अथवा १८ व्या शतकातील असावा. अध्यायाच्या शेवटी 'इति श्रीभागवते महापुराणे दशमस्कंद कथाकल्पतरु हरीवंश संमत उपेंद्रचरीता गोपीकास्वयंवर' असे लिहिले आहे. या ग्रंथाचा दहावा अध्याय 'विजन महात्म्य' म्हणून म. भक्तराजबाबा औरंगाबादकर यांनी शके १८३३ साली छापविला." [२]

---

१. महाराष्ट्र सारस्वत (पुरवणी : श. गो. तुळपुळे, चौथी आवृत्ती) पृ. १०१२

२. डॉ. य. खु. देशपांडे; महानुभावीय मराठी वाङ्मय : १ ली आवृत्ती पृ. ८४

'महाराष्ट्र सारस्वता'च्या पाचव्या आवृत्तीत पुढीलप्रमाणे माहिती आली आहे–" शिवराम किंकरकृत 'गोपिकास्वयंवर' हे ओवीबद्ध काव्य अपूर्णावस्थेत उपलब्ध असून त्याचा रचनाकाळ निश्चितपणे ठाऊक नसला तरी ते १७ व्या शतकातील असावे असे भाषेवरून वाटते. अलीकडे या काव्याची एक संपूर्ण प्रत धुळे येथील राजवाडे संशोधन मंदिरात मिळाली असून त्यात प्रारंभी कवीने स्वतःचे चरित्र सांगितले आहे. त्यावरून त्याचा जन्म वऱ्हाडातील वेनी ( म्ह. वणी ) या गावी म्हसके नावाच्या कुळात झाला असे कळते. त्याचे पहिले गुरू शारंगधर ( शके १६६७ मध्ये कैवल्यदीपिका लिहिणारे ) व दुसरे गुरू हरिराम हे होत. या शिवराम किंकराने 'गोपिकास्वयंवर' शके १७०९ च्या सुमारास लिहिले. त्याचे चाळीस अध्याय आहेत. या काव्याचा १० वा भाग १८३३ मध्ये छापविला होता."[१]

### नवीन माहिती उजेडात आली

डॉ. य. खु. देशपांडे यांना 'गोपिकास्वयंवरा'ची अपूर्ण प्रत उपलब्ध झाल्यामुळे त्यांची या ग्रंथाच्या कर्त्याचीही माहिती अपूर्ण राहणे साहजिक आहे. आता या कवीसंबंधी नवी माहिती साधार उपलब्ध होण्यास अडचणी नाहीत. कारण 'गोपिकास्वयंवरा'च्या पूर्ण प्रती अमरावती, ऋद्धिपूर, माहूर येथील मठांमधून उपलब्ध होऊ शकतात. अशीच एक पूर्ण प्रत मला मिळाली असून ती मिळवून देण्याच्या कामी श्री. चंद्रकांत निंभोरकर, संपादक 'महानुभाव' मासिक अमरावती यांनी मला मदत केली. 'गोपिकास्वयंवरा'चे संपादन व समीक्षण करताना आणखी अन्य प्रतींचा उपयोग होऊ शकेल. तूर्त या लेखात फक्त कवीची माहिती करून घेण्याची दृष्टी असल्यामुळे मला उपलब्ध झालेल्या प्रतीच्याच आधारांवर भर दिला आहे.

---

१. महाराष्ट्र सारस्वत (पुरवणी) शं. गो. तुळपुळे, पाचवी आवृत्ती पृ. ९०९

### 'गोपिका स्वयंवर' काव्याची हस्तलिखित प्रत

'गोपिकास्वयंवर' हे काव्य अपूर्ण नसून ते पूर्ण स्थितीत उपलब्ध आहे. मला मिळालेली प्रत फारशी जुनी दिसत नाही. कारण ती उत्तम स्थितीत व व्यवस्थित आहे. 'यवते सुक्लेश्वर' येथे 'पंज्याबी रंगोबा दादा सुंदर' यांच्या ( हस्ताक्षरातील ? ) मालकीचा हा ग्रंथ असल्याची शेवटी नोंद आहे. या ग्रंथाचा एक अध्याय छापला आहे. परंतु या पूर्ण ग्रंथाच्या छपाईचीच व्यवस्था करण्यात आली असावी व त्याच दृष्टीनें ही प्रत हाताने लिहून काढली असावी. कारण या प्रतीच्या प्रारंभीच लिहिलेले आहे—

"ही पोथी मुंबइत बापू सदासीव सेटे यांचे छा॰ सीलायेंत्रे छा॰" "किमत रूपै आठ" "पेठ बुधवर बाजार."

या मजकुरावरून ही प्रत शिळा–छापखान्याच्या काळात झाली हे निश्चित दिसते.

सदर्हू प्रतीत प्रत्येक अध्यायाच्या आरंभी काढलेली चित्रे वैशिष्टयपूर्ण असून त्या चित्रांना अध्यायातील मजकुरांचे संदर्भ आहेत.

### नऊ हजार सोळा ओव्यांचा ग्रंथ

'गोपिका–स्वयंवर' हा ग्रंथ ४० अध्यायांचा असून एकूण ओवीसंख्या नऊ हजार सोळा आहे. भाषा प्रवाही आहे आणि पूर्ण ग्रंथात श्रीकृष्णाच्या विविध विवाहांची रसभरित वर्णने आली आहेत. प्रत्येक अध्यायाच्या शेवटी कवीने स्वनामाची टीप टाकली आहे. शेवटच्या अध्यायात प्रत्येक अध्यायाचा क्रमशः सारांश दिला असून कवीने त्या ओघातच आपली माहिती दिली आहे. कवीने आपली माहिती 'प्रारंभी' सांगितली असे तुळपुळे म्हणतात ते बरोबर नसून ती शेवटी आहे.

### जन्मग्राम पुसद तालुक्यात

शिवराम किंकर या कवीचा जन्म क्षत्रिय वंशात झाला. महानुभाव आणि दत्त या पंथांचे पूज्य स्थान जे माहूर क्षेत्र, त्याच्या पश्चिमेस

यवतमाळ जिल्ह्यातील पुसद तालुक्यात वेणी नावाचे गाव आहे. वेणी आणि वणी एक नव्हे, हे लक्षात घेणे आवश्यक आहे. वणी व वेणी ही दोन गावे यवतमाळ जिल्ह्याच्या दोन टोकांना वसली असून वेणी अगदीच लहान खेडे आहे आणि वणी हे तालुक्याचे ठिकाण आहे. माहूरच्या पश्चिमेस ठीक अकरा कोसांवर हे गाव वसले आहे. गावाची वस्ती एका उंचशा डोंगरावर असून त्या उंचवटयाला कवीने 'मृगेंद्राचळ' असे संबोधिले आहे. या वेणी गावाची 'मुकद्दमी' परंपरेने शिवराम किंकराच्या घराण्यात चालू होती. कवीचे आडनाव 'मसके' असून त्याच्या पूर्वजांचा त्या भागात चांगला बोलबाला होता.

पुसद तालुक्यातील नाथपंथी कवी विठ्ठल किंकर व महानुभाव कवी शिवराम किंकर यांचा संबंध दिसत नाही.

**पुसदची कवीने दिलेली वेगळी माहिती**

पुसदच्या परिसरात राहत असल्यामुळे शिवराम किंकराने पुसदची थोडी प्राचीन माहिती आपल्या ग्रंथात दिली आहे. पुसद तसे प्राचीन नगर आहेच. शिवराम किंकराच्या कथनानुसार पुसद ही द्वापार–युगीची 'मंद्रपुरी' आहे. 'मंद्रपुरी'त 'बृहत्साम्न' नावाचा 'कोदंडधारी' राहत होता. 'तयाची कुमरी लक्षेमणा (लक्ष्मणा)' ही असून तो 'श्रीकृष्णाचा मुखे (मुख्य) स्वसुर (सासरा)' होता. 'तयाचा देस तयाचे णगर' पुसद असल्याची माहिती शिवराम किंकर मोठ्या विश्वासाने देतो.

शिवराम किंकराला 'गोपिकास्वयंवर' रचण्याची स्फूर्ती [होण्यासाठी श्रीकृष्णाचे पुसदशी असलेले हे जवळचे नाते काही अंशी कारणीभूत झाले असणारच ! माहूरच्या निकटत्वामुळे महानुभाव पंथ व श्रीदत्त यांची जवळीक निर्माण होणे हे जसे शक्य; तद्वतच महानुभाव पंथातील पंचकृष्णांपैकी श्रीकृष्ण व त्याचे आत्मीय पुसद हेही जवळीकेला कारण संभवते !

### घराण्याला बारा गावांची 'मुकद्दमी'

शिवराम किंकराच्या घराण्याला 'मुकर्दमी'ची बारा गावे पारंपरिक 'वृत्ती' म्हणून मिळालेली होती. त्यात 'बोरज' हे गाव मुख्य 'नायकक्षत्र' होते. यांच्या वंशात 'भुमटपण' (?) परंपरेने चालू होते. 'मुकद्दमी' ही काही सैनिकांच्या तुकडी-प्रमुखाला मिळत असे. 'भुमटपण' म्हणजे सणवारप्रसंगी गावात पत्रावळीची पाने वगैरे वाटण्याचे काम करणाऱ्या 'भूमक' लोकांचे तर काम नव्हे ना ? की, या शद्वाचा संबंध भूमीशी आहे ?

### गृहकलह व त्याचे परिणाम

या घराण्याला मिळालेल्या पारंपरिक वतनांमुळे संपत्ती व संतती यांस बहर आला ! 'पुत्रकळत्र' फार वाढले. त्यातूनच अपरिहार्यपणे श्रीमंतीची रग गोत्रसंहारास कारण झाली. युद्धे झाली. आपसात यादवी माजली. फक्त 'साख' या गावाची 'मुकद्दमी' तेवढी उरली !

शिवराम किंकराच्या आजोबाला ( पित्याच्या पित्याला ) नात्यातीलच माणसाने चेटूक केले व तो 'पिशाच्च' झाला. घराचा कर्ता पुरुष पिसाट असल्यामुळे घराचे स्थैर्य विघटित झाले. त्यामुळे गोत्रात वा नात्यातच फूट पडली. 'वृत्ती'च्या वाटण्या करण्यात आल्या. याप्रमाणे गावातील मानवाईकपणा ओसरला व 'भुमट चाली स्तद्ध जाली' म्हणजे घराण्यात परंपरेने चालू असलेले 'भुमटपण' बंद झाले !

### ब्रम्हयोगिनी माता

सदाशिव हे शिवराम किंकराच्या घराण्याचे दैवत होते. तरीपण, कवीला सर्व देवतांचे बीज 'कृष्णनाथ'च वाटतो. या कवीच्या पित्याला प्रारंभी एकच मुलगा होता. त्यामुळेच कदाचित शिवरामाच्या पित्याला दोन बायका झाल्या असाव्या. शिवरामच्या पित्याचे नाव 'पंचानन' असे असावे. शिवरामाची आई ही त्याच्या पित्याची ज्येष्ठ पत्नी होती. परंतु कनिष्ठ पत्नीच त्याच्या वडिलाला अधिक प्रिय असल्यामुळे

शिवरामाच्या आईने गृहत्याग केला व ती 'ब्रम्हयोगिनी' झाली. बहुतेक जवळच्या मातापूरला म्हणजे माहूरला जाऊन तिने महानुभाव पंथाची दीक्षा घेतली असावी.

### बापाच्या बहिणीने पालनपोषण केले

आई सोडून गेल्यामुळे लहानगा शिवराम पोरका झाला. साहजिकच त्याच्या पित्याने त्याच्यावर अधिक प्रेम करावयास सुरवात केली. परंतु त्याच्या सावत्र आईला ते न पटल्यामुळे वडिलालाही पुत्रप्रेमाला आवर घालावा लागला. सावत्र आई शिवरामाचा द्वेष करी. त्यातच तिला मूल झाले. त्यामुळे शिवरामाच्या जीवनात उन्हाळा उभा झाला. स्नेहाच्या अभावी जगणाऱ्या शिवरामला त्याच्या आतेचा आसरा लाभला. वडिलाच्या बहिणीने त्याला प्रेमाने वाढविले व वस्त्राभरणे दिली.

### 'आपणासारिखे करिती तात्काळ !'

काही वर्षे निघून गेली. त्यानंतर सहज तीर्थाटनाला म्हणून शिवरामाची 'ब्रम्हयोगिनी माता' त्याच गावात आली. मुलाची दुरावस्था तिला पाहवली नाही आणि म्हणून ती शिवरामाला आपल्याबरोबर घेऊन गेली. मुलालाही तिनेच महानुभाव पंथाची दीक्षा देवविली असावी. अध्यात्माची अधिकारी ठरलेली माता स्वतःच्या मुलालाही तोच मार्ग दाखविते, याबद्दलचे हे उदाहरण वाखाणण्याजोगे आहे.

### गुरू सारंगधर

शिवरामाला संन्यासदीक्षा श्रीसारंगधर यांनी दिली. श्रीगुरुराज सारंगधर ही व्यक्ति शिवरामाला धीर आणि आधार देणारी वाटली. भक्ती आणि वैराग्य यांत आपले गुरू आगळे असल्याची माहिती शिवराम देतो. त्याने गुरूला 'ज्ञानपुतळा', 'तपसागर', 'सत्वशांतीदयासागर', 'उदार कल्पतरू', 'दामिनी–समरीचा वैश्वानर' इत्यादी विविध विशेषणे दिलेली आहेत. शिवरामाच्या वर्णनावरून, श्रीसारंगधर गुरू देहयष्टीने भव्य असावेत, असे दिसते.

राज्य ग्रंथ संग्रहालय, जाप. स्थळ
क्रमांक [illegible] दि: [illegible]

हे सारंगधर पुसदेकर सोळाव्या शतकातील संस्कृत कवी असून ‘ काव्य चूडामणी ’ व ‘ कैवल्यदीपिका ’ या गीताटीकेचे कर्ते होत.

सारंगधर हे मूळचे अमरावती जिल्ह्यातील पुसद्याचे होते. ते महानुभावीय होते, हे निश्चितच ! या परिच्छेदातील माहितीला ‘ गोपिका स्वयंवरा’त पुष्टी आढळली नाही.

### शिवरामाचे अन्य गुरू

दीक्षा घेतल्यानंतर तिसऱ्याच वर्षी दुर्दैवाने शिवरामाचे ‘ गुरुनिधान गुप्त झाले. ’ गुरुवियोगात बराचसा काळ कवीने घालविला. उद्योग वा विद्याभ्यास न करता तो भटकला.

योग असा की, कवीच्या भाग्याने त्याचा स्वतःचा चुलताच त्यानंतर कवीला ज्ञानपंथ दाखविणारा ठरला ! त्याने अत्यंत प्रीतीने शिवरामाकडून विद्याभ्यास करविला. परंतु तोही लवकरच सोडून गेला, हे आणखी एक दुर्दैव !

त्यानंतर शिवरामाला त्याच्या कुळातील आचार्य हरिराज यांनी ज्ञानामृत प्रदान केले. या व्यक्तीचे शिवरामाने ‘ योगियामाजी ज्ञानसूर्य,’ ‘ ज्ञानमूर्ती ’ अशा शब्दांत वर्णन केले आहे. तसेच, मातेप्रमाणे वागून आपल्या सर्व अपेक्षा पुरविल्या, असेही कवीने आचार्य हरिराजांसंबंधी लिहिले आहे.

एकंदरीत, आईसकट चार गुरूंचा सहवास शिवराम किंकराला लाभला. साहजिकच त्यांच्या ज्ञानाचा व त्यागी–तपी जीवनाचा प्रत्यक्षाप्रत्यक्ष रीतीने त्यास लाभ झाला, आणि त्याचेच फलित म्हणजे ‘गोपिकास्वयंवरा’ची नीटस रचना होय, असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही.

### कवीचा काळ

कवी शिवराम किंकर सतराव्या किंवा अठराव्या शतकात होऊन

गेला, असे डॉ. य. खु. देशपांडे यांचे पूर्वोक्त कथन आहे. 'गोपिका-स्वयंवरात शेवटी शार्दूलविक्रीडित वृत्तातील एक श्लोक आहे. ओवीसह ग्रंथात श्लोक गुंफण्याची कवीने स्वतःच कबुली दिली आहे. ती खरी असल्यास 'गोपिकास्वयंवरा'च्या शेवटचा श्लोक शिवराम किंकराचाच आहे असे मानावे लागेल. तसा तो मानल्यास शके १७६८ मधील 'गोपिकास्वयंवरा'ची रचना आहे, असे दिसते. "स्याके भूमुनि याम पर्वत, म्हणजे शके १७८८, असे सकृद्दर्शनी वाटते. ( भू = १; मुनि–७; याम ८; पर्वत ८ ) परंतु या गणनेत चूक होते. उलटचा बाजूने येथे मोजण्याची गरज दिसत नाही. सरळच गणन केले पाहिजे. याम म्हणजे प्रहर आठऐवजी सहा धरावे. कारण आता १२ तासांचे ४ प्रहर होत असले आणि तीन तासांचा प्रहर मानण्यात येत असला तरी पूर्वी चार तासांचा प्रहर मानला जाई. या हिशोबाने पूर्ण दिवसाचे सहाच प्रहर होतात. म्हणून वरील श्लोकातील शक १७६८ हाच ग्राह्य होय. या श्लोकाच्या पहिल्याच ओळीत 'पराभावे मिती वत्सरे' असे उत्तरार्धात म्हटले आहे. म्हणजे या वर्षी पराभव नामक संवत्सर चालू होता. पराभव संवत्सर शके १८८८ साली ( इ. स. १९६६ मध्ये ) आला. हाच शके १७६८ साली येतो. तो शके १७८८ मध्ये येत नाही. म्हणून या ग्रंथाची रचना शके १७६८ मध्ये झाली असावी असे दिसते. आश्विन शुद्ध प्रथमेला घटस्थापनेच्या दिवशी ही रचना झाली असेही ह्याच श्लोका-वरून दिसते.

हा श्लोक जर हस्तलिखित तयार करणाऱ्याचा असेल तर शिवराम किंकराचा काळ त्याहीपूर्वीचा ठरू शकतो. पण पोथीत त्याला अन्य पुरावा नाही. परंतु जोपर्यंत हा श्लोक शिवराम कवीव्यतिरिक्त अन्य कुणाचा असल्याचे निश्चित कळत नाही तोवर तो कवीचाच आहे हे मानले पाहिजे आणि जर ते सत्य मानले तर कवीचा काळ शकदृष्टया अठराव्या शतकातील निश्चित होतो !

जर हा ग्रंथ १७६८ शकातील असेल तर तो शिळाछापाच्या मुद्रणकाळातच लिहिला गेला असा अर्थ होतो. इ. स. १८४६ मध्ये हा शक येतो. या काळात शिळाछाप मुद्रणाची व्यवस्था होती. मला मिळालेल्या प्रतीवर एतद्विषयक जो उल्लेख आहे त्याला या दृष्टीने अर्थ येतो. इ. स. १८४६ मध्ये शिवराम किंकर कवी हयात असल्याचे फलित होते आणि तसे असल्यास हा कवी फारसा प्राचीन ठरत नाही !

"नवभारत"
एप्रिल १९६६

# ४. श्री चिंधे महाराजांची काव्यसाधना

कर्मयोगी गाडगेबाबांच्या मेळ्याचे वैशिष्ट्य खडे कीर्तन हे आहे. विदर्भातील दुसरे संत श्री तुकडोजी महाराज यांच्या भजनाचे खंजरी–झांजा हे एकमेव वैशिष्ट्य आहे. गाडगेबाबांच्या शिष्यप्रशिष्यांमध्ये खंजरी–झांजांच्या भजनातून गाण्यासाठी भजने लिहिणारे चिंधेबाबाच फक्त आहेत. गाडगे महाराजांच्या मालिकेत चिंधेबाबांनीच कीर्तनांना भजन–कार्यक्रमाची जोड दिली. स्वतः चिंधे महाराज गोड वाणीने ही भजने तयार करून गातात. चिंधेबाबांची ही काव्यसाधना उपेक्षणीय नाही. पण तिकडे अजून कुणाचे लक्ष गेलेले नाही. संतकाव्याची परंपरा कायम राखून जनमनावर अधिराज्य गाजविण्याइतपत भजनांद्वारा भक्तिसाधना ( अन् सोबतच कार्यसाधना ) साधणारे तुकडोजी महाराज हे जितके प्रसिद्ध आहेत; तितके चिंधेबाबा प्रसिद्ध नाहीत. मात्र त्यांची काव्यसाधना मराठी साहित्यात खात्रीने मोलाची आहे, यात शंका नाही.

**श्री तुकडोजींच्या भक्ति–भजनांचे ऋण**

श्री चिंधे महाराज यवतमाळ जिल्ह्याच्या पुसद तालुक्यात खेड्यातील उपेक्षित कुटुंबामध्ये जन्माला आले व घरदार सोडून गाडगे-

बाबांच्या पंथात शिरले. आज त्यांचे वय चाळीशीच्या पुढे आहे. १९४२ पासून त्यांनी काव्यसाधनेस आरंभ केला. आज दोन तपे ही साधना चालू आहे. त्यांची 'भजनमाला' व 'नवचैतन्य अमृत' ही भजनांची दोन पुस्तके प्रकाशित झाली असून त्या दोन्हींमधील भजनसंख्या सुमारे साडेचारशेच्या जवळपास आहे. त्यांच्या भजनांना अप्रत्यक्षपणे श्री तुकडोजी महाराजांची भजन–पद्धती कारण झाली असावी असे वाटते. हे कबूल करण्यासाठीं श्री चिंधेबाबाही सहर्ष तयार असतील! कारण एका संताने दुसऱ्या संताचा अविरोध अनुवाद करीत पुढे चलावे हा तर मराठी संतांच्या धोरणाचा एकमेव विशेष नामदेवादिकांपासून चालत आलेला आहे. संतांचे चाहते भांडतील अन् संत एकमेकांना चाहतील! हेच दृश्य येथेही दिसते. स्वतः चिंधेबाबांची तुकडोजी महाराजांसंबंधीची भावना कशी आहे पाहा—

वरखेड पाहुनी । लगबग धाऊनी
कशी तुम्ही मोहनी । टाकिली जगाशी या राहुनी हो॥ ध्रु.॥

आडकोजी स्वामींच्या प्रसादाची बुटी ।
रंगुनी या रंगात विसरले अवघी आटाआटी ।
सुखदुःख साहुनी । ध्यान पुरे लावुनी । कशी तुम्ही ॥ १ ॥

अधर्माने ह्या जगताचा वेळ चालला होता ।
काय आणि कसे करावे पडली होती चिंता ।
ऐन वेळी येऊनी । मार्ग भला दाऊनी । कशी तुम्ही ०॥ २ ॥

ऐकुनी तुमची कीर्ती म्हणती चला बघाया मूर्ती ।
गोड वाणीचा बोध ऐकुनी तन्मय सारे होती ।
कनवळा येऊनी । भजनांशी गाऊनी । कशी तुम्ही ० ॥ ३ ॥

नश्वर काया त्यागुनी माया ईश्वर केला राजी ।
चिंध्यादासा दिधली भेटी धन्य धन्य तुकडोजी ।
आपण तरूनी । दुजयाशी तारूनी । कशी तुम्ही ० ॥४॥

**साधी पण गोड भाषा**

श्री चिंधे महाराजांची भजने सालंकार असून साधी आहेत; साधी असून भावसधन आहेत; भावनात्मक असून अपार बुद्धिमत्तेची द्योतक आहेत. त्यांच्या भाववाणीत नक्कल नाही. अनुभवांची अस्सलता आहे. त्यांनी समाजाला बरेचदा यमराजाची भीती दाखवून इतर संतांप्रमाणेच वैराग्याचा उपदेश दिला. पण तो देताना त्यांनी कमालीच्या साध्या भाषेचा वापर केला आहे–

(१) यमराजाला ज्वाब देईल, कोण तुमचा आजा गड्या !

(२) खाजू नका तुम्ही फोडूनी भवरोगाचा हा फोड हो !

हीच साधी भाषा ते वापरून उपेक्षित समाजाच्या आणखी जवळ जातात––

अपुला होउनि वैरी, गुतलो कोसल्यापरी ।

यातील 'कोसला' किंवा अन्यत्र आलेले 'गोठी' 'मसन', 'खंता', 'निवेद', 'हेकडा' 'चकवा' यांसारखे साधे, ग्रामीण व वऱ्हाडी शब्द वापरून चिंधे महाराजांनी भक्तिकाव्य लोकाभिमुख करण्याचा प्रयत्न केला आहे, हे निःसंशय ! संतसाहित्यातच काय पण इतरही कवितेत नेहमी दिसणारी ऱ्हस्वदीर्घांची ओढाताण येथेही दिसत असली (उदा. पॉलीशी –पॉलीश या अर्थाने, सांगले) तरी भाषेचे जनसुलभ स्वरूप स्वागतार्हच म्हणावे लागेल. हासी,करतार, जुटे, दर्या, हाशीखुशी, झोले, टेक, इन्कार, ज्वाब, तैयार, शर्म, यासारखे उर्दूच्या धर्तीचे शब्द वऱ्हाडात ग्रामबोलीत मिसळले म्हणून महाराजांच्या भजनांत ते खटकत नाहीत. हिंपुट, निर्बुजलो, प्रल्हादू यासारखे जुन्या संतसाहित्यातील धाटणीचे शब्दही चित्य आहेत. 'तीर्थी धोंडापाणी' या वचनांचा पुनरानुवाद करणारे श्रीचिंधेबाबा 'अवताराचे कार्य कराया वेळचि अजुनि उरला का ?' या तुकडोजीकृत कवनाचा स्वयंपूर्ण अन्यानुवाद 'अवताराचे काम करूनी सांग विठोबा श्रमला का ?' यासारख्या ओळीत

करताना पाहिले म्हणजे संत हे शब्द, पंक्ती आदींच्या बाबतीत पूर्वसूरींचा मागोवा घेतात हे पुनः पटते. कारण सावतादिकांच्या कल्पना तुकोबांनी स्वतःच्या पद्धतीने मांडल्याचे दाखले देता येऊ शकतात ! स्वतःच्या लेखनाची भूमिका स्वतः चिंधेबाबांनी सांगितली आहे–

जगतासाठी सोपेसापे, कळेल असे लिहिले ।
म्हणुनी ना व्याकरणा पाहिले ॥

--आणि, याचसाठी व्याकरण वगैरेची तमा न बाळगता त्यांनी "दुज्या दुःखाच्या तळमळीसाठी सहज मन धावले" म्हणून लिहिले. किंबहुना या ध्येयात धुंद होऊनच त्यांचा वेळ निघून जाऊ लागला. या "फकिरी'पायी त्यांची सारी ' फिकीर ' मिटली !

**गरीबांच्या दुःखाचे वर्णन**

बाबांनी आपले थोडचातील गोडीचे स्वभावरेखन भजनांद्वारा सुंदर केले आहे. दीनदुबळ्यांची जाणीव त्यांना आहे. म्हणून झोपडीचा आनंद त्यांनी प्रकट केला आहे. समाजातील दुःख नाहीसे व्हावे म्हणून त्यांनी कृष्णाला तळमळून आळविले आहे–

कृष्णा ! बस ही मारामार !

दारूबंदी व गोवधबंदीबद्दल त्यांनी कळवळा व्यक्त केला असून गरीब शेतकऱ्याचे हाल विस्ताराने कथन केले आहेत. अठरा धान्ये पिकवून पदरी कवडी न येणाऱ्या शेतकऱ्यांचे हाल त्यांना बघवत नाहीत. "कष्ट करुनीही ' त्यांना ' अवदशा यावी ' याची त्यांना खंत आहे. "मिरचीचा देठ'च नशीबी आलेल्या ' किरसानाने इतरांना पोसावे व स्वतः उपवाशी राहावे ' हे शल्य त्यांना जाणवते. जनमौजा पाहून त्यांचा काळिजा धडधडतो तोही याच जाणीवेने ! याच धोरणातून जनरीतीचे दाखलेही बाबांनी सुंदर दिले आहेत--

(१) अपकीर्तीच्या घरी मरावे, अशीच येथली रीत रे ।
(२) देशिल ते तू घेशील रे । अनुभव ऐसा थोरांचा ॥

### अलंकारयोजना आणि सुंदर शैली

बाबांच्या रचनेत काही अभावित अलंकारही येऊन जातात. 'साखर साखरेला जाणू शकत नाही' हे सत्य सुंदर रीतीने ते सांगतात. 'अंधामागे भव तरण्याची आशा धरणे व्यर्थ गड्या !' या रचनेतसुद्धा गोडवा आहेच. 'खांबाविण घराचा'—दाखला किंवा 'पायाळू-धनाचे' नाते ते अभिनव रीतीने मांडतात. पुढील उदाहरणेही पाहता येतील—

(१) गटार, ओढे, नदी, नाले आपणात घेता ।
समुद्रासी शंका कैसी रुक्मिणीकांता ॥

(२) चातक मेघासाठी झुरतो । चकोर चंद्रा त्या ॥

### मजेशीर युक्तिवाद

चिंधेबावा कधीकधी सुंदर युक्तिवाद करून जातात. त्या दृष्टीने मला पुढील रचना आधुनिक साहित्याच्या धाटणीची म्हणून उद्‌बोधक वाटली—

चुगलखोरा दिली लंका । लोभ ज्या बिभीषणाठायी ।
करोनी दास्य परिपूर्ण । लंगोटी हनुमंताला ॥
अहिल्या काय चुकली ती । फसविली जावी इंद्राने ।
पाडिले शिळा होण्याशी । तारिले पायी गणिकेशी ॥
तुकोबा थोर भक्ताशी । दरिद्री आणिली पुरती ।
काय ते सौख्य इंद्राचे । सुखाने अर्पिले त्याला ॥
तुझा अन्याय काढाया । भला तो वेदही थकला ।
अशा संसारी असताना । सुचेना काही चिंध्याला ॥

### श्री गाडगेबाबांचे शब्दचित्र

काही शब्दचित्रे अमर असतात. गांधींच्या वधानंतर तुकडोजींनी रचलेले 'बापूंचे शब्दचित्र' मला अमर वाटते. चिंधेबाबांनी त्यांचे

आयुष्य घडविणाऱ्या श्री गाडगेबाबांचे रेखाटलेले शब्दचित्रही मला मराठी साहित्यात अमर स्वरूपाचे वाटते. ते भजन असे—

डेबुजीराज माझे । हे एक संत कैसे ॥
करिताती कीर्तनाला । विद्या मुळी नसूनी ।
भरती रसाळ वाणी ॥ हे एक० ॥
घालूनी अन्नसत्र । तीर्थासि मोठमोठी ।
खाती हाताशी रोटी ॥ हे एक० ॥
कपडे नवे जरीचे । लंगडयालुल्याशी देई ।
आपणासि चिंधी नाही ॥ हे एक० ॥
पहा ढीग केवढा तो । सोडुनी भांडीयांचा ।
मडक्यात जीव त्यांचा ॥ हे एक० ॥
चिंध्या म्हणे तयांचें । वैराग्य हेचि लेणे ।
महिमा ही कोण जाणे ॥ हे एक० ॥

या शब्दचित्रातील ‘मडक्यात जीव त्यांचा’ या ओळींनी तर परमोत्कर्षाला या रेखनाला नेले आहे !

श्री गाडगेबाबांची आरती चांगल्यापैकी आहे. श्री चिंधे महाराजांनी अभंगवृत्तात लिहिलेली ‘समर्थाचें जीवनचरित्र’ (१९४५) व परिचयात्मक हरिपाठ (१९५६) ही दोन्ही छोटी पुस्तके श्री गाडगे महाराजांच्या जीवनचरित्रावर प्रकाश टाकतात. यातील रचनाही अतिशय प्रासादिक व सरस आहे. उदा०—

नको दुसऱ्याचा । माझा अनुभव । केली वाटे नाव ।
पैल थडी ॥
दाउनिया मार्ग । अति सापासोपा । कशी केली कृपा ।
चिंध्यावरी ॥

श्री गाडगेबाबांच्या स्मृतीलाही आदरांजली वाहणारे एक भजन चिंधेबाबांनी लिहिले आहे.

**संतसाहित्याचे आधुनिक दुवे**

संतसाहित्याचा काळ संपला नाही. तुकडोजींचे नाव या क्षेत्रात जसे स्पष्ट आहे; तशी चिंध्याबाबांसारख्यांचीही नावे उल्लेखावीच लागतील ! त्यांची अप्रकाशित रचना वगळली, तरी प्रकाशित रचना हीच संतसाहित्यातील आधुनिक दुवा ठरण्यास समर्थ आहे. 'जीवनदृष्टी' (गद्य-विचार) व 'परमार्थ साधना' (जुन्यानव्या भजनांची पुस्तिका–१९५८) या पुस्तकांना धरून बाबांची जी सहा पुस्तके आजवर मराठीत प्रकाशित झाली आहेत, त्यावरूनच त्यांच्या साहित्याचे मूल्यमापन मराठी साहित्यात व्हावे या मतावर येऊन मी हे धाडस केले आहे !

चिंधे बाबांची हिंदीतही रचना आहे. बरीच भजने त्यांनी साध्या पण जनतेच्या हिंदीत केली असून 'सत्ज्ञानदर्शक भजनावली'त त्यांची हिंदी भजने ग्रथित केली आहेत.

"श्रीगुरुदेव"
जानेवारी १९६१

# ५. विर्दभातील प्राचीन चरित्रलेखन

मराठी भाषेत गद्यलेखन सर्वारंभी करण्याचे श्रेय महानुभाव पंथाला आहे. विदर्भाच्या गर्भभागी नांदणाऱ्या अमरावतीजवळील ऋद्धिपूर या गावी महानुभाव पंथ जन्मला व वाढला आणि येथेच या पंथाने विपुल वाङ्मयनिर्मिती करून मराठी भाषेला कायमचे ऋणी करून ठेवले.

महानुभाव पंथाचे सुरवातीचे वाङ्मय चरित्रासारख्या समृद्ध व गंभीर वाङ्मयशाखेतून प्रवाहित व्हावे हे मराठीच्या दृष्टीने महत्वाचे लक्षण असून प्रायः काव्यानेच वाङ्मयाची सुरवात होते, हे ढोबळ प्रमेय मराठीच्या बाबतीत तरी साधारणतः खोटे ठरते. मराठी वाङ्मयाच्या आरंभकाळी गद्यशाखा या पंथात व मराठी भाषेत जितकी समृद्ध आह, तितकी कोठेच नाही.

## आद्यचरित्रकार म्हाईभट्ट

मराठीचे आद्यचरित्रकार महिंद्रभट्ट उर्फ म्हाईभट्ट हे ठरतात.म्हाईंभट्ट मूळचे नगरकडील सारोळ या गावचे ! ते चक्रधरांना डोमेग्रामी भेटले व त्यांना उपरती झाली. ते सरळच ऋद्धिपूरला आलेव श्रीगोविंदप्रभूंचे शिष्य झाले. ऋद्धिपूरला श्रीगोविंदप्रभूंच्या सहवासात राहून म्हाईंभटांनी लेखनकार्य केले व मराठी भाषेतील आद्यचरित्रकार आणि संशोधक म्हणून गौरव प्राप्त केला.

म्हाईंभटांनी 'लीळाचरित्र' या नावाने १५०९ आठवणींमधून श्रीचक्रधरांचे चरित्र साकार केले आहे. हे चरित्र शके १२०० च्या सुमारास तयार झाले. श्रीचक्रधरांच्या प्रयाणानंतर त्यांना स्मरण्यासाठी प्रयासपूर्ण संशोधनासह म्हाईंभट्टांनी ह्या आठवणी गोळा करून ऋद्धिपूरला लिहून काढल्या. ह्या आठवणीवजा चरित्रात वास्तवता काठोकाठ भरली असून आधुनिक चरित्रग्रंथाच्या सर्व उत्तम कसोटया ह्या ग्रंथाला लागू पडतात, इतके हे चरित्र सरस आहे.

म्हाईंभटलिखित दुसरे गद्यचरित्र 'ऋद्धिपूरचरित्र' अर्थात 'गोविंदप्रभुचरित्र' हे होय. श्रीगोविंदप्रभूंच्या निधनानंतर सहा महिन्यांच्या आतच म्हणजे शके १२१० च्या पूर्वार्धात या ग्रंथाचे लेखन ऋद्धिपूर येथे झाले. गोविंदप्रभूंचे वास्तव्य वऱ्हाडमधील अमरावती-भागातील असल्यामुळे अस्सल वऱ्हाडी शब्द व वातावरण यांचा आढळ या चरित्रात होतो. वऱ्हाडीचे आद्यरूप शोधावयाचे हे एक मोठे साधन होय.

'श्रीकृष्णचरित्र' हाही ग्रंथ म्हाईंभट्टांचाच असल्याचा निर्वाळा डॉ. वि. भि. कोलते यांनी दिला आहे. म्हाईंभटाच्या चरित्रग्रंथातील बराचसा भाग ऐकीव आहे. लीळाचरित्रातील काही लीळा स्वतः श्रीचक्रधरांनी सांगितल्या आहेत. त्या आत्मचरित्रात्मक आहेत. काही लीळा लोकांनी सांगितल्या आहेत. काही म्हाईंभटांनी स्वतः पाहिलेल्या व अनुभवलेल्या आहेत. गोविंदप्रभुचरित्राच्या बाबतीत हे अधिक प्रमाणात खरे आहे. या सर्व चरित्रसंभारात परक्यांचा काही वाटा असला तरी म्हाईंभटाचेच कर्तृत्व प्रामुख्याने या चरित्रलेखनास कारण झाले आहे. त्यामुळे अपरिहार्यपणे चरित्रलेखकाची शैली, गुणदोष इत्यादी गोष्टी लेखनात उतरणारच! तेव्हा म्हाईंभटाच्या चरित्रग्रंथांचे मूल्य निर्विवाद असून हे ग्रंथ सुंदरसुद्धा आहेत; म्हणून या गोष्टीला आणखीच महत्त्व येते यात शंका नाही.

**स्मृतिस्थळ**

चरित्रग्रंथ या नात्याने महानुभाव पंथात 'स्मृतिस्थळ' (शके १२३०)

याही ग्रंथाचे आगळे महत्व आहे. श्रीचक्रधरानंतर महानुभाव पंथाचे कार्य व तत्वज्ञान प्रसारित करण्याचे जोखमीचे उत्तरदायित्व नागदेवांनीच स्वीकारले. कुशल संघटक म्हणून नागदेवाचार्यांचा लौकिक आहे. अशा या थोर संस्थाचालकाचे स्मृतिबद्ध चरित्र म्हणणे 'स्मृतिस्थळ' होय. हा गद्यग्रंथ परशराम, नरेंद्र, मालोबास व गुर्जर शिवव्यास यांनी तयार केलेला आहे. पहिल्या दोघांच्या मूळ लेखनावर नंतरच्या दोघांनी संस्कार केलेले आहेत.

महानुभाव पंथात अनुकरणाने पुढिलांनी वाङ्मय लिहिले, त्यात तुरळक चरित्ररचना झाली आहे. या पंथातील 'चक्रपाणिचरित्र', 'दत्तात्रेयचरित्र' इत्यादी ग्रंथांचे कर्तृत्व म्हाईंभटाकडेच जावे! म्हाईंभट कवी तर होतेच. कारण त्यांनी आरत्या, पदे व 'धवळचां'चा उत्तरार्ध लिहिला आहे.

### उद्धवसुत

इ. स. १७०० च्या सुमारास उद्धवसुत नामक चरित्रकार होऊन गेले. त्यांनी श्रीरामदासांचे चरित्र शके १६९६ च्या पूर्वी लिहिले. सुर्जी-अंजनगाव येथील घराण्यात उद्धवसुतांचा जन्म झाला. या कवीचे वडील मल्हारपंत हे असून उद्धवसुतांच्या आजोबांचे नाव त्र्यंबकपंत असे होते. मल्हारपंतांना समर्थ रामदासांचा अनुग्रह होता.

उद्धवसुतांची गुरुपरंपरा रामदास–माधव–केशव–उद्धव अशी आहे. उद्धवसुतकृत समर्थचरित्राचे ५१ अध्याय आहेत. हे चरित्र ओवीबद्ध आहे. उद्धवसुतांनी काही पदेही लिहिली आहेत.

### गोचरस्वामींचे चरित्र

पुसदचे कवी विठ्ठल किंकर ( १७ वे शतक ) यांचे मुख्य शिष्य चिन्मयानंद हे असून त्यांची शिष्यपरंपरा उमरखेड (जि. यवतमाळ) येथे वाढली. चिन्मयानंदांच्या प्रमुख शिष्यांमध्ये गोचरस्वामी प्रसिद्ध आहेत. गोचर-स्वामींचे चरित्र सदाशिवकृत 'सहजामृत' नामक ग्रंथात आले

आहे. हा ग्रंथ सुमारे ६०–६५ वर्षांपूर्वी छापून निघाला. नाथपंथाची वऱ्हाडातील एक प्रमुख शाखा म्हणून चिन्मयानंदांच्या शाखेची कीर्ती आहे.

**यवतमाळकर महिपती**

मराठीतील प्रख्यात संतचरित्रकार महिपती यांचा मृत्यू शके १७१२ मध्ये झाला. याच दरम्यान ( शके १७१९ की १७११ ? ) 'भक्तरहस्य' नावाचा एक संतचरित्रात्मक ग्रंथ 'यवतमाळकर महिपती'ने लिहिला. या 'महिपती'चे नाव अनंत कवी असे होते. अनंत कवींचा 'भक्तरहस्य' हा ३२ अध्यायांचा ओवीबद्ध ग्रंथ अजून अप्रकाशित आहे. कै. या. मा. काळे यांनी या ग्रंथाचा उल्लेख आपल्या वऱ्हाडच्या इतिहासात दोनतीनदा केला आहे. यवतमाळचे श्री. द. बा. महाजन या ग्रंथाचे संपादन–प्रकाशन करणार होते. परंतु पुढे काय झाले ते कळले नाही.

अनंत कवी मूळचे 'प्रभणी'चे (परभणीचे) असून ते दारव्हा (जि. यवतमाळ) येथे येऊन राहिले. दारव्हा येथे त्यांची समाधी आहे. त्यांचे वंशज दारव्हा येथे अजून आहेत. वरूडचे श्रीस्वामी शिवानंद यांना या घराण्यातील मुलगी दिली होती. अनंत कवीच्या वंशातील सहा पुरुषांच्या समाध्या दारव्हा येथे आहेत.

अनंत कवींनी वैदर्भीय संतांची चरित्रे रसाळपणे लिहिली आहेत. भाषा सरळ, सोपी व उपमाप्रचुर आहे. इतिहासाचीही माहिती अंशतः या ग्रंथावरून मिळते. भोजला–पिंपळगाव येथील संत शिवाजी कुणबी यांची माहिती लिहून कवीने शेतकरी जीवनाचे चित्र हुबेहूब रेखाटले आहे. वाणीचा हुरडा जात्यायेत्या पांथस्थांना खाऊ घालणाऱ्या या पाटीलबुवांचे चित्र ग्रंथकार रेखाटतो––

धैर्यमळ्याहून उभे राहून । विवेक–गोफणीते घेऊन ।।
हाक परमार्थाची फोडून । दिधल्या उडोन कल्पना–चिडिया ।।
कामरोहियास तयाने । मनहरणासी आकलून ।।
द्वेषाचे कावळे उडवून । केले रक्षण कुसीचे ।।

दारव्हा तालुक्यातील नेरपिंपळीचे संत कलग्या महार यांचेही चरित्र सुंदर रीतीनें वर्णिले आहे. मुसलमान सरदाराने छळ मांडला तरी हा डगमगला नाही. कलग्याच्या नावावरून कलगाव पिंपरी हे गावाचे नाव पडले.

बाळकराम, रोकडाराम इ. वऱ्हाडातील प्रमुख तीन समर्थशिष्यांची माहितीही 'भक्तरहस्या'त आली आहे. अनंत कवीच्या विपुल रचनेत आख्याने, पदे व अष्टकेही आहेत. या कवीने ' शिल्पशास्त्र,' 'माधवदासी' ग्रंथही लिहिले आहेत. अनंत कवीचे संपूर्ण ग्रंथ त्याच्या स्वतःच्या हस्ताक्षरात यवतमाळच्या शारदाश्रमात आहेत.

अनंत कवीने दारव्हा येथे मठ स्थापन केला होता. विपुल ग्रंथलेखन करणाऱ्या या कवीची सर्व रचना अजून अप्रकाशित असावी, ही गोष्ट खटकणारी आहे. अनंत कवीला ' यवतमाळकर महिपती ' असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही.

**बखरीतील चरित्रपर माहिती**

विश्वसनीय स्वरूपात नव्हे पण काही प्रमाणात चरित्रांची माहिती देणाऱ्या बखरी वऱ्हाडातही लिहिल्या गेल्या. इतिहासातील घटना रोचकतेने व अतिशयोक्त करून सांगण्यासाठीच बखरी तयार झाल्या. नागपूरकर भोसले यांच्या बखरी, कैफियती लिहिल्या गेल्या आहेत. काशीनाथ राजेश्वर चिटणीस–गुप्ते यांनी लिहिलेली नागपूरकर भोसले यांची बखर शके १७४० मधील आहे. गंगाधर माधवराव चिटणीस, खंडो भगवंत परभू, विनायक आनंदराव औरंगाबादकर इत्यादी बखरकरांनी नागपूरकर भोसल्यांच्या बखरी लिहिल्या आहेत.

**पंचभाई कुटुंबवृत्त**

चांद्याला त्र्यंबकभट पंचभाई नामक गृहस्थाचे कुटुंब इ. स. १७७५ च्या दरम्यान राहत होते. त्या सच्छील कुटुंबाचा वृत्तान्त १००–१५० वर्षांपूर्वी ओवीवृत्तांत शिवरामभट लांडगे नामक कवीने 'पंचभाई

कुटुंबवृत्त' या नावाने लिहून ठेवले आहे. त्र्यंबकभट पंचभाई यांच्या राहत्या घराच्या जागी आता चांद्याला राजेश्वरराव पोटदुखे यांचा वाडा आहे.

चांद्याच्या डोकेबुवांच्या मठात बरीच ग्रंथसंपत्ती असून या परंपरेची माहिती असलेली एक वंशावळ या (गोविंदस्वामींच्या) मठात आहे. याच मठात एक जीर्ण पोथीही आहे. या ग्रंथसंपत्तीचा व माहितीचा उपयोग काही चरित्रसामुग्री मिळण्याच्या दृष्टीने होऊ शकतो.

**आधुनिक काळातील जुने दुवे**

संतचरित्रांच्या गायनाची प्राचीन प्रथा अव्वल इंग्रजीच्या व त्यानंतरच्या दरम्यानकाळी विदर्भात जुन्याच पद्धतीने सुरू राहिली. ठळक उदाहरणे द्यावयाची झाल्यास मुकुंदराज–परंपरेतील नागपूरस्थ श्री रामकृष्णबुवा करताळकर व सीताराम गुर्जर या कवींची नावे उल्लेखावी लागतील. श्री रामकृष्णबुवा करताळकर (१८४५–१९०३) यांचा १११ अध्यायाचा 'सच्चरितमालिका' या नावाचा ओवीबद्ध ग्रंथ आहे. त्यात १०९ संतचरित्रे आली आहेत. या ग्रंथाच्या प्रत्येक अध्यायात १११ ओव्या आहेत.हा ग्रंथ शके १८०७ मध्ये (इ. स. १८८५) पूर्ण झाला. या ग्रंथात गणोबा महाराज, हरी महाराज, भंडाऱ्याचे अमृत महाराज इत्यादी संतांची माहिती आली आहे करताळकरबुवांची काही कीर्तनोपयोगी आख्याने असून ते नागपूरकर भोसल्यांचे आश्रित होते. हे संगीतज्ञ व कीर्तनकार होते. मोहोपा (जि. नागपूर) येथील संत तुकारामबुवा व यांची भेट झाली होती.

संतचरित्रांची माहिती पुरविणारा या काळातील दुसरा महत्त्वाचा ग्रंथ 'भक्तमहिमामृत' हा होय. या ग्रंथाचे कर्तेपण सीताराम कवी गुर्जर यांच्याकडे आहे. रसाळ व ओघवत्या ओव्यांमध्ये विर्दभ परिसरांतील ५७ संतांची चरित्रे या ग्रंथात आली आहेत. त्यावरून आर्वीच्या संत मायबाई, घुईखेडचे बेंडोजीबाबा इत्यादी अनेक आधुनिक संतांची–विशेषतः १८ व्या व १९ व्या शतकातील संतांची–दुर्मिळ माहिती

मिळण्यास मदत झाली आहे. हा ग्रंथ वर्धा येथून इ. स. १८९९ झाली प्रसिद्ध झाला.

विदर्भातील उपलब्ध प्राचीन चरित्रलेखन हे असे आहे. याशिवाय आणखी काही चरित्रकार संभवू शकतात. पण महाराष्ट्र सारस्वतातील अनेक कवीच्या स्थळकाळाची ( विशेषत: स्थळांची ) माहिती मिळेपर्यंत तसल्या कवींना विदर्भात ओढण्यात अर्थ नाही.

" गावकरी "
दि. ५-४-१९६४

# ६. माणुसकीची गोष्ट

ऋणमोचन येथे माणुसकीची एक नवी गोष्ट (अर्थातच माझ्या दृष्टीने) पाहण्याचा योग परवा आला. ठरवून ही गोष्ट घडली नव्हती. येणार येणार म्हणून गाजलेली अष्टग्रही ज्या तारखांना पडत होती त्याच तारखांना योगायोगाने घराबाहेर पडण्याची संधी आली ३ फेब्रुवारी १९६२ ला मुर्तिजापूरचे डॉ. दोंदे हे प्रा. गुणवंराव काळे यांच्या निमंत्रणावरून वरखेडला जाण्यासाठी अमरावतीस आले. त्यांच्याबरोबर निघून थोडा वेळ मोझरी आश्रमात थांबून आम्ही वरखेडला गेलो. परमहंस आडकुजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या वर–खेडभूमीत श्री संत तुकडोजी महाराजांच्या आई कै. माता मंजुळा यांचा पुण्यतीथी–महोत्सव होता. यावेळी या उत्सवाला मी दुसऱ्यांदा आलो होतो. पाचसहा वर्षांपूर्वी एकदा आलो होतो तेव्हा एक नवीन गोष्ट मी तिथे पाहिली होती. समाजाला चांगले वळण लावण्यासाठी तुकडोजी महाराजांना समयस्फूर्त योजना सुचतात याचे प्रत्यक्षीकरण मी त्यावेळी पाहिले होते कोणत्याही समारंभास लहान मुले हजर असतातच ! ती बहुधा एकत्र, विशिष्ट ठिकाणी बसविली जातात. मोठ्यांप्रमाणे अशा गंभीर कार्यक्रमात लहान मुले रस घेऊ शकत नाहीत. ती मधेमधे गडबड करतात. त्या दिवशी महाराजांनी एक नवीन योजना केली. त्यांनी एका मोठ्या माणसासमोर एका लहान मुलाने बसावे असे सुचविले. त्याप्रमाणे ताबडतोब अमलात आले. सगळी लहान मुले एकत्र न बसता अशी विखुरली गेली. फलतः कार्यक्रमात शांती आणि गांभीर्य कायम राहिले.

अशा लहान लहान सामाजिक बाबतीत लक्ष घालून समाजात शिस्तीसारख्या बाबी रुजाव्या म्हणून धडपडणाऱ्या तुकडोजी महा–राजांच्या माणुसकीची — मानवता धर्माची—ग्रामधर्माची एक गोष्ट यंदाही पाहायला मिळाली. कदाचित ती आधीपासून चालू असेल; परंतु कटाक्षाने यावेळी माझ्या लक्षात आली. व्याख्यानाचा व भजनाचा कार्य-क्रम संपल्यावर ज्या पद्धतीने भोजन झाले तीही माणुसकीची एक नवी-नच गोष्ट वाटली. सार्वजनिक कार्यक्रम म्हटला आणि त्याप्रीत्यर्थ होणारे सामुदायिक भोजन करावयाचे म्हटले म्हणजे किती यातायात आणि खटपट करावी लागते ते सांगावयास नकोच. वर्गण्या, धनधान्य, तिखट, मीठ, लाकडे, भांडीकुंडी, पोळपाट, लाटणी, स्वयंपाकी आदींची जमवा-जमव करणे म्हणजे महा कठीण कर्म ! ही सारी यातायात चुकविण्या-साठी महाराजांनी केली एक युक्ती ! वरखेडचे लोक तर महाराज, आडकुजी बाबा, माय मंजुळा यांचे भक्तच ! महाराजांनी सांगावे आणि लोकांनी ऐकावे हे ठरलेलेच ! (एरवी इतर कोणत्याही खेड्यात अशी माणुसकी आढळतेच. ) महाराजांनी गावातील प्रत्येक घरातून काही भाकरी उत्सवाच्या जागी आणण्यास लोकांना सुचविले. सांगण्याचीच, देर गावातील प्रत्येक घरातून जाड्या जाड्या गावठी भाकरींचे ढीग उत्स-वाच्या जागी गोळा झाले. एकदोन दात्यांनी स्वखुशीने, मोठ्या प्रेमाने दिलेल्या डाळीची डाळभाजी करण्यात आली. अशाच तऱ्हेने आलेल्या तिखट कांद्याची चटणी तयार झाली आणि त्यावर तेलघाणीचे वऱ्हाडी जवसाचे तेल ! हा अभिनव पाहुणचार खाण्यासाठी खेड्यापाड्याचे लोक, सेवामंडळाची माणसे, बायाबापड्या आणि याच लोकांच्या पंक्तीला सौ. उषाताई कोलते, विमलाताई ठकार, सौ. इंदिराबाई दोंदे, सौ. कोतवाल, सौ. हिराबाई बोके, सौ. केचे आणि पुरुषांच्या पंक्तीत डॉ. वि. भि. कोलते, डॉ. दोंदे, प्रि. कोतवाल, बोके मंडळी, प्रा. केचे इत्यादी मोठमोठी मंडळी महाराजांबरोबर बसलेली ! जवसाच्या तेलाला दुरूनच पाहून नाके मुरडणारे हे सारे त्यावर ताव मारताना आणि झणझणीत तिखट भाजीबरोबर जाड्या जाड्या भाकरी सहजतेने

पचविताना पाहून माणुसकीचा खरोखरीच पुन्हा प्रत्यय आला! खर्च नाही, व्याप नाही, आटापिटा नाही, काही नाही! भारताचे असंख्य लोक जे जीवन प्रत्यही जगतात त्या जीवनाचे हे धडे! खेड्यापाड्यांना माणसात आणण्यासाठी चाललेल्या ह्या माणुसकीच्या प्रयत्नांना पाहून कोण भारावणार नाही?

अशीच एक माणुसकीची आणखी गोष्ट दुसऱ्याच दिवशी म्हणजे ४।२।६२ रविवार रोजी ऋणमोचनला पाहण्याचा योग आला. आधल्या दिवशी शनिवारी वरखेड–कौंडण्यपूरहून परतताना मोझरीला महाराजांचे चिटणीस ॲड. दादासाहेब चव्हाण यांची भेट झाली. रुग्णशय्येवर असलेले दादा, डॉ. दोंदे आणि डॉ. जयस्वाल यांच्याशी हसून बोलले त्यावेळी कल्पनाही आली नाही की ते चारपाच दिवसांतच इहलोक सोडून जातील! नियती मोठी विचित्र आहे. जराजर्जरता कुणालाच सुटलेली नाही. महाभयंकर रोग आणि काळ कुणाचा घास केव्हा गिळील ते सांगता येत नाही . . .

. . . ऋणमोचनाला दुसऱ्या दिवशी जे पाहिले ते होते मृत्यूशी झुंजण्यास्तव दिलेले आव्हान! महारोग! महान उपेक्षेने ज्यांच्या जीवनाची काळी ठिक्कर राखड आली आहे, असे शेकडो पीडित ऋणमोचनला जमले होते. दुपारपर्यंत हळूहळू त्याची संख्या वाढत होती. येशू ख्रिस्ताभोवती दीनवाणे महारोगी नेहमी असेच गोळा होत असत. ऋणमोचनलाही एक ख्रित होऊन गेला. गाडगेबाबा त्याचे नाव! खेड्यापाड्यातील दीन दलितांना सन्मार्गाला लावणाऱ्या या पुण्यश्लोक महात्म्याने केलेल्या अनेक कार्यांपैकी एकाचे दर्शन आम्हाला त्या दिवशी घडले. ते कार्य म्हणजे दीनदुबळ्यांना, आंधळ्या–पांगळ्यांना, लुळ्यालंगड्याना, महारोगपीडित जर्जरांना अन्नदान आणि अशाच दुःखितांना वस्त्रदान!

पाहताना हृदये हेलावून जावीत असा तो प्रसंग! १९२० सालापासून गाडगे महाराजांनी शेतकऱ्यांच्या दानावर हे अन्नसत्र सुरू केले. पौष महिन्यातील एका रविवारी गाडगे महाराज येथे आले की सारे

महारोगी जमा होत. दोर बांधून तयार केलेल्या चौकोनी पटांगणात शोभेसाठी लावलेल्या झाडांच्या खांबामध्ये शेकडो आंधळेपांगळे आणि महारोगी बसविले जात आणि 'गोपाला ऽ ऽ गोपाला ऽ ऽ देवकीनंदन गोपाला'च्या सुरात तो कार्यक्रम तेव्हा होई. तो पाहण्याचे भाग्य आम्हाला गाडगे महाराजांच्या पश्चात लाभावे असा यंदा योग होता. महारोगी आणि आंधळेपांगळे लांबलांब ओळीत शिस्तीत बसले होते. गाडगे महाराजांचे पुत्र, काही शिष्य, मुर्तिजापूरचे अच्युतरावदादा देशमुख ही मंडळी 'देवकीनंदन गोपाला'ची धून गात होती. जमलेले सारेच त्याला साथ करीत होते. एकजण डफ वाजवीत होता. त्यातूनही भजनाचेच सूर बाहेर पडत होते. बकर बकर डोकी खाजविणाऱ्या रोगी बाया, नाकातोंडाचा मागमूस नसलेले, हातापायाच्या बोटांची बुरखुंडी झालेले महारोगी टाळचा वाजवून तोंडाने मोठचाने भगवंताला हाक देत होते. त्यांच्याकडे पाहून करुणा उफाळून यावी इतके ते भयानक दृश्य ! त्या भयानकतेला आवर घालणारा तो 'गोपाला गोपाला'चा छंद ! आणि हे सारे पाहण्यासाठी बाजूच्या व्यासपीठाशेजारील चांगल्या तढवावर साजऱ्या-साजऱ्या कपडचांतील आमच्यासारखी पाचपन्नास बडी धेंडे बसलेली ! बायका, मुले पुरुष सारीच बडी, श्रीमंत नि शिकलीसवरलेली !

एकीकडे 'देवकीनंदन गोपाला'चे भजन चालले होते आणि त्याच वेळी व्यासपीठावर नव्याकोऱ्या लुगडचांच्या थप्प्या रचल्या जात होत्या. त्याचबरोबर ढुशांचा ढीग रचल्या जात होता आणि मध्ये स्वेटर्सचा डोंगर ! जणू काही विक्रीसाठी दुकानात माल रचणे सुरू होते. हजारो रुपये किंमतीचा तो माल वऱ्हाडच्या शेतकऱ्यांच्या आणि दानदात्यांच्या देणग्यांमुळे येऊन पडला होता. धर्मासाठी धर्म करण्याची ईर्षा लागलेल्या काही दानदात्यांची उदाहरणे वगळली तर हे सारे वऱ्हाडी शेतकऱ्यांच्या दातृत्वावरच घडले होते. मूर्तिजापूर, अमरावती आणि दर्यापूर या तालुक्यांच्या सीमाकेंद्रावर असलेल्या या ऋणमोचनला या तिन्ही भागातील शेतकरी गेली कित्येक वर्षे असेच जमतात. त्यात त्यांचे अंतःकरण असते. ओलावा असतो. गाडगेबाबांचे गाव दापोडा येथून दोन

मैलांवर आहे. दोन तपांपूर्वी या ऋणमोचनला निसरड्यावरून पूर्णेच्या पाण्यात घरंगळत जाण्याची पाळी यात्रेकरूंवर येत असे. गाडगेबाबांनी तिन्ही बाजूंनी पूर्णेने वेढलेल्या या बेटासारख्या जागेला चित्कळा आणून दिली. घाट बांधले, धर्मशाळा उघडली. अन्नसत्र चालविले. त्यातलाच हा महारोग्यांचा कार्मक्रम !

सगळे रोगी, आंधळे, पांगळे शिस्तीत बसल्यानंतर काही वेळ भजनकऱ्यांनी डफासहित ओळीओळीतून रामधून फिरविली. नंतर ते बोंवल्याजवळ भजन करीत थांबले. श्री. तिडके यांनी व्यासपीठाजवळ आरामात बसून ही सारी गंमत पाहणाऱ्या व्यक्तीतील एकाएकास उठवून पंक्तीत नेले. मघाशी रचलेल्या थप्प्यांतून एकाएका ढुशाची घडी उलगडून त्या व्यक्तीच्या हाती दिली आणि पंक्तीतील एकाएका माणसाच्या अंगावर प्रेमाने पांघरावी म्हणून विनंती केली. त्यानुसार सगळ्याच बड्या मंडळीकडे ते कार्य आले. पंक्तीत स्त्रियांना नऊवारी लुगडी पांघरविण्याचे काम बड्या स्त्रियांनी स्वखुशीने पत्करले. लहान मुलांना स्वेटर्स देण्यात आले. सुमारे ३५० । ४०० लोकांची अशा रीतीने सोय करण्यात आली. आंधळ्यांना काठ्यांची देणगी, तर बऱ्याच जणांना डालड्याचे स्वच्छ रिकामे डबे देण्यात आले.

महारोग्यांचे जीवन म्हणजे माळरानावरच्या मातीपेक्षाही निपट्टर. त्यांना कपडालत्ता कोण देणार ? गाडगे महाराजांनी ही मूलभूत गरज ओळखली. आंधळ्याला काठीचा आधार देणारे गाडगेबाबा खरोखरीच महापुरुष होते.

हे दृश्य पाहून हृदयात काहीतरी निराळे कालवीत होते. माणुसकीच्या एका नव्या गोष्टीचा साक्षात्कार नव्यानेच होत होता. पंढरपूर आणि ऋणमोचन येथे अशा तऱ्हेचा हा कार्यक्रम गाडगेबाबांनी गेल्या कित्येक वर्षांपासून सुरू केला आहे. ज्यांची कुणी व्यवस्था करू शकणार नाही, त्यांच्या गरजेसाठी गाडगे महाराज गेल्या अनेक वर्षांत खपत आले आहेत. आजच्या दिवशी वाटलेले हे कपडे त्या गरीबांना वर्ष सहा महिने पुरत. हे मायेचे पांघरूण देणारा हा पिता मात्र स्वतः आयुष्यभर

चिंध्या नेसून राहिला. त्याच्या या महान् कार्याची काळजी करणारा वर्ग होता कुठे ? पत्रकारांपैकी येथे कोणी फिरकत नाही. छायाचित्रकारांना त्यातली सामाजिकता समाजातल्या तथाकथित उच्चशिक्षितांना पोहच-वावीशी वाटत नाही. ५–१० माणसांच्या घरगुती कार्यक्रमांच्या जाहिरा-तीचे पेव वर्तमानपत्री जगात प्रत्यही फुटते. न होणारे कार्यक्रम छापले जातात व २–४ श्रोत्यांच्या सभेला प्रचंड जनसमूह उपस्थित असल्याच्या वार्ता झळकतात. ‘ बोलाचाच भात बोलाचीच कढी’च्या जगात गाडगे महाराजांसारख्यांनी केलेल्या ह्या माणुसकीच्या गोष्टींची जाणीव करून घ्यायला आम्ही अजून तरी तयार झालो आहोत काय ? फार कशाला, मी व डॉ. दोंदे इतक्या जवळ असूनही हे सारे पहिल्यांदाच बघत होतो ! सामाजिकतेकडे पाठमोरे होऊन आम्ही आपल्या जीवनात कसे गढलेले असतो, याचेच हे प्रतीक नव्हे काय ?

असेच काहीसे विचार डोक्यात भ्रमत होते. पंक्तीतील सगळीच मंडळी खुश होती. कपड्याबरोबरच आज त्यांना चारीठाव जेवण वाढ-लेले होते. वरण, भात, पोळी, भाजी, तिळाची चटणी आणि बुंदीचे लाडू. वाढण्याचा कार्यक्रम संपतासंपता भारावलेल्या मनांनी आम्ही त्या चौकातून बाहेर पडलो. डोक्यात मात्र पुन्हापुन्हा येत होती तीच–माणुसकीची गोष्ट !

“ श्रीगुरुदेव ”
मार्च १९६२

# ७. श्री संत आडकुजी महाराज

नित्यंभक्तिरतो विशालहृदयो सावाडकूजीपदम् ।
संपूर्णात्मगतिर्यशो लभतसः पूज्यः सदा योगिभिः ।।
सौजन्यं वरखेड–मानवकृतो देवप्रभावैर्युतः ।
सर्वं सौम्यनयो नदी जलनिधेर्धर्माय वै राजते ।।

असे उद्गार ज्या सत्पुरुषाबद्दल हृषिकेश येथील श्री ओंकारस्वामींनी भक्तिभावाने काढले ते श्री आडकोजी महाराज विदर्भातील एक महान विभूतिमत्व असलेली शक्ती होती, हे अनेकांना ज्ञात आहे. अनेक संतमुनींनी त्यांच्याबद्दल आदरोद्गार काढले आहेत. पं. वासुदेवशास्त्री सिन्नरकरांनी म्हटले आहे—

श्री अडकोजी सद्गुरुपदकमली चित्तभृंग अडकोजी ।
पडको जीव स्वसुखा सुरसा संसारताप–रडकोजी ।।

महान योग्यतेचे प्रख्यात संत श्री गुलाबराव महाराज हेही एकदा वरखेडला या महात्म्याच्या दर्शनास गेले होते. त्यांनी यथार्थोद्गार काढले—

पापे करुनी झाली कलिमाजी नरभूतांचि वाढ खुजी ।
यास्तव जन ताराया झाले अवतीर्ण संत आडकुजी ।।

आडकोजींचे सारेच चरित्र अद्भुतरम्य आहे. त्यांचा जन्म इ. सन १८२० साली कार्तिक पौर्णिमेला दुपारी १२ वाजता झाला. वडिलांचा धंदा कासाराचा होता. राहते गाव वर्धा जिल्ह्यातील आर्वी हे होते.

आर्वीला मायबाईची आर्वी किंवा तेलंगरायाची आर्वी असे म्हणत असत. आताही काही लोक म्हणतात.

लहानपणापासूनच या बालसंताच्या नानाप्रकारच्या विचित्र लीला प्रत्ययास येत होत्या. बाळपणही अतिशय खडतर असेच गेले. घरच्यांचा मोह त्यांना कधीच वाटला नाही. भटकभटक भटकणे व खेळखेळ खेळणे यातच त्यांना आनंद वाटे.

या वेडपट मुलाची आई तो पाच वर्षांचा असतानाच मरण पावली. तरीपण तिच्या शोकात तो मुळीच गुरफटला नाही. त्याची वेडसर वृत्ती कमी झाली नाही.

मुलगा ताळ्यावर येईल या अपेक्षेने त्याचे लग्न १८ व्या वर्षी करून देण्यात आले. ही घटना इ. स. १८३८ मधली आहे. परंतु या लग्नामुळे आडकुजी अधिकच मुखजड झाला. तो एकांतप्रिय बनला. त्याला कशातच रुची वाटेना. त्याला कुणी काही शिकविले तर तो मनावर घेईना.

लग्न झाले त्याच वेळी संसारदृष्टचा ते 'नग्न' झाले. कपड्यांचीही त्यांनी काळजी बाळगली नाही. सडेफटींग असे ते भटकू लागले. कशा-चीच शुद्ध वा मोह त्यांना नसायचा. वेड्याप्रमाणे स्वतःशी हसत, पिशा-चवत् बडबडत वा लहान मुलाप्रमाणे खुशाल खेळत बसत. घरच्यांची किंवा बाहेरच्यांची तमा त्यांनी कधीच बाळगली नाही. आर्वी येथे जन्मलेल्या ह्या बालवृत्तीच्या तरुणाची 'स्थिति नग्न दिगंबर बरवी, श्यामसुंदर रूप दावी, लोकांलागी' अशी झाली. 'घरदार सर्व नाराज तयाचे वरी, कुणी बरे पाहिना, नग्नरूप वावरी' असा तो त्यांच्या जीवनाचा काळ होता.

अशा अवस्थेत त्यांच्या आयुष्याचा तप दीडतपाचा काळ निघून गेला. विदेही अवस्थेत भटकणे एवढाच त्यांचा जीवनक्रम होता. फक्त ईश्वर साथीला होता व त्याचेच नाव फार तर त्यांच्या तोंडात येत असे.

इ. स. १८५० च्या नंतर म्हणजे तिशी उलटल्यानंतर आडकुजींची

२०१२ निबंध
२१६८९



मौनवृत्ती अधिक वाढली. आधीच ते कमी बोलत. पुढेपुढे तेही कमी होऊन ते 'शांत' झाले. तरीपण मूळची बालवृत्ती मध्येमध्ये उफाळून येई.

यावेळीं विदर्भातच नव्हे तर पंढरपुरात कीर्ती पसरलेल्या मायबाई नामक संतमहिलेचा आर्वीत मठ होता. मायबाईची आडकुजी कधी-मधी टिंगल करीत असत. अर्थात दोन शब्द बोलण्याची लहर लागेल तेव्हाच !

एकदा आर्वीच्या बुटीवाडयाजवळ आडकुजी भर दुपारी नदी-जवळच्या पिंपळाखाली एकटेच गोळया खेळत बसले होते. मायबाई दोन-चार सद्‌भक्तांबरोबर गावोगाव किंवा गावात हरिनाम-कीर्तनप्रचारार्थ हिंडत असत. त्या दिवशी त्या तशाच परत येत होत्या. त्या वाटेने येत असताना आडकुजी जोराने ओरडले, "ब्रम्ह रे ब्रम्ह !" डोकीवर केस न ठेवणाऱ्या मायबाईला ते हसून म्हणाले, "टवळे, मला दाखवतेस का ब्रम्ह ?"

मायबाई थांबून म्हणाल्या, "अरे आडक्या, वेडा होशील रे ! "
"अरे धुत्" आडकुजी म्हणाले, "तुझी काय बिशाद आहे मला वेडा करायची ?"

वस्तुतः असे हे खटके नेहमीच मायबाई-आडकुजी यांच्यामध्ये होत असत. परंतु अजून 'प्राप्त काळघडी' आली नव्हती. त्यामुळे मायबाई हसून निघून जात असत. यावेळी मात्र तसे झाले नाही. मायबाईंनी त्यांच्याकडे एकटक रोखून पाहिले व मनातल्या मनात किंवा ओठातल्या ओठात त्या काहीतरी पुटपुटल्या.

आणि, आश्चर्य हे की त्याच क्षणाला आडकुजींची वृत्ती एकदम पालटली. त्यांची अवस्था 'उन्मन' अशी झाली. त्या उन्मनी अवस्थेत ते 'हांडी रे हांडी', 'दवडी रे दवडी' असे असंबद्ध काहीतरी बडबडत धावू लागले. कुठेतरी थांबून उष्टी शिते खाऊ लागले. नालीचे घाण पाणीच पिऊ लागले. 'गुरुमहाराज येतील, साक्षात्कार देतील !' असे म्हणत सारखे नाचू लागले. हा सर्व प्रकार पाहून आडकुजीला काही

राठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वामित्व
क्रमांक ७४५५९..... दि: ..निबंध

भूतबाधा झाली असावी म्हणून मंत्रतंत्र, गंडेदोरे हे सारे प्रकार करण्यात आले. पण त्यांचा काहीच उपयोग झाला नाही. उपयोग होणार कसा?

या अवस्थेतच लोकांनी आडकुजीला मायबाईकडे नेले व दाखविले. मायबाईंनी सुहास्य वदनाने त्यांना न्याहाळले "घाबरू नका. निवळेल ही दशा अगदी आपोआप!" त्यांनी आश्वासन दिले.

अशा तऱ्हेने 'मायबाईचा कृपाप्रसाद' आडकुजींना लाभला. मायबाई त्यांच्या 'गुरू' ठरल्या.

गुरुपरंपरेच्या दृष्टीने आडकुजी महाराज ज्ञानदेवाच्या नाथसंप्रदायात येतात. श्रीशंकरापासून उद्‌भूत झालेल्या अतिप्राचीन आणि अतिसनातन अशा नाथसंप्रदायाने मानवी उत्क्रांतीच्या अनेक टप्प्यात वेळोवेळी महत्वाची कामगिरी बजावली आहे. गुरुदेवतेला प्रमुखस्थान असलेल्या आणि योगाला महत्व असलेल्या ह्या पंथाचे अंतिम ध्येय सांख्याची अनुभूत ज्ञानसिद्धी आणि वेदांत हे आहे. भगवान श्रीकृष्णाने प्रतिपादन केलेली मानवी पूर्णता म्हणजेच स्थितप्रज्ञता आणि तिचे साधन म्हणजे सांख्यनिष्ठा, लोकसग्रह आणि बुद्धियोग हे या संप्रादायाचे उद्दिष्ट असून देशकालस्थितिनुरूप सृष्टिपरिवर्तनाप्रमाणे पूर्णपणे स्वतंत्ररीत्या कार्य करणे हेच ह्याचे वैशिष्टच होय.

या संप्रदायातील आडकुजी महाराज हे सहजसिद्ध परमहंस पुरुष होते. या सहजयोग्याच्या गुरू मायबाई यांच्या मठात आर्वीला ही गुरुपरंपरा आदिनाथ, केदारनाथ, मच्छेन्द्रनाथ, गोरखनाथ, गहिनीनाथ, निवृत्तिनाथ, ज्ञाननाथ (ज्ञानेश्वर), त्यांच्या समाधीतून मंत्र मिळविणारे हैबतीनाथ व नंतर त्यांच्याच माळेत निकालस महाराजांच्या परंपरेत 'मायबाई' अशी दिलेली आहे.

दुसरीकडून हीच गुरुपरंपरा आदिनाथ–अत्री–श्रीदत्तात्रेय–जनार्दन–स्वामी–एकनाथ महाराज–केशवबुवा–बुद्धपुरी गोसावी–घुईखेडचे बेंडोजीबुवा–रामजीबुवा–बगाजी महाराज– सीतारामबाबा– मायबाई अशी आहे. अर्थात हा दत्तपंथाचा वारसाही त्यांना मिळालेला आहे. ही गुरुपरंपरा गुर्जरकविकृत 'भक्तमहिमामृत' या ग्रंथात आली आहे. याच

ग्रंथात मायबाईचा उल्लेख 'आदिमाया मुक्ताबाई' असा केलेला आहे, तो सार्थच म्हणावा लागेल.

मायबाईच्या कृपाप्रसादानंतर आडकुजींची वृत्ती अधिक गंभीर झाली. मायबाईंचा वरदहस्त लाभल्यामुळे पावन झालेला हा अलमस्त फकीर अलमस्त अवस्थेत सर्वत्र संचार करू लागला. 'आधि सूक्ष्म मग प्रकट ज्योति लखलखाट नयनावरी' अशा अवस्थेला ते पोहोचले. प्रखर वैराग्यवृत्ती वाढली. रानोरान भटकणे सुरू झाले. मानपान सुटला. कुणाला छदामदेखील कधी मागितला नाही.

सुख मनी, खांदि घोंगडी, शिकाळी करी।
नच स्थान नेमिले, कुठे पडे भूवरी ।।

अशी त्यांची यात्रा आरंभ झाली. कोणी पाया पडायला आला की दूरदूर पळू लागत. अंगास वस्त्र म्हणून तदनंतर त्यांच्या अंगावर कुणीच पाहिले नाही. भाविकांनी कधीकधी चढविलेला क्षणैक वेषही त्यांनी अंगावर फारसा राहू दिला नाही. नेहमी दिगंबर अवस्था असावी! मुलेबाळे मागे लागून नेहमी कुटाळक्या करायची! चाळीशीच्या आगेमागे असलेले आडकुजी त्यावेळी आपल्याच आनंदात मग्न असत.

भटकत भटकत आडकुजी महाराज वयाच्या ६४ व्या वर्षी म्हणजे सुमारे १८८४ इसवीच्या सुमारास वरखेड नामक अमरावती जिल्ह्यातील एका गावात येऊन स्थिर झाले. हे गाव वर्धा जिल्ह्यातील आर्वीपासून सुमारे १० मैलांवर आहे. वरखेडला येण्यापूर्वी बरीच वर्षे ते अज्ञात व ज्ञात भागात भटकले. दूरदूर पळणारे हे अवलिया पुरुष पाहून आर्वीनजीकच्या दहेगाव येथील खानबहादूर मुसलमानाने त्यांना आपल्या घरी नेऊन गोमांस वाढले. त्यामुळे आडकुजी महाराज चिडले, बावरले व शिव्याशाप देतदेत उठून पळाले. असे सांगतात की त्यानंतर एकच वर्षाच्या आत त्या मुसलमानाच्या घरी कुणी दिवा लावायलासुद्धा जिवंत राहिले नाही. तेव्हापासून आडकुजींच्या मुखात फक्त शिव्याच

बसल्या की काय न कळे ! त्यानंतर ते आर्वीकडे न जाता भटकन्ती-नंतर वरखेडला येऊन स्थिर झाले ! तुकडोजी महाराजांनी म्हटले आहे--

आले वरखेडी, गेले नाही पुन्हा ।

वरखेडात आल्यावर कोणी त्यांच्याशी बोला की त्यांच्याजवळ बसा, ते कुणाशी लहरीवाचून बोलत नसत. प्रथम प्रथम वरखेडवासी-यांना आडकुजींची फारशी माहिती नव्हती. त्यांची निसर्गवृत्ती व विरक्त राहणी पाहून लोक त्यांचेकडे आकर्षिले जात असतानाच लोकांना त्यांचे काही 'चमत्कार' प्रत्ययाला आले–

बहुत दिन ऐसे जाता ।
अडथळा करूनि अनुभव घेता ।
वाटे चमत्कार जना तत्वता ।
आडकोजीस पाहोनिया ॥

आडकुजी महाराज कधी कुणाला शिव्या देत, कधी आपल्याशी बोलत, कधी वाऱ्याशी ! पण बोलल्याप्रमाणे प्रत्यय येत. त्यांनी स्वत: चमत्कार म्हणून काही केले नसले तरी लोकदृष्टया जे असामान्य घडलें त्यालाच लोकांनी चमत्कार म्हटले ! लहान मुलांचा लोभ असलेले आडकुर्जी कधीकधी उर्दू, मराठी व हिंदीत वेदांचे संकेत बोलून दाख-वीत असा 'संतसंघमाले'त उल्लेख आहे. त्यांच्या शब्दांना सामर्थ्य होते, एवढे मात्र खरे ! कारण त्यांचे शद्ध बरेचदा खरे झाल्याचे लोक अनुभवीत ! त्यांच्या अशा गोष्टींमुळे त्यांची कीर्ती गावोगाव पसरली व वरखेडवासीयांनी 'एकमते करुनी । स्थापित केले समर्था निशिदिनी !'

जैसी गोकुळी मूर्ति अवतरली ।
भक्तमंडळी आनंदली ।
की स्वर्गी दुमदुमली ।
सेना इंद्रदेवतेची ॥

अशी त्यांची वरखेडात पूजा होऊ लागली !

एकदा एक बारी पाने विकायला चालला असताना तो आड-कुजींच्या दर्शनास थांबला. तेव्हा महाराजांनी त्याचा हात धरून ठेवला. त्याला घाई होती. नंतर महाराजांनी त्याचा हात सोडला व म्हणाले, " जाय अढावा ! " रस्त्यात त्या बाऱ्याला नंतर एक साप आढळला. तो निघून चालला होता. महाराजांचीच ही कृपा असे तो बारी व लोक समजू लागले. महाराजांमुळे तो जणू वाचला ! तेव्हा-पासून लोक बाबांच्या दर्शनावाचून कुठेही निघत नसत.

एकदा मातामायला पाणी घेऊन बाया चालल्या होत्या. महाराज म्हणाले, " कुठली देवी ? टाका माझ्या डोक्यावर पाणी ! " श्रद्धाळू बायांनी तसेच केले. त्या ' देवी'च्या रोग्याची मात्र प्रकृती त्यामुळे नंतर सुधारू लागली म्हणतात !

एकदा वरखेडच्या नदीला पूर आला. तो चढला. बाबांच्या पायां-पर्यंत आला व परत फिरला ! पूर ओसरल्याचा आनंद लोकांना झाला. महाराजांना मात्र पुराची कल्पनाच नव्हती. पाण्याचे धक्के लागताच ते म्हणाले, " कोन हाय बे ? " त्यांना त्याचीही नीट कल्पना आली नाही. एकदा तर महाराज वाहत गेले व गाळात फसले तरी त्यांना त्याची कल्पनाच आली नाही.

या अशा अनेक आठवणी वरखेडवासी अनुभवी सांगतात. बाबांची स्थापना लोकांनी केली. गाडी आली. दिवा आला. सकाम भक्तांची गर्दी वाढली. लोक ताटे आणू लागले. कुणी भागवत-पुराणे वाचू लागले. भजने होऊ लागली. कुणी नस–चिलीम त्यांना देऊ लागला. त्यांच्या ताटात कुणीही जेवत. आडकुजीबाबा स्वतः भाविकांना भरवीत. ते एकटे कधीच जेवले नाहीत. मांजरे, कुत्री, शेळ्या, मेंढ्या हेही त्यांच्या-सोबत कधी त्या ताटात जेवत. कधी महाराज पूर्ण जेवत, कधी तसेच उठत किंवा ताट फेकून देत. भूक लागली तर कधी फळे वेचून खात. कधी तोडून खात. कुत्र्यामांजराने अन्न लांबविले तर म्हणत, "ज्याचे

त्याने नेले ! " कोणी बाई दिसली व भूक लागली असली तर म्हणत, "हाय कावो काही खायले ! " ती बाई धुणी धुवायला चालली असली तरी टोपले टाकून घरून काहीतरी आणून देई. कधी ते विचारीत, "हाय का सुपारीच खांड ? हाय का नस ? " त्यांचा प्रत्येक शद्व गावकरी झेलत असत. त्यांच्या शिव्या, त्यांचे शद्व यांचा राग गावकऱ्यांना कधीच आला नाही. अजूनही त्यांना पाहिलेल्या लोकांच्या डोळचांतून त्यांच्या लीला आठवताच पाणी येते. त्यांची हृदये भरून येतात.

आडकुजी महाराजांची शरीरयष्टी धिप्पाड होती. अंगावर चैतन्य विलसत असे. अंगावरील केशरचना सुवर्णासम शोभा देई. तनूचा कोमलपणा उतारवयातही गोजिरवाणा वाटत असे. त्यांचे हात आजानू होते. त्यांची कमलांकित ऊर्ध्वदृष्टी जगाकडे पाहत असूनही पाहत नसे.

सरळ लवचिक नासिका बरी ।
चैतन्य प्रकटली दृष्टि फाकली, टकमका पुरी ।।
नग्नांग तनू, स्वच्छता शरीरावरी ।
लल्लाटी गंध परिपूर्ण दिसे केशरी ।।

–अशा या महापुरुषाकडे अनेक संतमुनींची रीघ लागलेली असायची. एकदा संत श्रीगुलाबराव महाराजही त्यांच्या भेटीला गेले होते.

भाविक भक्तजन त्यांना बुधवारी व शनिवारी स्नान घालीत असत. लोक आरतीही नियमाने करू लागले. त्यावेळी मंगलवाद्ये वाजविण्यात येत असत. 'या तरा तरा, मन शुद्ध करा' असा ध्वनी त्यांच्या रोमरोमातून उमटत असल्याचा भास जमलेल्या लोकांना व्हायचा !

या परमहंस संतपुरुषाबद्दल श्री तुकडोजी महाराजांनी उद्‌गार काढले आहेत–

गुरु आडकोजी भये निर्वानी ।
जिसने ब्रम्हीसे ब्रम्ही पछानी ।
मस्त आँखोंकी प्रेम–निशानी ।
डुले डुलत गये रूप जानी ।
भये मुक्त, रखे जग आसी ।।

वरखेड येथे तुकारामपंत ब्रम्हभट्ट हे सज्जन गृहस्थ राहत होते. त्यांची मुलगी मंजुळा ही यावली येथील बंडोजी ठाकूरांना दिली होती. मंजुळा आपले बंधु गोविंदपंत यांचेकडे नेहमी माहेरास येई. गोविंदपंत आडकुजींचे भक्त होते. एकदा बाबांच्या दर्शनाला सासरी पाठवताना मंजुळेला नेले, तेव्हा ते आंबे चोखत होते. तिच्या वडिलांनी तिला नमस्कार करायला सांगितले, तेव्हा आडकुजींनी हातांतील आंबा मंजुळेच्या तोंडात कोंबण्याचा प्रयत्न केला. तिने तोंड लपवले, तरी वडिलाने दटावल्यामुळे व बाबांच्या आग्रहाने तो आंबा घेतला. त्यावेळी आडकुजीबाबा 'माझा आंबा घे, तुझा आंबा दे' असे वडबडत होते. त्या शद्वांच्या पुनरुच्चाराच्या वेळी ते फार आनंदात होते.

नंतर यावलीस गेल्यानंतर मंजुळेला दिवस गेले व दिनांक २९ अेप्रिल १९०९ गुरुवार रोजी एका मुलाला तिने जन्म दिला. हा मुलगा म्हणजेच लहानपणी माणिक नाव ठेवलेले, पण आज तुकडोजी या नावाने ओळखले जाणारे संतपुरुष होत !

ज्यावेळी या बालकाचा जन्म यावलीस झाला, त्याच वेळी वरखेड येथे, आपले स्थान न सोडणारे आडकुजीबाबा तुकारामबुवांचे दारात गेले व 'माझा आंबा दे' म्हणून धरणे धरून बसले. तुकारामबुवांनी आंबे आणले; पण ते न घेताच आपली मागणी बाबांनी सारखी सुरू ठेवली. तेव्हा तर्काने अंदाज बांधून तुकारामबुवा घोडयावर बसून यावलीला गेले. तेव्हा त्यांना मंजुळेला मूल झाल्याचे कळले !

या प्रसंगास अनुलक्षून स्वतः तुकडोजी महाराजांनी एका अभंगात म्हटले आहे.–

तुकडयादास म्हणे नवसे मी झालो ।
प्रसादे लाभलो समर्थांच्या ।।

माणिक वरखेडला गोविंदमामाकडे राहत असताना तो आडकोजींकडे जाई. आडकोजी महाराज माणिकला 'तुकडया' म्हणून हाक

मारीत. आरतीच्या वेळी तुकड्याने गीते गायिली की आडकुजींना आनंद होई. मनानेच तुकड्याने आडकुजींना गुरुस्थानी मानले—

आडकोजी गुरू मानिले अंतरी।
तयापायी वरी वृत्ती राहे ॥
सदा सायंकाळी सद्‌गुरूंच्यापुढे।
ते वेडेवाकुडे मुखे गावे ॥

तुकडोजी महाराजांनी आपल्यावरील हे गुरु-ऋण ठायीठायी प्रगट केले आहे—

(१) असे वरखेड नाम नगरी।
तेथे वसे संतमुरारी।
नाम आडकोजी अवधारी।
दर्शन झाले सुदैवे ॥
अनुतापस्थिति हृदयी धरोनि।
गेलो मी आडकोजीचरणी।
नमन केले लीन होऊनि तया समर्था ॥
शिरी ठेवताचि हस्त।
झालो चरणकमली मस्त।
आन न मानेचि प्रशस्त।
श्री आडकुजीकृपेने ॥

(२) कई जन्म-जरा भरते भरते।
तुकड्याको यह गुरूपद पाई ॥

(३) बली हमारे 'आडकुजी' हैं।
जीते चरण परो बाबा ॥

(४) तुकड्यादास गुरूका प्यारा।
मरनेसे पहले ही मरना सिखाया जी ॥

आडकुजींच्या वयाला शंभर वर्षे पूर्ण होत आली. त्या दरम्यान—

पुढे फारच वृद्धपणी । न उठवे हो जागेहुनी ।
कोणी धावतचि जाउनी । उठविती फिरायासाठी ।।

अशी त्यांची अवस्था झाली.

इ. स. १९२१ च्या कार्तिक पौर्णिमेला ठीक दुपारी १२ वाजता आडकुजी महाराज समाधिस्थ झाले. त्यांचा जन्मही बरोबर शंभर वर्षांपूर्वी त्याच दिवशी, त्याच वेळी झाला होता. खऱ्या अर्थाने ते बरोबर शतायुषी झाले !

प्रयाणापूर्वी आडकुजी महाराज म्हणत होते– 'मी जाणार आहे !' 'मी जाणार आहे !!' पण ते शब्द लोकांनी तितकेसे ध्यानी धरले नाहीत. निर्याणापूर्वी काही क्षण ते अगदी निस्तब्ध होते.

ह्यावेळी तुकड्या आपल्या आवडीच्या शिर्वापिड करण्याच्या कामात मंजुळा नदीवर रमला होता. त्याला कोणीतरी गडबडीने निरोप दिला, "बाबाजी बोलावताहेत !"

तुकड्या तडक आडकुजी महाराजांकडे धावत गेला. लोकांचे चेहरे निराळेच काही सुचवीत होते. आडकुजी महाराजांची दृष्टी काहीतरी शोधत असलेली दिसली. 'समाधिसमया'ची लोकांना जाणीव झाली. तुकड्या एकटक बाबांकडे पाहत राहिला. 'बाबा आपल्याशी बोलत आहेत' असे तो समजत होता. अगदी अंतिम क्षणी आडकुजीबाबांनी म्हटले, "या ! या ! !" "राम भजो बे, धूप तजो !" तुकड्यासाठी तो अंतिम संदेश होता.

लोकांनी गजर केला. कौंडण्यपूरची यात्रा वरडखेला जणू भरली ! दिंड्या पताका यांच्यामध्ये आडकुजी महाराजांवर पुष्पांची रास झाली. 'जय जय सद्गुरू दीनदयाल'चा गजर सुरू झाला. त्या फुलांच्या राशीत दबलेला बाल माणिक तुकड्या काही वेळाने वर आला. लोकांची मने भारावली. तुकडोजी महाराजांनी त्यांना श्रद्धांजली वाहिली—

तुकड्यादास म्हणे सांगोनिया गेला । मरणी पाहिला जिवंतसा !

—तुकडोजींनी अशा या महान विदेही पुरुषाची यथार्थ कल्पना दिली आहे—

साक्षी होउनिया स्वइंद्रिय मना, पाही स्वये जो रुपा।
दृश्यी दृश्यपणे अलक्ष करुनी । घे स्व–स्वयेची कृपा ॥
मिथ्याभासभया सदा हरुनिया राही विदेही सदा ।
श्रीमत् आडकुजीपदा भज मना ! मग जन्म नाही कदा ॥

" गावकरी "
दि. २३–४–१९६१

# ८. श्री तुकडोजींच्या काव्यातील सूक्ती

( मध्यप्रदेश सरकारने नेमलेल्या स्वातंत्र्याचा इतिहास तयार करणाऱ्या समितीला माहिती पुरविण्याची विनंती डॉ. य. खु. देशपांडे यांनी केली. त्यासाठी तुकडोजीविषयक दीर्घ लेख लिहिला. मातृभूमीने त्यातील अंशात्मक भाग संक्षेपतः दिला तोच हा लेख होय. )

आपणा सर्वांना ही गोष्ट कबूलच करावी लागेल की, लोकजागृतीसाठी भजनाचा एक नवीन असा ढंग श्री तुकडोजी महाराजांनी स्वीकारला, नव्हे निर्माण केला. नवीन डफडीची थाप लोकांना आवडली व प्रा. भ. श्री. पंडित म्हणतात त्याप्रमाणे श्री तुकडोजींनी भक्तिकाव्याला राष्ट्रीयतेची डूब दिली. समाजाची शुद्धी आध्यात्माबरोबरच साधणे हा संतांचा बाणा असतो असे ज्ञानेश्वरांवरील प्रबंधात श्री. न. र. फाटक प्रतिपादन करतात. त्याप्रमाणे महाराजांनी समाजोद्धारार्थ उपदेश केला व राष्ट्रीयतेची सांगडही देशकालमानास अनुसरून घातली. भजनाबरोबरच धार्मिक माध्यमांतून प्रभातफेऱ्या, व्रतोत्सव, अेक्के, सप्ते, चातुर्मास केले. अशाच विविध कार्यक्रमांतून राष्ट्रीय गीतांची पेरणी केली. नवयुवकांच्या हृदयांत त्यामुळे राष्ट्रीय भाव अंकुरले व अपेक्षित ईप्सित तेणेकरून निकट आले.

समाजकारण, धर्मकारण, राजकारण एक मानणाऱ्या महाराजांनी विशुद्ध राजनीतीचे पाठही समाजाला दिले. सूक्तिवजा वचने अशाप्रकारे त्यांच्या भजनांतून कितीतरी काढून दाखविता येतील.

**राजनीती**

माफि मागण्या आला खळ तरि अविचाराने देऊ नको ।।
कधी उलट होईल म्हणोनी वार उरावर घेऊ नको ।।
वडिलोपार्जित हक्क आपुले गमावुनीया बसू नको ।।
वीरवृत्ति ही सदा असो पण हीनदिनावर वार नको ।।
हक्काचा कोंबडा बरा पण गुलामगिरीचा मोर नको।।
कर्तव्याच्या घरी मरी पण दुर्बलतेने जगू नको ।।
मरणाची आली वेळ तरी तू च्या च्या म्या म्या करू नको ।।

किंवा--

बिपत पडी तो कभी मनमें घबडना ना चाहिये ।
रणभूमिमें जाकर फिर मरने से डरना ना चाहिये ।

(ब्रम्हानंदस्वामी)

अशा तऱ्हेचे अस्सल राजनीतीपटू पुरुषाला शोभेल असे 'डोज'ही त्यांनी तरुणांना पाजले व राजनीतीच्या गोष्टी अनायासे शिकविल्या.

धाडस हृदयी सदा असावे ।
दुर्बलता क्षण एक नसो ।।

असे चुचकारूनचोपकारून नवतरुणांना सांगून पाहिले व जनमनामध्ये क्रांतीच्या परमोज्वल भावनेची उभारणी करण्याचे कार्य त्यांनी अव्याहतपणे सुरूच ठेवले. एकेकाळी ह्या सूक्ती गावोगावच्या लोकांना पाठ झाल्या होत्या व आजही त्या, त्यात अवीट गोडी वसत असल्यामुळें पूर्वीइतक्याच लोकप्रिय आहेत.

**ग्रामोद्योगाची प्रतिष्ठा**

'सेवाव्रत अंगी बाणवून लढू तसे रणांगणा, कृष्णगीत भूषणा' हे धडे तरुणांना श्री महाराजांनी दिले व स्वतःप्रमाणेच पुरातन वस्त्र खादी वापरण्याचा आदेश दिला—

खद्दर में मौज हमारी है
घरका दाना घरमें पीसे
गांव में सब बनता – – –

अशा तऱ्हेचे खेड्यांचे जीवन गीतांमधून रंगवून ग्रामोद्योगाची प्राणप्रतिष्ठा त्यांनी केली; जोपासना केली व स्वराज्याच्या जवळ अनपढ जनतेला आणले. खादीला पाहून शिकलेलेही बिचकायचे, पण महा-राजांनी आपल्या भजनांनी शिकल्या न शिकल्या साऱ्या जणांना खादीचे व्रत घ्यायला शिकविले.

**भगवंताच्या शक्तीचे अधिष्ठान**

परक्यांची पाजळलेली तरवार मानेवर लटकत होती व भारतीय जनता त्रस्त झाली होती. ती घाबरणे साहजिक होते. घाबरल्या जिवाला नाना प्रकारे धीर द्यावा लागतो. हे काम महाराजांनी अधिक यशस्वी-रीत्या केले. कोणती तरी महान शक्ती, महान अधिष्ठान पाठीशी आहे ही भावनाच मुळी धीरदात्री आहे. म्हणूनच सर्वशक्तिमान हरी भारतभूला आल्याची साक्ष त्यांनी आपल्या अधिकारी वाणीने दिली. त्यामुळे तरुणांमध्ये नववृत्ती येऊन त्यांना देशाची चिंता पडली व ते प्राणाला अर्पण करू लागले, असे त्यांना आपल्या द्रष्ट्या दृष्टीत दिसू लागले.

फिरती नेत्यांच्या झुंडी। वाजविती राष्ट्री कंडी ॥
जातिपाती दूर झाल्या । संघटनेकरिता जमल्या ॥
सुदिन उदेला.
नवरक्त उसळले लोकी । गर्जविती जन हे हाकी ॥
मिळवती निजहक्काला.
निर्भय वृत्ती सरसरली । कर लागला विजयाला.

–असे लवकरच होऊ घातलेल्या भावी घटनेचे चित्र चितारून त्यांनी तरुणांत आत्मबलाची जोपासना करावयाची प्रेरणा उत्पन्न केली.

ईश्वर येत आहे, घाबरू नका, असा आशावाद जनतेजवळ सांगताना ते १९३९–४० च्या दरम्यान गाऊ लागले–

घोडोंपर कस कसी सवारी । कंबरमें ले तलवार धरा ।।
रणकंदन कर पाप जमीपें । बहवाना खूनों का झरा ।
तुकड्यादास कहे जागे हो । मत भूलो बस सार मेरा ।।
अब आता है करतार मेरा ।
आते ही हैं भारत में । प्रिय भगवान मेरे ।
वीरो तुम अर्जुन बन जाओ । कर में चक्र उठाते हैं ।।
प्रिय भगवान मेरे ।।

त्यांचे स्वागत सतींनी करावे ! सर्वजण पाहा–त्यांच्या हाकेला ओ देत आहेत–

–भजनाच्या अपूर्व मस्तीत रंगून महाराज सांगायचे.

ईश्वर येत आहे, एवढे सांगूनच न थांबता तो येऊन काय करील याची भीषण विभीषिकादेखील त्यांनी मूर्तिमंत निर्माण केली, एक इशारा दिला–

दुर्जन के दिल फट जायेंगे । पाप के काले कट जायेंगे ।।
देव देवि सब डट जायेंगे । रणकंदन कर खून बहेंगे ।।
घोडेपर असवार रहेंगे । भारत अब परके न रहेंगे ।।

**अब आओ बिपत बडी भारी**

अशा तऱ्हेचे वातावरण तयार होत होते. महाराजांच्या प्रचारात खंड नव्हता. प्रायः १९३९ नंतर क्रांतीची स्पष्ट रेषा दाखविणारे खालील भजन ते गावागावातून प्रत्येक कार्यक्रमात म्हणत व जनमनास चेतवीत. "झूठी गुलामशाही" "चल उठ भारता" "अब आई बिपत" अशी गीते लोकांच्या जिभेवर नाचू लागली व त्यांनी त्यांतून स्फूर्ती घेतली. महाराज तीव्र धोरणातून चिडून म्हणतात–

कहि मानो भारतबासिंदो । अब आओ बिपत बडी भारी ।।
बदलेगा और जमाना । सब पंथ पडेंगे नाना ।।
होगा सबको अभिमाना जी । बिरले ही छुटेंगे खारी ।।१।।

पापों के भरेंगे हंडे । आपसमें लगेंगे डंडे ।।
सब शहर बनेंगे ठंडे जी, दुख पाय पिता महतारी ।।२।।
आपस में बीर लडेंगे । कई गांव में खून बहेंगे ।।
नहिं किसका ग्यान सहेंगे जी, दुख पायेंगे नरनारी ।।३।।
सब गांव पडेगा डाका, । गुंडोंसें पडेगा धाका ।।
कोई सेवा करेगा बाका जी । हो सतजुगका अवतारी ।।४।।
गर इसको दूर भगाना । तो सभी एक हो जाना ।।
कहे तुकड्या सुन लो गानाजी, । मत देर करो अब थोरी ।।५।।

असली भजने बेचाळीसच्या आगाऊ ३–४ वर्षे झाली. काँग्रेसचा संबंध नव्हता. साथ नव्हती. स्वयंप्रेरणेने महाराज हे सारे करीत. काँग्रेसच्या परिषदा कधी महाराजांनी पाहिल्या नाहीत. वर्तमानपत्रेही ते वाचत नव्हते तसा काही पत्रव्यवहारही नव्हता. तरीही पुढील भारताचे भविष्य त्यांनी रंगविले व या गीतातील त्यांचे भविष्य खरे ठरले, हे आजही आपण म्हणू शकतो. १९४० पासून आतापर्यंत या गीतांतील तथ्याला विशिष्ट मूल्ये असल्याचे सिद्ध व्हायला अडचण पडणार नाही.

**अब काहे को धूम मचाते हो**

वरील प्रकारे वातावरण तयार होतच होते. या सर्व वातावरणाचा कळस ३९ नंतर प्रभावीरीत्या प्रचारात असलेल्या सर्वश्रेष्ठ अशा महाराजांच्या एका भजनात झाला. हे नवीन प्रभावी गीत स्त्रिया, मुले, मुली, लहानथोर, तरुण, साऱ्यांनाच गुणगुणावेसे वाटे. हे क्रांतीचा कळस करणारे गीत, त्यावर अधिक न लिहिता खाली देत आहे—

अब काहे को धूम मचाते हो, दुखवाकर भारत सारे ।
आते है नाथ हमारे । ।।टेक।।
जबतक पाप भरा न पुरा तो, कर लो मौज–भरारे ।
अब कुछ देर नहीं हैं उनको, उतरा गरुड किनारे ।।१।।
बीरों में हिंमत आवेगी, ले तलवार कटचारे ।
दौर दौरकर गजघोडोंपर, रणकंदन कर डारे ।।२।।

रावण जब धुमधाम मचाया, लंका नाश कराई ।
कूदकूद बंदर सेनासे, राक्षस जलवा डारे ॥३॥
राजा कंस उमंग उमंगे, लीला कर वधवाई ।
किसी का गर्व सहे नहि उसको, अपना कुल संहारे ॥४॥
भारत अब हिन दिन भया रे, ना कोई यार सताओ ।
करणी के फल पावोगे गर, प्रभुका देश बिगारे ॥५॥
झाडझडूले, शस्त्र बनेंगे, भक्त बनेंगे सेना ।
पत्थर सारे बाम बनेंगे, नाव लगेंगि किनारे ॥६॥
तुकड्यादास कहे अब भूलो, वो दिन आये हमारे ।
सब दुनिया के पालनकर्ते, उनके हैं हम प्यारे ! ॥७॥

" मातृभूमी "
दिवाळी अंक १९५४

# ९. संत तुकडोजी आणि साहित्य

“ रद्दी कागद ! ”

. . . . तुकडोजी महाराजांचे गुरू आडकोजी महाराज यांच्या पुण्यतिथीला अमरावती जिल्ह्यातील वरखेड गावी आम्ही गेलो होतो. समाधिमंदिरावरील गच्चीच्या एका कोपऱ्यात लाकडी पेटीत काही चोळामोळा झालेले मळके टाकाऊ कागद पडले होते. “ हे काय ? ” म्हणून मी सहज प्रश्न केला. मला वरील उत्तर मिळाले.

. . . . रद्दी कागद . . . . ते बुरशी चढलेले, उधईने खाल्लेले घामट कागद . . . . कोण विचार करील त्यावर ? . . . . केराच्या टोपलीत कागदाचे चिटोरे टाकतात, तसाच ह्या पेटीचा उपयोग होत असावा . . .

ती आठवणही उरली नसती. पण वरील कागदांची ‘ कथा ’ मला नुकतीच कळली. वरील स्मृती पुढच्या दुव्याला जुळली . . . . ती कागदांची पेटी त्यानंतर कुणीतरी म्हणे गुरुकुंज आश्रमात नेली. नेणाराचे काम तेथेच संपले . . . . नंतर कुणीतरी ते कागद रद्दी म्हणून अमरावती-नागपूर रोडवर कुठेतरी आडोशाला, कचऱ्याच्या जागी टाकून दिले. माती लागलेले ते चिटकुरे मातीत मिळाले. ती पेटी मात्र दुरुस्त करून एका कार्यकर्त्याने आपल्या लिखापढीसाठी उपयोगात आणली.

पण ते कागद ? . . . . तुकारामाचे अभंग पाण्यात तरले. तुकडोजींच्या कवितेची हस्तलिखिते मात्र त्यांच्याच आश्रमातील पोक्त कार्यकर्त्याकडून मातीत मिळवली गेली. केवढा मोठा चमत्कार ! . . . . ह्या

चमत्काराने चकित होऊन काही दिवसांपूर्वी त्या कार्यकर्त्यास मी विचारले, "महाराजांच्या मूळ हस्तलिखितांची ही किंमत ?"

संथपणे उलट प्रश्न ऐकायला मिळाला, "सांभाळून ठेवण्याची काय जरूर ?"

❀ ❀ ❀

तुकडोजींच्या हस्तलिखितांची अन् साहित्याची उपेक्षा एका अशिक्षित कार्यकर्त्याने केली, त्याला दोष देता येईल; पण तीच उपेक्षा शिक्षितांकडून झालेली जेव्हा दिसून येते, तेव्हा कुणाला बोल लावायचा ?–की तुकडोजींच्या साहित्याचा विचार करण्याची आवश्यकता नाही ? त्यांचे साहित्य, साहित्य तरी ठरते का ? 'पंढपूरच्या साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होऊ शकतात की नाही ?' (गावकरी) अशासारखे प्रश्न विचारणीय असले तरी ते अलाहिदा होत. महाराजांच्या काव्याचे रसग्रहणात्मक दृष्टीने विवेचन करायला मात्र काहीच हरकत नाही. वादात न पडताही त्यांच्या काव्याकडे रसिकांना रसिकतेने पाहण्यासाठी अडचण पडणार नाही.

❀ ❀ ❀

श्री तुकडोजी महाराजांच्या भजनांची संख्या सुमारे सात हजार असून त्यांनी अडीचतीन हजार अभंग रचले आहेत. त्यांची ओवीबद्ध रचना सहासात हजारांच्या जवळ येईल. महाराजांच्या श्लोकरचनेची तीनचार पुस्तकेही निघाली आहेत. त्यांचे गद्य-वाङ्मय पद्याच्या मानाने कमी आहे. लेख–भाषणांची पाचसहा पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. महाराजांची अप्रकाशित रचना प्रकाशित रचनेहून जास्त आहे.

"तुकडोजींची पूर्वीची भजने अंतःकरणाच्या तळमळीने, अभिजात स्फूर्तीने, अंतर्यामीच्या ओलाव्याने व ईश्वरप्रेमाच्या उमाळ्याने लिहिली गेली. 'मन हे चकोर असुचे, तू चंद्र भाविकांचा' अशी सहज, सुलभ व सुंदर रचना आज ते करू शकत नाहीत"–असा आक्षेप घेतला जातो. तुकडोजींना अध्यात्म सोडून गेला अशाही भूमका पसरविण्याचा प्रयत्न

झाला. वस्तुतः महाराजांचा पिंड संताचा असून त्यांच्या संतप्रवृत्तीला साजेशी धार्मिकता व आध्यात्मिकता आजही त्यांच्यात आणि त्यांच्या काव्यात पूर्वीइतकीच ओतप्रोत भरली आहे. अलीकडेच प्रकाशित झालेल्या 'दिव्य-दर्शना'त तुकडोजींची नवीन भजने पूर्वीच्या 'झणि आला हा घनश्याम, गमे हा भास जिवा'– अशासारख्या भजनांपेक्षाही सरस अशी आहेत--

अपुल्या अपुल्या घरट्यामाजी ।
पक्षी किलबिल करती हे ।
त्यांना अंती कोण शांतवी ?
. . . हृदया येती काटे !
'बेचैन तुझ्याविण जीव जसा–
जणु गायिस पाहत वत्स फिरे'

—अशी आर्त हाक देवाला देताना ते आजही त्याच्या पायावर 'अश्रुजलाचा शिडकावा' करतात. आज त्यांच्या भजनांचे विषय विस्तृत झाले असतील; पण मूळ सूत्राला सोडून ती वाहावली नाहीत. 'संतांची बोधवचने अनेकदा प्रसंगांना धरून असतात; म्हणून त्यात सुसंगती साधावी'– हे महाराजांचे मत आहे. बरेचदा प्रसंगातून त्यांची भजने निर्माण झाली. पण त्यात आर्ततेचा अंश कमी आहे असे नाही. त्यांच्या पाठीला 'पाठे' झाल्यामुळे एकदा त्यांना पंढरपूरला जाता आले नाही. त्यावेळी ते फिरत; जाण्यासाठी तडफडत म्हणून लोकांनी त्यांना कोंडून ठेवले. त्यावेळी त्यांनी भजन लिहिले--

हरिभजनाची रुची जयाच्या--
हृदयकमली लागली ।
तयाची प्रपंचरुचि फाकली ॥

'उभा का मंदिरी रामा, पहा बाहेर येवोनी, गर्जती भक्त तव द्वारी' याही भजनाची निर्मिती अशीच झाली आहे. त्यांच्या आजारात अशी अनेक हृदयंगम गीते त्यांनी लिहिली. ही धर्म-अध्यात्माची आर्त

भजने किंवा गांधीवधाच्या दिवशी तयार झालेले 'दयामयी अवतार शांतिका'–हे गीत लोकांच्या डोळ्यांतूत अश्रू गाळायला कारण झाले.

ही प्रासंगिक किंवा अप्रासंगिक रचना जितकी मधुर,आर्त व उदात्त आहे तितकीच प्रसन्न रचना 'चित परमपुनीत बनेगा, जब प्रभू शरणमें होगा, मैं और मेरा भेद छोडकर, सब तेरा जो कहता है, वह आखिर प्रभुही बनेगा' अशा ओळी लिहून महाराज आजसुद्धा करतात. जपानात टोकियो येथे लिहिलेल्या एका भजनात पुढील भाव आहेत—

प्रत्येक देशात—प्रत्येक वेशात
तूच आहेस !....
तुझी नावे अनेक आहेत–प्रकार अनेक आहेत–
पण तुझीच ती रूपे आहेत !...
तू सागर होतास ...वर गेलास
आणि तू झालास 'बादल'!...
...आणि तूच पुनश्च पृथ्वीवर
अवतीर्ण झालास—
...नदी–निर्झर यांचे रूप तू घेतलेस !

तुकडोजींची रचना आंतरिक तळमळीतून व्यक्त झाली, म्हणून ती आशय व अभिव्यक्तीच्या दृष्टीने यथार्थ ठरली. 'सबसे ऊँचा है धन, मेरा प्यारा भजन'–असे त्यांनी आपल्या भजनांबद्दल उद्‌गार काढले आहेत. कारण 'त्यानेच त्यांचे जीवन घडविले आहे !' भजनाचे त्यांना वेड आहे व त्या वेडातूनच त्यांच्या वाणीचा ओघ वळणावळणातून वाहत आला आहे.

तुकडोजींच्या वाणीची बहुविध रूपे आहेत. त्यांनी आपल्या भक्ति-काव्याला राष्ट्रीयतेची डूब दिली, म्हणून ते लोकप्रिय झाले, हे म्हणणे अर्धसत्य आहे. राष्ट्रीयता हे त्यांच्या काव्याचे एक प्रमुख अंग आहे. १९३६ च्या श्रावणात गांधींनी महाराजांना आग्रहानें सेवाग्रामला ठेवून घेतले, तेव्हापासून ही राष्ट्रीयता महाराजात आली असे कित्येकांचे मत

आहे. परंतु त्यापूर्वीपासूनच त्यांनी राष्ट्रीयता व समाजशिक्षणावर कटाक्षाने जोर दिला होता हे त्यांच्या जुन्या काव्यातून दिसते. आज जशी त्यांच्या काव्यातून आध्यामिकता नष्ट झाली नाही, तसेच त्यांच्या जुन्या रचनेतून राष्ट्रीयतेला चाट मिळाली नाही. महात्मा गांधींना आवडणारी तुकडोजी-रचित भजने पूर्णतः आध्यात्मिकच होती, हेही लक्षात ठेवले पाहिजे. जयप्रकाशांच्या पत्नींना अजूनही त्यावेळी सेवाग्रामला महाराजांनी म्हटलेली ती भजने पाठ आहेत.

महाराजांच्या लिखाणातील बोधाला बरेचजण बिचकतात; तर काहींना त्यांचे वाङ्मय प्रचारकी थाटाचे वाटते. साधू वा अध्यात्म समाजाशिवाय राहूच शकत नाही याची महाराजांना अगोदरपासूनच जाणीव होती. ‘पळणाऱ्या वाहनातुनि, जळणाऱ्या वस्तूतुनि, सत्ययुगाचाचि ध्वनी ऐकणाऱ्या’ आजच्या राष्ट्रसंताला ‘बोलके (बोलघेवडे या अर्थाने) बोल’ लहानपणापासूनच आवडत नसत. ‘भक्ती करू त्यासी कष्ट कासयासी ?’ असे विचारणाऱ्या मठवासी लोकांना ‘निघा मठाचे बाहेरी,’ ‘मंदीरमें क्या कर रहा घंटी बजाकर देखता,’ ‘संतमहंतों जाग उठो, क्यों सोये आसनमाँही ? सोने का समय नहीं भाई !’ असे त्यांनी स्पस्ट बजावले आहे. हीच साधुसंतांबद्दलची त्यांची भूमिका त्यांनी १९५५ च्या दिवाळीच्या दरम्यान अमृतसर येथे भरलेल्या वेदान्त-परिषदेत विशद केली, “अध्यात्मगिरीवर चढताना रस्त्यात आड येणाऱ्या दगडकाट्यांना मी जर दूर सारले नाही तर मला व त्या रस्त्याने जाणाऱ्या अन्य पांथस्थांना ते दगड-काटे रुततील-बोचतील. जाता जाता तृषिताच्या तोंडात मी जर पाण्याचे चार थेंब टाकले नाही तर मी अहंकारी महात्मा शांतिसुखाचा धनी कसा होणार ? कुत्र्यालाही तुपासवे रोटी खाण्यास सांगणाऱ्या मराठी संताने-नामदेवाने-संसारातील परमार्थाची ओळख आधीच करून दिली आहे.” तुकडोजींची वाणी व लेखणी म्हणून समाजोत्थानासाठी झिजली आहे. ‘रे मंदिरी का पाहसी ती देवतांची साउली । प्रत्यक्ष तो जगती रमे ही याद तू का सोडली ?’ असे म्हणणाऱ्या महाराजांनी जनताजनार्दनात देव पाहिला. या संताला ‘मंदिरात नाही दिसला सावळा

मुरारी' म्हणून भांबावल्यासारखे होते. तो माघारी फिरतो व 'धूळ, जंग बसलेला मुकुट धारण करून श्रम करीत असलेल्या मुरारी'च्या शुद्धबुद्ध विसरून पायी लागतो.

'गरिबांचे हाल पाहून महाराजांच्या हृदयास काटे यतात.' 'इतर कवी केवळ राष्ट्राच्या शरीरावर शृंगार चढवितात, तर संतकवी हे राष्ट्राचे शरीरच सुदृढ व तेजस्वी करतात' ही महाराजांची भूमिका त्यांनाच लागू आहे. 'मनाच्या निर्मळपणाच्या अनुभवांच्या शब्दबाणांचा वर्षाव झाला की त्यामुळे दुर्बलांनाही बलवान होता येते ही त्यांची धारणा होती. म्हणूनच त्यांच्या राष्ट्रीय क्रांतिकारी कवितांनी 'फत्त-रांचे बॉम्ब बनविले व 'झाडझडूल्यांना शस्त्रांचे सामर्थ्य' दिले; आणि त्यामुळेच त्यांना १९४२ च्या क्रांतिकांडात कारागृहातही राहावे लागले. परतंत्र भारतभूच्या दुःखांची वर्णने त्यांच्या शेकडो भजनांमधून व्यक्त झाली असून देश स्वतंत्र झाल्यावर शांतीने क्रांती करून 'रामराज्य दाखवून देऊ' या हिरीरीने त्यांनी सुराज्यासाठी कंबर कसली. 'या देशाचे स्वातंत्र्य युगयुग जगणारे आहे' या अदम्य आशावादाने प्रेरित असलेल्या महाराजांनी 'कवींची खाण' समजल्या जाणाऱ्या ह्या देशातील 'साहित्यिकांनी नवयुग-निर्मितीचे कार्य केले पाहिजे' अशी अपेक्षा दाखविली आहे. 'सृष्टिसौंदर्ये रमो, नांदो सदा शांती' ही त्यांच्या मनाची धाव अन् हाव असल्यामुळे त्यांनी साहित्यिकांना आव्हान दिले--

जीवन का साहित्य बिगडकर--
गलीगली में सोया है ।

--ह्या 'साहित्या'त चेतना आणण्यासाठी खपणारे साहित्यिक महाराजांना हवे आहेत. 'सकळास कळो मानवता-राष्ट्रभावना' यासाठी महाराजांनी 'कलेसाठी कला न ठेवी । जीवनास कला भूषवी' असे सांगून कलेचा संबंध वेधडकपणे जीवनाशी जोडला. 'बोंबली तिडक' असल्याशिवाय का हे शक्य झाले ? 'महाराष्ट्रीय ग्रंथकर्त्यांनी, समाजा लावावया वळणी, लिहिले बहुतांनी'-त्यांचा महाराजांनी गौरव केला

आहे. 'जुनेचि धरूनि बसलेल्यां'ना 'कवि नवीन' होताहेत, त्यांची बूज राखायला सुचवून 'कवींची दिव्य वंशावळी सरली, म्हणून आम्हीच थोर' अशी आरळी मारणाऱ्या नव्या कवींना सावधपणाची सूचना महाराजांनी दिली आहे. 'आम्ही कवी नसू' तरी 'वेड्यापरी काव्य करीत' मातृभाषेचे सेवा करू, असे त्यांनी आपल्या मनात सतत बाळगले आहे. 'कोऱ्या शब्दभांडाराला कलेचा गोठा' ठरवून 'मातृपरिभाषिकेचा उपयोग हृदयस्थिताच्या चिंतनासाठी करण्याची' मनीषा त्यांनी कधी सोडली नाही. 'काव्याला कार्याने मान मिळतो' असे महाराजांचे मत असून समाजाला निराशेकडे झुकवणाऱ्या कविजनांच्या काव्याबद्दल ते उदास आहेत. त्यांच्या साहित्य–विषयक विचारांची कल्पना पुढील उद्‌गारांवरून येऊ शकेल—"समाजाचे जीवन एक उत्कृष्ट कथानक आहे. सृष्टीतील प्रत्येक वस्तू साहित्यरूप व काव्यमय आहे." "ज्यांना भावना नाहीत, त्यांच्याकरिता काव्य जन्मालाच आले नाही."

दीडदोन तपांपूर्वी 'संघीय' म्हणून महाराजांची टीका झाली होती. आता त्यांना 'काँग्रेसधार्जिणे' म्हणण्यात येऊ लागले आहे. त्यांच्या भूदानकार्याला 'स्टंट' समजणारेही काही भेटतात. वस्तुतः समाज-सुखाची तळमळ उराशी बाळगून सर्वसमन्वायक धोरणाने अनेक संस्थांमध्ये फिरणाऱ्या तुकडोजींनी साधनापेक्षा साध्याला श्रेष्ठत्व दिलें व उत्कर्षास नेणाऱ्या प्रत्येक कार्यात पुढे पाऊल ठेवले. 'भगव्या दुशाल्या'चे तत्वज्ञान सांगून 'महाराष्ट्राच्या शिवा'ला जसे त्यांनी पारतंत्र्यात पाचारण केले, तसेच त्यांनी 'उठा तिरंगा बढाय छाती' असेही गीत लिहिले. आज त्यांच्या 'रामधून'मध्ये भगवा–तिरंगा यांच्या छायेखाली हजारो लोक समाविष्ट होतात. १९३० साली शिबिराशिबिरातून राष्ट्रीय भजने म्हणणाऱ्या तुकडोजींनी अनेकदा तिरंगी झेंड्याला आकाशात फैरविले आहे. 'जयहिंद'चे नारे लावणाऱ्या आझाद हिंद फौजेची त्यांनी पाठ थोपटली आहे व 'भूमिदानाचा आवाज उठवणाऱ्या अस्थिपंजर ऋषी'ची त्यांनी मुक्तकंठाने स्तुती केली आहे. 'सरदार – जवाहर देशाचे मजबूत हात' असल्याचा निर्वाळा त्यांनी निःसंकोचपणे दिला असून 'गांधीगीते'

रचून महात्माजींचे उरलेले कार्य करण्याची त्यांनी ईर्ष्या धरली आहे. हे त्यांच्या काव्याचे व कार्याचे धोरण अनेकांना खटकत असले तरी महाराजांची भूमिका मात्र निर्मळ व प्रांजळ आहे. त्यांनी एकीकडे जवाहराची स्तुती केली असली तरी त्यांच्याच जन्मदिवशी ( १९५५ ) त्यांच्या दिल्लीतील बंगल्यावर कार्यक्रमातील शिस्तीचा अभाव पाहून तीव्र टीकाही केली आहे. "मुर्दाड कॉंग्रेसजनांच्या 'गौऱ्या' घाटावर गेल्याचे" त्यांनी स्पष्ट सांगितले आहे, तर देशात येणाऱ्या सुचारू साम्यवादाचे सहर्ष स्वागत करण्याची त्यांनी तयारी दर्शविली आहे. काळाबाजार व पुढारीपणा बोकाळला, त्यामुळे 'सुराज्य येण्यासाठी उभे पण मार्ग मधातुनि रुकला ना' अशी हळहळ त्यांनी व्यक्त केली आहे. 'आज पैसा खर्च करता, सर्व मिळते–न्याय मिळतो, सत्ताही मिळते' या वस्तुस्थितीची त्यांना जाणीव आहे. म्हणूनच त्यांनी 'बिघड गयी शासनकी रीती' यासारखी भजने राष्ट्रपति–भवनातून व राजभवनांमधून निःसंकोचपणे म्हटली व शासनातील शैथिल्यावर प्रकाश टाकला. सरकारी कर्मचाऱ्यांच्या लाचलुचपतीवर त्यांनी ताशरे झाडायला कमी केले नाही. अन्यायप्रतिकारार्थ वा सेवाकार्यार्थ झटणाऱ्यांना 'शासनाची भीती कसली ?' म्हणून दिलासाही दिला आहे. समतेचा पुरस्कार करून समाजवादाशी महाराजांनी मैत्री जुळविली आहे व विशाल व पुरोगामी हिंदुत्व ही त्यांच्या संतमनाची मूळ बैठकच आहे. या सर्वांचे संतुलित संमिश्रण तयार करून होणारी मानवता हा त्यांचा धर्म–मानवधर्म–विश्वधर्म–आहे.

'देशातच उभा कामांचा डोंगर । दारिद्र्य दुःखांचा वाहतो पूर' यासाठी देशात क्रांती हवी आहे, नवरचना हवी आहे. म्हणून 'धनाचा मोह नसू दे मनी–रक्त असे ते कामकऱ्यांचे' असे महाराज आर्जवून सांगतात. 'रक्त वाहुनी नको क्रांति ती म्हणूनि प्रार्थना सगळी' ही त्यांची होऊ घातलेल्या समाजक्रांतीची कल्पना आहे. विनवण्या–याचना करूनही जर काम होणार नाही तर मात्र 'येईल तेच कपाळी' असा इशारा द्यायलाही महाराज चुकत नाहीत. ते म्हणतात––

उपवासी पोटाचा अग्नी पापपुण्य समजेना
शांतीने क्रांति न झाली तर–
आवरी कोण धिंगाणा ?
आज सांगती विनंती करुनी त्यागी संत पुढारी
कोण सांगतो वेळ,
उद्याच्या जनतेची ललकारी ?

लहानपणच्या भजन–अभंगांतील त्वेषाइतकीच ही वाणी तेजस्वी व ओजस्वी आहे. ' राष्ट्रसुखाची कळकळ निर्मळ वाहताना अंतरी, नसू दे स्थार्थ सख्या तिळभरी ' असे त्यांनी समाजसेवकास बजावले असून ' जनसेवेचे प्रमाणपत्र, त्यासी महत्व द्यावे सर्वत्र ' असेही जनसेवकाबाबत उद्‌गार काढले आहेत. ग्रामजीवनाचे सूक्ष्म अवलोकन व सूक्ष्मातिसूक्ष्म विचारांचे वहन असलेल्या 'ग्रामगीता' ग्रंथातील पुढील ओळी तर मंत्र्यांपासून महंतांपर्यंत सर्वांनी सुवाच्य अक्षरांत लिहून घेऊन समोर टांगून ठेवाव्यात इतक्या अर्थपूर्ण असल्याचा निर्वाळा श्री. वि. स. खांडेकर यांनी दिला आहे––

मंदिरी बसोनि नाक दाबावे ।
त्यापेक्षा मार्गीचे काटे उचलावे ।
दुःखितांसि प्रेमे पाणी पाजावे ।
हे श्रेष्ठ ती र्थ स्था ना हू नि ।
एक हात खोदावी जमीन ।
हे पूजनाहूनि पूजन ।
परिणाम शेकडो व्याख्यानांहून ।
अधिक त्याचा !

ग्रामजीवनाचा शेतकरी हा प्रमुख घटक असल्यामुळे ह्या ग्रामनाथा'च्या वर्णनात महाराजांची लेखणी रमल्याशिवाय राहत नाही. शेतावरचे संपूर्ण रूपक एखाद्या कवितेत ते खेळवतात, तर ' शेतकरी बंधुंनो ऐकता काय विनंती जरा ' म्हणून आर्जवे करतात. ' पिके शेती

आंबावली, तिफणी देईना खंडुळी ' असे वर्णन ते सहजगत्या करून जातात. ' वनराणा ' किसानाचे वर्णन ते करतात--

मधुवन सुंदर हे दिसते प्रियकर
कोण राबतो घालुनि पाणी
कोण सजवतो जीव लावुनी
अभिनव हिरवळ सुखकर हे
विलसवि बहरवि तरुवर....

महाराजांच्या ग्रामगीतेची अर्पणपत्रिका तर ' ग्रामनाथा 'साठीच आहे--

...ऐशा भोळ्या शंकरासी ।
सौख्य लाभावे सर्वदेशी ।
मानवाची पूर्णता तुजशी
प्राप्त व्हावी ॥
म्हणोनी केली ग्रामगीता ।
जागृत व्हाया ग्रामदेवता ।
संबंध यावा सागर-सरिता-
ऐसा तुझा सर्वांशी ॥

तुझ्या श्रमास प्रतिष्ठा मिळो ।
सकळाचे लक्ष तुजकडे वळो ।
मानवतेचे तेज झळझळो ।
विश्वामाजी या योगे ॥
म्हणोनि तुजचि करितो अर्पण ।
तू विश्वाचे अधिष्ठान ।
तुझेच व्हावे आधी उत्थान ।
विश्वामाजी ॥

समस्त विश्वातील शेतकऱ्यांची काळजी वाहणाऱ्या तुकडोजींची दृष्टी किती विशाल व उदार आहे !

तुकडोजी महाराजांच्या वाङ्मयात स्त्रियांचाही विचार फार पुढे जाऊन केला गेला आहे. 'स्त्रियांना धिक्कारून रानीवनी पळणारां'चा त्यांनी धिक्कार केला आहे. पुरुषांनी 'केवळ आपुल्या वृत्तीकरिता, स्त्री-निंदा केली तत्वता'हे कटू'सत्य प्रकट करण्यास ते कचरत नाहीत. स्वार्थाने स्त्रीला चूल आणि मूल यातच गुरफटून ठेवून तिचे जीवन रुक्ष केल्याचा आरोप' पुरुषांवर महाराज करतात. 'मुलींसाठी योजना अतिमंद आहे शिक्षणाची' याची महाराजांना खंत वाटते. 'तुझ्या चारित्र्य-स्थैर्याची तुलाची काळजी व्हावी-असा हा काळ बघ आला'-म्हणून ते भगिनीवर्गास सूचना देऊन ठेवतात व अबला म्हणून अपमान करणाराचे मनगट धरून त्याला आपण सबल असल्याचे दाखवून द्यायलाही ते स्त्रीवर्गास सांगतात. मुलांमुलींचा लग्नबाजार न करता जीवनमूल्ये विवाहास लावावी, यासाठी महाराजांनी 'गुणविवाह' पुरस्कारला आहे. या संत-सुधारकाने 'सहशिक्षणही नाही वाउगे' असे आपले मत दिले आहे.

तुकडोजींच्या काव्यातून मुलेही वगळली गेली नाहीत--

या कोवळ्या कोळ्यांमाजी ।
लपले ज्ञानेश्वर रवींद्र शिवाजी ।
विकसता प्रकटतील समाजी ।
शेकडो महापुरुष ।।

—या कलिकांतून 'सेवाभावी, चतुर, कलाकार, उद्यमी, यंत्रज्ञ, इतिहासकार, सल्लाचतुर, न्यायाधीश, काव्यसृष्टीचे ईश, शेतकरी, राजकारणी, संत, उपदेशक, वीर, रक्षक, व्यापारी, सेवक . . . . हरकामाचे लोक' निर्माण होतील हा आशावाद त्यांनी अनेक ओव्या लिहून ग्रामगीतेत प्रकट केला आहे. 'भारताचा पोर तू, तेजाची कोर तू, करी जोरसोर तू, मानु नको घोर तू, चाल पुढे' असा उत्साह बाल-

गोपालांना द्यायला बालसुलभ मनोवृत्तीचे महाराज नेहमीच तयार असतात. एकोणवीसशे बेचाळीसच्या क्रांतीपूर्वी 'बालबीरो' अब तुम्हारी बारी आई' म्हणून बालवीरांना त्यांनी हाक दिली होती व आजही 'बालबीरो ऊठो तुम तो ऋषियों की संतान हैं" अशा शब्दांनी ते मुलांना गौरवितात.

महाराजांच्या काव्याला अशा ह्या बहुविध छटा आहेत. 'तुकडोजींच्या काव्यारसाला मन्मन वेडावले' असे दासगणू महाराजांनी त्यांच्या काव्या-संबंधी म्हटले आहे. ह्या 'रसा'ची चवी चाखून अनेकांनी त्यांची मुक्त-कंठाने स्तुती केली आहे.

असे असले तरी महाराजांचे साहित्य सर्वस्वी निर्दोष आहे असे म्हणता येणार नाही. त्यांच्या गद्यात पुनरावृत्ती व लांबण फार असते. तरीपण त्यात पोटतिडीक, तळमळ व आर्तता यांना बाधा येत नाही. 'पुरुषार्थां'च्या आत्मकथांकात आलेला त्यांचा लेख भाषागुणांनी सुंदर आहे. त्यांच्या लेखातील विचार अनुभवातून, प्रत्यक्षीकरणाच्या प्रयोगा-तून व उपेक्षित जीवनातून स्फुरलेले असतात.

महाराजांची कविता भावप्रकटीकरणासाठी आहे. वृत्तादिकांच्या बंधनात अडकण्याची अर्थात ती बरेचदा धडपड करीत नाही. 'केकावली'-ची आठवण करून देणारे 'स्फूर्ति तरंगा'तील मधुर श्लोक जेव्हा हजारो लोकांच्या पंगतीत सेवामंडळाचे सेवक म्हणतात तेव्हा त्यात वृत्तशैथिल्य असेल अशी शंकाही येत नाही. 'आदेशरचने'तील श्लोकांचेही असेच आहे. 'जसेच्या तसे राहिले टोळगोटे' यासारख्या तुरळक रचनेत त्यांची गणवृत्ते जुळली असली तरी त्यांनी लिहिलेल्या चामर, पंचचामर, प्रमा-णिका, इंद्रवज्रा, इंद्रवंशा, वसंततिलका, शार्दूलविक्रीडित, भुजंगप्रयात इत्यादी वृत्तांत वृत्तसुखाचेच वैपुल्य आढळेल! केशवकरणी, अक्रूर, उद्धव, फटका यासारख्या मात्रावृत्तांचा उपयोग त्यांनी नकळत, अभावित-पणे, चाली ऐकून भजने करण्याच्या त्यांच्या धोरणाप्रमाणे केला आहे.

ही वृत्ते साधारणतः बरीच निर्दोष उतरली आहेत. काहीकाही जागी खटकतेही ; पण, 'दवडु नको रे रत्न गसवले दगडाच्या पोटी,' 'आदर्शाची मिरासदारी लाखांतुनि एका कळते' अशा सुंदर वृत्तबद्ध रचना ते करून जातात !

'कामात लक्ष रामा–वरी ठेव अंतरीचे' असे क्वचित छंदोभंगाचे व दूरावन्वयाचे दोष त्यांच्या कवितेत अढळतात. ग्रामगीतेत अशी स्थळ बरीच आढळतील-' भयाण भय वाटते भव-समुद्र पाहोनिया' अशासारखे अनुप्रासादी अलंकार त्यांच्या कवितेत अनायासे सहजरीत्या आलेले आहेत. श्लोकबद्ध रचनेच्या प्रत्येक ओळीचे पहिले अक्षर वाचले तर 'पुंडलीक वरदा हरिविठ्ठल' हा जयघोष तयार होईल अशीही चमत्कृतिपूर्ण रचना त्यांनी कधीकधी केली, पण ती काहीशी कृत्रिम वाटते. परंतु पुढील अनुप्रासमय रचना पाहून महाराजांचे साश्चर्य कौतुक वाटते–

(१) अचल अज अजर अमर असनाम ।।

अकथ अनथ अथ अविकल अक्षय, अचरज अकरन नाम ।।१।।
अनयन अप्रगट अनल अनामा, अभयद अमर अकाम ।।२।।
अटल अबल अधि अजगर अरसे, अधन अघन अनवाम ।।३।।
अपरस अवरस अचरण अनसे, अपट अतट अहमान ।।४।।
तुकड्यादास असर अवसरसे, अबनत अमल अजान ।।५।।

(२) मसल 'मन मनन मनत मन तार' ।।

मचवत मकर मगर महरनसो, मनहर मनतन मार ।।१।।
मरण–महन मँझधार मकारो, मदन–मरुत मरुपार ।।२।।
मधुर मँजुर मनि मन मोहनको, महशुर मगन मकार ।।३।।
मरदन मकर मदन मन कीन्हो, मवर मजुर मतवार ।।४।।
तुकड्यादास मँजिल मकरंदा, मसकत मँजन सार ।।५।।

(३) सजनसँग सतत सरब सत श्याम ।।

सरस सरदसम सहस सरबगत, सबल सकल सुखधाम ।।१।।

सदय समरद सम सरस सकलनत, सहचर सहगण श्याम ॥२॥
सबलय सरजित सजल सफलसो, सयन समन शुभकाम ॥३॥
सत्पथ सबको सकर सहावे, सहस सनर सत्नाम ॥४॥
तुकड्यादास सधे सत्संग, समरस सहय सहान ॥५॥

" रोहिणी " (संत विशेषांक)
जानेवारी १९५६

## १०. आर्वीच्या संत मायबाई

'आर्वीच्या संत मायबाई' हे माझे छोटेसे चरित्रपुस्तक दि. ३ फेब्रुवारी १९६२ रोजी वरखेड येथे तुकडोजींच्या आई कै. मंजुळामाता यांच्या पुण्यतिथी उत्सवाच्या वेळी प्रकाशित झाले. हे प्रकाशन मोझरी गुरुकुंज येथील गुरुदेव प्रकाशनाने काढले. यावेळी भाषण करताना डॉ. वि. भि. कोलते यांनी 'हे चरित्र-लेखन म्हणजे आरंभ असून या चरित्रात पुढे भर टाकण्यासाठी प्रचंड प्रयत्न लेखकाने करावे' अशी सूचना केली होती. या सूचनेचे पालन करण्याची पाळी याच महिन्यात अपरिहार्यपणे येईल असे वाटत नव्हते. तिकडे लक्षही एवढ्यात देण्याचा माझा विचार नव्हता. परंतु माझ्या पुस्तकातील काही विधाने बदलण्याची पाळी मजवर कोणी आणली नसली तरी माझ्या प्रामाणिक मनाने माझ्या चरित्रपुस्तकातील विधानांमध्ये नवीन भर घालण्यासाठी मला प्रवृत्त केले !

मायबाईंचे चरित्र लिहितांना मला श्री. सुदाम सावरकर यांच्या राष्ट्रसंतांचे जीवन-दर्शन या पुस्तकातील त्रोटक माहिती, संत तुकडोजींची काही वचने, कै. कदम (आर्वी) यांची व 'भक्तमहिमामृत' या ग्रंथाच्या फाटक्या कागदांची मदत झाली. मायबाईंच्या परंपरेतील नातेवाईकांकडून समाधानकारक माहिती मिळाली नाही. तो त्यांचा दोष नाही. त्यांना जे माहीतच नव्हते, त्याची माहिती त्यांनी कशी द्यावी ? पण दुसरी अडचण अशी की 'भक्तमहिमामृत' हा ग्रंथही मला चरित्रलेखनाच्या वेळी पूर्णपणे न मिळता फक्त मायबाईंवरील २-३ अध्यायच

मिळाले होते. त्यामुळे त्यावेळी काही खुलासे मला होऊ शकले नाहीत ! म्हणून मी श्री. थळी यांच्या संतसंघमालेत मायबाईंच्या मृत्यूचे जे साल दिले आहे, ते खरे मानून चाललो होतो. तरीपण संतसंघमालेत दिलेली मृत्यु–तिथी २७ एप्रिल ही मी अमान्य केली होती. पण साल १९१४ हे मी मान्य केले होते. थळींच्या पुस्तकातील माहिती पाहण्यापूर्वी मी हा निर्याणसन इतका आधुनिक ठरवायला मुळातच प्रतिकूल होतो. असो आता मायबाईंच्या निर्याणाची ही माहिती चूक असल्याचे मी पुन्हा स्पष्ट करतो !

जर मायाबाईंच्या मृत्यूचे साल १९१४ असते तर वरखेडला आड-कुजीबाबांकडे त्या कधी फिरकल्याचे त्या अवधीतील कुणीच कसे सांगत नाहीत ? आडकुजींचे निर्याण १९२० साली झाले. त्यांच्या आठवणी मात्र त्यांना पाहणारे लोक सांगतात.

पण याहीपेक्षा दुसरा भक्कम पुरावा माझ्या लक्षात आला आहे. सीताराम गुर्जर कवींचा 'भक्तमहिमामृत' ग्रंथ हा इ. स. १८९९ मध्ये वर्धा येथून प्रकाशित झाला आहे. हा ग्रंथ ओवीबद्ध असून त्यात ५७ संतांची चरित्रे ६२५१ ओव्यांमधून वर्णिली आहेत. या ग्रंथातच मायबाईंचे चरित्र असून त्यात त्यांची मृत्युतिथी आहे. सन–शक नाही. आता जो ग्रंथ १८९९ मध्ये छापला, त्याचे लेखन १८९९ पूर्वी झाले असणार ! मग त्याच्या लेखकाला १९१४ मध्ये समाधी घेतलेल्या व्यक्तीची निर्याणतिथी कशी सांगता येईल ? याचाच अर्थ असा की, मायबाईंचा निर्याणसन इ. स. १८९९ पूर्वीचा आहे. आडकुजी महाराजांच्या वयात व मायबाईंच्या वयातही यामुळे फरक पडतो व ते सुसंगत ठरते !

यावरून थळी यांच्या संतसंघमालेतील निर्याणाची माहिती चूक ठरते. थळींची माहिती एखाद्या भक्ताने पुरविलेली असावी ! त्यामुळे त्या भक्ताने ती चूक पाठविली असेल किंवा ज्यास थळींनी पत्र पाठविले असेल त्याने अंदाजाने पाठवून दिली असेल ! त्यामुळेच साल तर चुकलेच पण तिथीही चुकली ! जेथे तिथी खोटी ठरविण्यासाठी

'भक्तमहिमामृता'चा पुरावा स्पष्ट आहे, तेथेच तो सन चूक असण्यालाही आता उपयोगाला येत आहे.

तेव्हा, मायबाईंचा मृत्यू सन १८९० ते ९९ च्या दरम्यान आता अंदाजाने मानू या. कोणाकडे नक्की माहिती असल्यास ती त्यांनी प्रसिद्ध करावी किंवा पुरवावी, अशी विनंती आहे. निर्याणसनाच्या वरील अंदाजाप्रमाणे मायबाईंचा जन्मकाळही आपोआपच इ. स. १७९० ते १८०० च्या दरम्यानचा ठरतो. पण हेही अंदाजच आहेत. एवढे मात्र नक्की की मायबाई इ. स. १८९९ नंतर हयात नव्हत्या !

० ० ० ०

मायबाई शके १७७० मध्ये म्हणजे इ. स. १८४८ मध्ये हयात असल्याचा मात्र पुरावा आहे. त्याचाही उपयोग काळ ठरविण्यासाठी होईल. हा पुरावाही माझ्या पुस्तकलेखनाच्या वेळी मला मिळालेला नव्हता. ही माहिती प्रयागदत्त शुक्ल यांच्या ' हिंदी साहित्यको विदर्भकी देन ' या पुस्तकात नुकतीच मिळाली.

० ० ० ०

मायबाई चांद्याच्या निकालस महाराजांच्या दर्शनाला जात असत, हेही मला अलीकडेच निश्चित समजले आहे. तसेच ' कल्याण ' मासिकात मायबाईचे संक्षिप्त चरित्र ऑक्टोबर १९३७ मध्ये आले असून त्यांचे गुरू श्री निकालस महाराज उर्फ चेंडकेबुवा होते अशीही माहिती त्यात आली आहे. अर्थात मायबाईंच्या अन्य गुरूंची माहिती माझ्या मायबाई चरित्रात आधी आली आहेच. श्री. अ. ज. राजूरकर यांच्या चंद्रपूरच्या इतिहासात पृ. २९८ ते ३०५ मध्ये श्रीनिकालस महाराजांची माहिती आली असून ते इ. स. १८९५ मध्ये श्रावण वद्य नवमीला समाधिस्थ झाल्याचे तीवरून दिसते. प्रस्तुत पुस्तकात माय-बाईची मात्र माहिती नाही. या संदर्भात मला वरोऱ्याचे श्री. बाबुसा भटगरे यांनीही काही नवी माहिती पुरविली.

मिळाले होते. त्यामुळे त्यावेळी काही खुलासे मला होऊ शकले नाहीत ! म्हणून मी श्री. थळी यांच्या संतसंघमालेत मायबाईंच्या मृत्यूचे जे साल दिले आहे, ते खरे मानून चाललो होतो. तरीपण संतसंघमालेत दिलेली मृत्यु–तिथी २७ एप्रिल ही मी अमान्य केली होती. पण साल १९१४ हे मी मान्य केले होते. थळींच्या पुस्तकातील माहिती पाहण्यापूर्वी मी हा निर्याणसन इतका आधुनिक ठरवायला मुळातच प्रतिकूल होतो. असो आता मायबाईंच्या निर्याणाची ही माहिती चूक असल्याचे मी पुन्हा स्पष्ट करतो !

जर मायाबाईंच्या मृत्यूचे साल १९१४ असते तर वरखेडला आड-कुजीबाबांकडे त्या कधी फिरकल्याचे त्या अवधीतील कुणीच कसे सांगत नाहीत ? आडकुजींचे निर्याण १९२० साली झाले. त्यांच्या आठवणी मात्र त्यांना पाहणारे लोक सांगतात.

पण याहीपेक्षा दुसरा भक्कम पुरावा माझ्या लक्षात आला आहे. सीताराम गुर्जर कवींचा 'भक्तमहिमामृत' ग्रंथ हा इ. स. १८९९ मध्ये वर्धा येथून प्रकाशित झाला आहे. हा ग्रंथ ओवीबद्ध असून त्यात ५७ संतांची चरित्रे ६२५१ ओव्यांमधून वर्णिली आहेत. या ग्रंथातच मायबाईंचे चरित्र असून त्यात त्यांची मृत्युतिथी आहे. सन–शक नाही. आता जो ग्रंथ १८९९ मध्ये छापला, त्याचे लेखन १८९९ पूर्वी झाले असणार ! मग त्याच्या लेखकाला १९१४ मध्ये समाधी घेतलेल्या व्यक्तीची निर्याणतिथी कशी सांगता येईल ? याचाच अर्थ असा की, मायबाईंचा निर्याणसन इ. स. १८९९ पूर्वीचा आहे. आडकुजी महाराजांच्या वयात व मायबाईंच्या वयातही यामुळे फरक पडतो व ते सुसंगत ठरते !

यावरून थळी यांच्या संतसंघमालेतील निर्याणाची माहिती चूक ठरते. थळींची माहिती एखाद्या भक्ताने पुरविलेली असावी ! त्यामुळे त्या भक्ताने ती चूक पाठविली असेल किंवा ज्यास थळींनी पत्र पाठविले असेल त्याने अंदाजाने पाठवून दिली असेल ! त्यामुळेच साल तर चुकलेच पण तिथीही चुकली ! जेथे तिथी खोटी ठरविण्यासाठी

'भक्तमहिमामृता'चा पुरावा स्पष्ट आहे, तेथेच तो सन चूक असण्यालाही आता उपयोगाला येत आहे.

तेव्हा, मायबाईंचा मृत्यू सन १८९० ते ९९ च्या दरम्यान आता अंदाजाने मानू या. कोणाकडे नक्की माहिती असल्यास ती त्यांनी प्रसिद्ध करावी किंवा पुरवावी, अशी विनंती आहे. नियणिसनाच्या वरील अंदाजाप्रमाणे मायबाईंचा जन्मकाळही आपोआपच इ. स. १७९० ते १८०० च्या दरम्यानचा ठरतो. पण हेही अंदाजच आहेत. एवढे मात्र नक्की की मायबाई इ. स. १८९९ नंतर हयात नव्हत्या !

० ० ० ०

मायबाई शके १७७० मध्ये म्हणजे इ. स. १८४८ मध्ये हयात असल्याचा मात्र पुरावा आहे. त्याचाही उपयोग काळ ठरविण्यासाठी होईल. हा पुरावाही माझ्या पुस्तकलेखनाच्या वेळी मला मिळालेला नव्हता. ही माहिती प्रयागदत्त शुक्ल यांच्या ' हिंदी साहित्यको विदर्भकी देन ' या पुस्तकात नुकतीच मिळाली.

० ० ० ०

मायबाई चांद्याच्या निकालस महाराजांच्या दर्शनाला जात असत, हेही मला अलीकडेच निश्चित समजले आहे. तसेच ' कल्याण ' मासिकात मायबाईचे संक्षिप्त चरित्र ऑक्टोबर १९३७ मध्ये आले असून त्यांचे गुरू श्री निकालस महाराज उर्फ चेंडकेबुवा होते अशीही माहिती त्यात आली आहे. अर्थात मायबाईंच्या अन्य गुरूंची माहिती माझ्या मायबाई चरित्रात आधी आली आहेच. श्री. अ. ज. राजूरकर यांच्या चंद्रपूरच्या इतिहासात पृ. २९८ ते ३०५ मध्ये श्रीनिकालस महाराजांची माहिती आली असून ते इ. स. १८९५ मध्ये श्रावण वद्य नवमीला समाधिस्थ झाल्याचे तीवरून दिसते. प्रस्तुत पुस्तकात माय-बाईंची मात्र माहिती नाही. या संदर्भात मला वरोऱ्याचे श्री. बाबुसा भटगरे यांनीही काही नवी माहिती पुरविली.

० ० ० ०

मायबाईंच्या काही आठवणींपैकी एक अशी की, मायबाई ह्या आजचे अन्न उद्या शिल्लक ठेवीत नसत: संग्रहाचा सोस नको. पंगती उठल्या की घरात एकही अन्नपदार्थ उरू नये, असा त्यांचा कटाक्ष होता. तसेच त्या गुरांच्या शेणात सापडणाऱ्या ज्यारीच्या दाण्यांच्या भाकरी करून त्यावर गुजराण करीत असत. ही माहिती स्वत: संत तुकडोजी महाराजांनी वरखेड येथे दिनांक ३–२–१९६२ रोजी दिली !

" श्रीगुरुदेव "
एप्रिल १९६२

# ११. धनगर समाजातील काही विद्यमान संत

महाराष्ट्रात संतांना वाण नाही. प्रत्येक समाजात संत झाले आहेत. धनगर जमातही ह्याला अपवाद नाही. आजही काही संत विद्यमान आहेत. त्यांचा संक्षिप्त परिचय देत आहे.

**श्री चिंधे महाराज'**

गाडगे महाराजांच्या कीर्तनपंथात एकच माणूस खंजरी भजन करून स्वकृत कवनांच्या कार्यक्रमांनी गाजला. त्या पुरुषाचे नाव चिंधे उर्फ भुजंगबाबा ! भुजंगबाबाचा जन्म पुसद तालुक्यातील लोहारा नामक एका खेड्यात १९२४ साली झाला. शाळेचे शिक्षण त्यांना पहिलीदुसरी-पेक्षा जास्त लाभले नाही. घरची परिस्थिती व जुनाट वातावरणामुळे हे घडले.

मोखबोरी या गावी गाडगे महाराजांचे कीर्तन ऐकून प्रभावित झालेल्या भुजंगांनी एक दिवस घर सोडले. काही दिवस भटकत राहिले व पुन्हा मोखबोरी येथेच कैकाडी महाराजांच्या कीर्तनात भुजंगांची वृत्ती बेभान झाली. कैकाडी महाराज कडकपणासाठी प्रसिद्ध ! त्यांनी भुजंगाची परीक्षा घेतली व तीत उत्तीर्ण झाल्यामुळे भुजंगास आपल्या फडात घेतले.

थोड्याच दिवसांत भुजंगबाबा ऊर्फ चिंधेबाबा कीर्तनकार झाले व स्वतःच्या गावात स्वतःच्या वडिलांच्या पुढही समाजात कीर्तन करण्याचे प्रसंग येऊ लागले.

चिंधे महाराजांनी अनेक भजने व पदे स्वतः रचली. त्यांची काही पुस्तकेही निघाली आहेत. ते सुंदर कीर्तन करतात व त्याहीपेक्षा गोड चालीवर भजने गातात. खंजरी फारच छान वाजवतात. यवतमाळ, धामणगाव या भागात त्यांची भजने-कीर्तने न ऐकलेली व्यक्ती फारशी आढळणार नाही. गाडगे महाराजांच्या पंथात एक उत्तम भजनी संत म्हणून त्यांची ख्याती आहे.

आजकाल चिंधे बाबांनी यवतमाळजवळील एका लहानशा खेड्यात दीनाश्रम नामक आश्रम काढून तेथे विधायक प्रवृत्ती वाढविण्याचे ठरविले आहे.

**गोरेगावचे श्री पुंडलीक बाबा**

काही संत समाजव्यवहाराला वळण लावतात. काही संत अवलिये असतात. तसे संत काही वेळा निंदेस पात्र ठरतात ; पण काही सुशिक्षितांच्या अश्रद्धेने तसे होते. काही वेळा अवलियेपणाचे सोंग घेणारे पोटभरू व खरे विदेही संत यांत भेद असतो, हे कळत नाही, म्हणून घोटाळे होतात. काही लोक तो पोटाचा प्रश्न करतात व म्हणून खरे विदेही संत लक्षातच येत नाहीत ! याउलट काही लोकांची अपार श्रद्धा, समाजलक्षी इतर संतांपेक्षा या विदेही व पूर्वजन्मीच्या योगभ्रष्ट संतांना लाभते! अशा संतांपैकी गोरेगावचे पुंडलीक बाबा आहेत ! त्यांच्याबद्दलचे अनेक अनुभव कथन करण्यात येतात ! हाही अवलिया विदेही संत धनगर समाजातून निपजला हे महत्वाचेच मानायला हवे.

तसेच श्री. किसनमहाराज खर्डेकर हेही धनगर समाजाचेच असून कीर्तनकार म्हणून प्रसिद्ध आहेत. गाडगे महाराजांच्या पंथात स्वतः गाडगेबाबा जिवंत असतानाच किसनबुवांनी अपार लोकप्रियता ग्रामीणमहाराष्ट्रात मिळविली होती.

'अहिल्यावाणी' (१९६४)

# १२, गुरू नसल्याचे शल्य की समाधान ?

तुकाराम महाराजांनी लौकिक गुरू केला नाही. तुकारामाच्या जीवनात जिवंत अशी कोणीही व्यक्ती गुरू या नात्याने आली नाही. ह्याला पुरावा तुकारामाच्या एका अभंगातच आहे तो असा–

सद्‌गुरुराये कृपा मज केली ।।
परी नाही घडली सेवा काही ।। १ ।।
सापडविले वाटे जाता गंगास्नाना ।।
मस्तकी तो जाणा ठेविला कर ।। २ ।।
भोजना मागती तूप पावशेर ।।
पडला विसर स्वप्नामाजी ।। ३ ।।
काही कळे उपजला अंतराय ।।
म्हणोनिया काय त्वरा जाली ? ।। ४ ।।
राघवचैतन्य केशवचैतन्य ।।
सांगितली खूण माळिकेची ।। ५ ।।
बाबाजी आपुले सांगितले नाम ।।
मंत्र दिला ‘ राम कृष्ण हरी ’ ।।
माघ शुद्ध दशमी पाहुनि गुरुवार ।।
केला अंगीकार, तुका म्हणे ।। ७ ।।

वरील अभंगावरून तुकारामास गुरु–उपदेश झाला तो स्वप्नातच, हे सांगायला नकोच. शिवाय, हा गुरूपदेश समकालीन व्यक्तीने स्वप्नात

येऊन दिला नव्हता. उपदेश देणारी ही व्यक्ती तुकारामापूर्वीच समाधिस्थ झाली होती. तुकारामाचे व त्यांचे दर्शन होण्याचा अर्थात प्रश्नच उरत नाही. महिपती यासंबंधात म्हणतात—

बाबाजी चैतन्य योगीराज धन्य ॥
तु क या ला गू न प्र ग ट ले ॥ १ ॥
शालिवाहन शके चौदाशे त्र्याण्णव ॥
प्र जा प ति ना म सं व त्स री ॥२॥
वैशाख वद्य द्वादशीचे दिनी ॥
समाधी स्वामींनी घेतलीसे ॥ ३॥
तेथून तीस वर्षां भेटी तुकयासी ॥
दे ऊ नी त या सी पू र्ण प णे ॥४॥
महिपती म्हणे झाले समाधिस्थ ॥
तु क या क्री ड त ब्र म्हा नंदे ॥५॥

तुकारामास प्रत्यक्ष गुरू लाभला नाही म्हणून ते स्वतःच्या पायावर पुढे गेले आणि म्हणून त्यांचे काव्य अधिक उजळले, उत्कृष्ट उतरले, असे सांगण्याचा प्रयत्न होतो. त्यांच्या जातिहीन(!) तेतून त्यांच्या काव्यास उजाळा मिळाला हे समर्थन जसे खरे नाही, तसेच गुरुविहीन तुकाराम स्वकष्टाने पुढे जाऊन उजळले हेही तितकेसे संयुक्तिक नाही. किंबहुना, तुकारामास गुरू नव्हता हेच मुळी त्या काळास आवश्यक होते. तुकारामास गुरू नसल्याचे वाईट वाटत नव्हते! तो त्यांच्या जीवनात प्रत्यक्ष आला नव्हता म्हणून व्यक्तिगत त्यांना कधीही दुःख वाटले नव्हते किंवा तसले कसले शल्यही त्यांस बोचण्याची आवश्यकता नव्हती! लौकिक गुरूपेक्षा प्रत्यक्ष परमेश्वर हाच त्यांना गुरू वाटत होता, हे त्यांच्या पुढील वचनावरून पटते—

माझ्या विठोबाचा कैसा प्रेमभाव ।
आपणचि देव होय गुरू ॥

तुकारामांनी प्रत्यक्ष गुरूपासून उपदेश न घेण्यात तत्कालीन परिस्थिती

कारण आहे. काळाचा मागोवा घेतल्यास असे दिसून येईल की, तुकारामास काय पण कोणालाही सद्गुरू लाभावा व तणेकरून जीवनाला चांगली कळा यावी असा तो काळ नव्हता. गुरूबाजीचे प्रस्थ वाढले होते. "बोले तैसा चाले। त्यांची वंदावी पाऊले।।" असे पुरुष शोधूनही सापडणे शक्य नव्हते. "शिष्याची जो ठोघे सेवा" असे गुरू मिळणे दुरापास्त होते. उलट –

शिष्या सांगे उपदेश। गुरुपूजा हे विशेष।।
दावी आचार सोवळे। दंडकमंडलू माळे।।
छाटी भगवी मानसी। व्यर्थ म्हणवी संन्यासी।।
तुका म्हणे लोभ। न सुटे लाभ . . .।।

अशा तऱ्हेचे पायघोळ संतच समाजात घोळ घालून जनतेचे शोषण करीत होते. म्हणूनच तुकारामांनी "जळो जळो ते महंती" असे तळतळून म्हटले.

संतांच्या शिकवणीवर अंतःकरणापासून विश्वास बसला तर गुरूचा उपदेशसुद्धा घेण्याची जरूर नाही, हे तुकारामांचे प्रामाणिक मत होते. त्यामुळे त्यांनी ढोंगी गुरूंची व गुरूबाजीची जळजळीत शद्बांत निर्भर्त्सना केली–

घालुनिया मध्यवर्ती। दाटुनि उपदेश देती।।
ऐसे पोटभरे संत। तयां कैसा भगवंत ?।।
रांडापोरांते गोविती। वर्षासन ते लाविती।।
जसे बोलती निरोपणी। तैसी न करती करणी।।
तुका म्हणे तया। तमोगुणियाची क्रिया।।

किंवा––

जळो जळो ते गुरुपण। जळो जळो चेलेपण।।
गुरू आला वेशीद्वारी। शिष्य पळती खिडारी।।
कशासाठी जाले येणे। त्याचे आले वर्षासन।।
तुका म्हणे चेला-। गुरू दोघेही नरकाला।।

वर्षासने लावून गुरूबाजीचा व्यापार करणारा हा तत्कालीन वर्ग किती प्रमाणात वाढला असावा, कोणत्या पातळीला गेला असावा हे वरील अभगांवरून दिसून येईल. अशा गुरूपासून तुकाराम अलग राहिले हे उचितच झाले. गुरू केलाच पाहिजे, अशा तऱ्हेचा आग्रह करण्यात अर्थ नाही, हे स्वानुभूत सत्य त्यांनी आदर्श म्हणून समोर ठेवले. समाजातल्या ढोंगबाजीला आळा बसण्यासाठी त्या घटनेचीही फार मदत झाली असली पाहिजे ! गुरू मिळाला नाही, म्हणून तुकाराम अभागी होते, इतर संतांप्रमाणे त्यांना हे भाग्य लाभले नाही, त्यामुळे त्यांस काहीतरी खटकत होते; म्हणून त्यांची वाणी अधिक परिणामी ठरली, विरोधातून वाणी विकसित झाली असे म्हणण्यापेक्षा गुरूला त्यांचा सक्रिय विरोध होता, समाजात गुरूच्या लायकीचे पुरुष नव्हते म्हणून त्यांनी गुरूच करण्याचे नाकारले, ते त्या फंदातच पडले नाहीत, असे म्हणणे अधिक उचित होईल.

### गुरूच हवा काय ? मग हा घ्या !

गुरू नको म्हटले, तरी समाजात काही वरच्या धेंडांना परंपरेचा अती अभिमान असतो. ते परंपरेवरून पुढच्याची योग्यता पारखायच्या घालमेलीत असतात. एखाद्या व्यक्तित्वशाली व्यक्तीच्या कह्यात येण्यासाठी ते काहीकाही लहानसहान बाबींबाबतच अडून बसतात. गुरू हवाच, अशा वृत्तीचा समाजात आणखी एक अज्ञ-वर्ग असतो. वरील दोन्ही–सुज्ञ आणि अज्ञ–लोकांत लोकसंग्रही तुकाराम महाराजांना कार्य करावयाचे होते. वरील दोन्ही प्रकारांतल्या गुरुप्रेमी (!) जनांच्या तोंडावर मारण्यासाठी तुकारामांनी गुरू न करताही आपणास गुरू असल्याचे सांगून टाकले ! एकीकडे लौकिक गुरू करणे मनाविरुद्ध होते; दुसरीकडे काहीही सांगून ज्यांचे समाधान होत नाही, गुरुवाचून चालू शकते, हे ज्यांना पटूच शकत नाही त्या लोकांचे समाधान करणेही लोकसंग्रही तुकोबांस आवश्यक होते. म्हणून त्यांनी काही वर्षीपूर्वीच होऊन गेलेल्या एका चैतन्यपुरुषाला स्वतःच्या स्वप्नात आणले ! हा

चैतन्यपुरुष लोकांना जवळ वाटावा असाच असला पाहिजे हेही तारतम्य तुकारामबुवा राखणार नाहीत, तरच नवल !

कवित्व करण्याच्या स्फूर्तीला व स्वकृत अभंगवाणीला जनतेच्या विश्वासाचे भरपूर पाठबळ मिळावे यासाठी तुकारामांनी दुसरे एक स्वप्न सांगितले. कविहृदयाचे आगरच असे तुकोबा काव्यमय रीतीने हे स्वप्न सांगतात–

नामदेवे केले स्वप्नामाजी जागे ।
स वे पां डु रं गे ये वो नि या ।। १ ।।

या दोन्ही दाखल्यांतील स्वप्नामुळे लौकिक गुरूच्या कल्पनेला बाध आला व तुकोबांच्या पथ्यावरच ते पडले, हे सांगावयाला नकोच !

ह्या दोन्ही 'स्वप्नमय उर्फ काव्यमय' घटनांतील मर्म अधिक उलगडायची आवश्यकता नाही ! तुकोबांच्या जीवनात गुरूला किती गौण स्थान आहे ह्याची ही निदर्शके आहेत. तुकोबांस गुरूची गरज नव्हती. 'गुरू करा' असे त्यांना म्हणायचेच नव्हते. पण सांगूनसवरूनही समाधान होणार नव्हते. त्यांना समजावण्यासाठी लोकसंग्रही बुवांनी आपल्या लोककल्याणकार्याचे अधिष्ठान आणखी भरभक्कम व्हावे म्हणून चैतन्य–नामयाला मुद्दाम स्वप्नात आणून बुरसट लोकांचे समाधान केले ! ह्यामुळे तुकाराम अर्थात त्या बुरसट लोकांच्या दृष्टीने गुरुप्राप्तीकारणे 'पूर्ण पुरुष' झाले ! साधनांचा अभाव जीवनाच्या प्रगतीला बाधक ठरू शकत नाही; अंतःकरणाची ऊर्मी उफाळती असली आणि सत्य संकल्पांची विशुद्ध सारणी निर्मळ जीवनात नित्य प्रवाहित होत राहिली तर 'जागृतीचा नित्य नवा दीस' पाहता येणे काहीच कठीण नाही, हेच तुकारामांच्या जीवनातील या गुरुदृष्टान्त – प्रकरणांवरून दिसून येते !

**अहंकार नको म्हणूनही गुरूची मध्यस्थी !**

स्वप्नात का होईना गुरुदर्शन घेतले, नामदेवापासून स्फूर्ती घेतली व पांडुरंगभेट घडवून आणली यात आणखी एक उद्देश आहे. आपल्या

कर्तृत्वाचे श्रेय खरे म्हणजे आपल्यालाच असते. पण ते आपल्याकडेच घेतले तर अहंकाराचा वारा लागतो व त्या भाराखाली मिळविले ते दुरावते; मिळायचे तेही मिळत नाही. तुकारामबुवांच्या इतर संतांप्रमाणेच असलेल्या संतवृत्तीला अहंकाराचा वारा आतळण्याची शक्यता नसली तरी सामान्यांना आपला आदर्श गिरविता यावा म्हणूनही निरहंकारित्वाचे गूज स्वप्नगुरूच्या घटनेत त्यांनी गोवून दिले असले पाहिजे. गुरुमूर्ती कल्पायची व तिला सारे श्रेय देऊन आपण मोकळे व्हायचे हा संतांचा पूर्वसंकेत तुकोबांनी या रूपाने पाळला !

**नम्रतेची अतिशयोक्तिसुद्धा अर्थवादात्मकच !**

अहंकार अंगाशी लगट करायला येऊ नये आणि त्यामुळे स्वकर्तव्याला ढळ पोहचू नये म्हणून म्हणा किंवा समाजाला आपलेसे करण्यासाठी म्हणा, साऱ्याच संतांनी नम्रतेची अतिशयोक्ती केली आहे. संपूर्ण दोषांचे आपण आगर असून आपल्याला काहीच येत नाही, अशी भूमिका संतांनी पत्करली, त्यात अर्थात सत्यता पाहणे इष्ट होणार नाही. त्यात अर्थवादात्मकताच फार !

आपुलिया बळे नाही मी बोलत ॥
सखा भगवंत वाचा त्याची ॥ १ ॥
काय म्या पामरे बोलावी उत्तरे ॥
परि त्या विश्वंभरे बोलविले ॥ २ ॥

या वचनांत, 'ईशकृपेचा अंश' असला तरी ईश्वर कर्ता-सवरता, तुकाराम अकर्ता असे समजता येणार नाही. तुकारामात कवित्वाचे सामर्थ्य मुळात नव्हतेच असा याचा अर्थ नव्हे. 'मूळचा खरा झरा' तुकारामात होताच !

**संतांच्या उद्‌गारांतून त्यांचे व्यक्तिगत जीवन शोधण्यात धोका !**

नम्रतेच्या संदर्भात " लहानपण देगा देवा । मुंगी साखरेचा रवा," " नीचपण बरवे देवा " या वचनांना सिद्धांतरूप म्हणून सोडून दिले

किंवा "मी दीन पातकराशी । क्रियामतिहीन" अशा उद्‌गारांतून अथवा सत्पुरुषांचा पायपोस होण्यासाठी धडपडून स्वतःस 'तुक्या' म्हणवून घेण्यात नम्रता उतास आली असली तरी अशासारख्या तथाकथित आत्मपरीक्षणात्मक अभंगांतून निखालस तुकया-जीवनाचा चित्रपट उभा करणे इष्ट होणार नाही. त्या त्या क्षणी त्या त्या संदर्भात स्फुरलेल्या भावगीत-ऊर्मी म्हणजे तुकोबांचे अभंग ! त्यांतून सुसंगत जीवन उभारणे शक्य तरी आहे काय ? छापलेल्या गाथेतून किंवा आपल्या सोयीप्रमाणे अभंगांचा क्रम ठरवून, तुकोबांचा जीवनपट मांडून स्वतःला सोयीचे असे त्यांचे चरित्र विवेचावयाचे धोरण बरोबर नाही असे मला वाटते. उपरोक्त वचनांप्रमाणे नम्रतेची ( सकारण ) अतिशयोक्ती संतकाव्यात होणे अपरिहार्य असते. मात्र त्यावरून त्यांच्या जीवनाशी व्यक्तिगत दृष्टीने त्या वचनांचा संबंध एकदम लावणे इष्ट होऊ शकत नाही. तुकोबांच्या पारमार्थिक जीवनाच्या विकासाच्या टप्प्यांचा विचार करताना नेमकी हीच चूक विवेचकांकडून होते. तुकोबा भावगीतरूप अभंग लिहून ज्याक्षणी मोकळे होतात त्याच वेळी तो भाव सर्वगत होतो; साधारणीकरण होऊन जाते. तुकोबा दबल्या जीवांचे, नम्र भावांचे, संसारी जनांचे दर्शन घडवितात. त्यात 'तुकाराम' ही 'व्यक्ती' उरतच नाही !

"श्रीगुरुदेव"
१९५७

## १३. ‘ बरे झाले कुणबी केलो ’

आपण खालच्या जातीत जन्मलो, याचे शल्य तुकारामांस बोचत होते, तुकारामांस आपल्या ‘अब्राम्हणत्वा’ची जाणीव तापद होत होती असा आभास उत्पन्न केला जातो. परंतु तो केवळ आभासच आहे ; सत्यता तेचा त्यात अंशही नाही. तसे पाहिले तर तुकाराम स्वत: ‘वैकुंठवासी ऋषी’ होते. विशिष्ट अवतारकार्य करण्यासाठी ते आले होते ! त्यांनी जाणूनबुजून अवतार घेतला होता. हेच दुसऱ्या शद्बांत सांगावयाचे झाले तर असे म्हणता येईल की, तुकारामांचे पूर्वजन्मसंस्कार वरच्या दर्जाचे होते. तें जन्मास आले, तेच मुळी पूर्वसुकृताचे फार मोठे घबाड बरोबर घेऊन ! ते ‘तयार’च होते. ते ‘घडलेले’च होते. त्यांना घडविण्याची आवश्यकताच नव्हती. तसे नसते तर इतका कमी शिकलेला, अनुकूलता नसलेला माणूस त्यावेळच्या समाजाचा एकमेव प्रतिनिधी होऊ शकला नसता. हे खरे आहे की, तुकारामांचे संपूर्ण जीवन प्रयत्नवादाचा एक आदर्श नमुना वाटावे असे आहे. प्रयत्नांच्या दिशेने वाढत वाढत जाऊन कळसाला पोहचल्याचे विलोभनीय दृश्य तुकारामांच्या जीवनात दिसते. पण हे दृश्य दिसण्याचे कारण, सामान्यांपुढे काही आदर्श त्यांना ठेवावयाचे होते, हे होय. अलौकिकतेच्या कोटीत एकदम जाऊन बसल्याने किंवा चमत्कारांच्या कक्षेत कार्याला ढकलल्याने समाज कर्तव्यविन्मुख होतो. देहधाऱ्याला देहधर्म सुटत नाहीत. देहधाऱ्याने देहधर्माला धरूनच आपले जीवन पुढे रेटायला हवे ! हे अलौकिक पुरुषाच्याही वाट्याला येते ; म्हणूनच तोसुद्धा प्रयत्न आणि प्राप्तकर्तव्य यांना वगळून जीवन जगण्याच्या भरीस पडत नाही.

सांगायचे तात्पर्य हे की, तुकारामांस आपल्या तथाकथित हीन जातीचे शल्य बोचत नव्हते. उलट त्यांना आपल्या जातीचा अभिमानच (अर्थात सात्विकतेला सोडून नसलेला) वाटत होता. 'बरे झाले कुणबी केलो' या म्हणण्यात जातिहीनतेची बोचणी नाही की टोचणी नाही. स्वतःच्या यातीचे हे समर्थनही नाही किंवा त्यात दर्पोक्तीहि नाही. तुकारामाच्या काळी समाजाला नीतिपाठ देण्याची जबाबदारी असलेला व उच्च म्हणवणारा ब्राम्हणवर्ग अक्षरशः भ्रष्ट झाला होता ! त्या वर्गात आवश्यकतेपेक्षा अवडंबर आणि भंपकताच जास्त होती ! राजकारणाच्या रंगतीचे नावसुद्धा नव्हते. रडतराऊतांची रड आणि तथाकथित राजकारण यांची युती जमली होती. वरिष्ठ म्हणविणाऱ्या लोकांची बहुजनसमाजास ऊब अशी मुळीच नव्हती. अशा वर्णात जन्म मिळाला नाही, याचे तुकारामांस वाईट वाटण्याचे कारणच नव्हते.

त्यावेळच्या, ब्राम्हण सोडून सर्व बहुजनसमाजाच्या दारुण दुःखांना वाचा फोडण्यासाठी बहुजन समाजाचाच माणूस हवा होता. सामान्यांची सर्वसाधारण शल्ये वरच्यांना तितकीशी आकलन व्हावयाची नाहीत. झालीही तरी बहुधा त्यांच्या पाहण्याची दृष्टी वेगळी पडते. तुकाराम हे दबलेल्या, पिचलेल्या, रगडलेल्या जिवांचे प्रतिनिधी होते. त्यांना आपले कार्य यशस्वीपणे करावयाचे होते. ते करताना आपण बहुजनसमाजाचे प्रतिनिधी आहोत ह्यात तुकारामांस वाईट वाटण्याऐवजी आनंद व अभिमानच वाटायला हवा !

तुकारामाच्या शब्दांना आलेली धार त्यांच्या वैयक्तिक दुःखांचा परिणाम नसून, ते ज्याचे प्रतिनिधित्व करीत होते त्या उपेक्षित दुर्लक्षित दलित बहुजनांच्या दारुण अन् दाहक दुःखांमधून टिपलेल्या अनुभूतीचा तो परिपाक होता. तुकारामाच्या जातिहीनतेच्या दुःखांतून त्यांचे काव्य अधिक त्वेषपूर्ण झाले आणि त्यात उत्कटता आली ह्या भ्रामक समजुतीचा प्रचार अनेकदा होतो तो मुळातच चूक आहे, असे हे प्रतिपादन आहे.

तुकारामांनी बरेचदा 'यातिहीन' 'मतिहीन' हे शद्ब वापरले खरे;

पण हे शद्व त्यांच्या जातिहीनतेच्या मनोदौर्बल्यातून वा मनोगंडातून उतरले नाहीत. त्यावेळचा ब्राम्हणसापेक्ष हा शद्व आहे. ब्राम्हणवर्ग सोडला तर बाकीच्या सर्वच लोकांना हीन संबोधण्याची त्यावेळची वरिष्ठांची एक आवडती चाल होती. (जी आताही अनेकदा वापरण्यासाठी काही वरिष्ठ लोक आणि साहित्यिक कमी करीत नाहीत!) तुकारामांनी तिचा आश्रय घेतला खरा; पण तो त्यावेळच्या शद्वांचा आशय समजावण्यासाठी होता, समजण्यासाठी होता. यातिहीन समजल्या जाणाऱ्या साऱ्या समाजाचे प्रतिनिधित्व तुकारामांनी केले. ब्राम्हणांव्यतिरिक्त साऱ्या समाजची कुचंबणा होत होती. त्या समाजात आपल्यासंबंधी हीनत्वाचा गंड निर्माण झाला होता; तो वरच्यांच्या तशा संबोधण्यावरून व वागणुकीवरून निर्माण झाला होता. तुकारामांनी हे हेरले. त्यांनी स्वतःचा नव्हे, तर तत्कालीन बहुजनसमाजाचा (बहुजनसमाज हा आजचा शद्व आहे; त्यावेळचा शद्व यातिहीन किंवा शूद्र) न्यूनगंड कमी करण्यासाठी तुकारामांनी यातिकल्पनेच्या वैय्यर्थ्याची जाणीव पुनःपुनः देण्याचा प्रयत्न केला. ही जाणीव खालच्या आणि वरच्या, दोन्ही समाजाला द्यावयाची होती.

त्याचा होय भूमिभार । नेणे यातीचा आचार ।।

यात त्यांना दोन्ही समाजांना सांगावयाचे होते, असे दिसते. खालच्या समाजाला वरच्यांनी नीच लेखू नये व खालच्यांनीसुद्धा आपल्याला हीन लेखण्याची काहीच आवश्यकता नाही. किंबहुना प्रचलित जातिसंस्था ही समाजव्यवस्थेला तितकीशी पूरक नसल्याने तिचा बडेजाव न करता, भेदांच्या भव्य भिंतींत बहुजनसमाज भरडला-चिरडला जाऊ नये (कारण हाच जास्त चिरडला जाऊ शकतो) यासाठी समतेची द्वाही तुकोबांनी फिरविली. तत्कालीन हीन (?) जातींचे प्रतिनिधित्व स्वीकारल्यामुळे व ते प्राप्तकर्तव्यच असल्यामुळे तुकारामात अभिनिवेश अवश्य आला; पण तो खालच्या पातळीवरचा खास नव्हता. त्यात कुत्सेचा कुवास नव्हता की अतिरेकी अभिमानाचा अंशही नव्हता. समाजातील न्यूनगंड काढून टाकून त्याच्यात आत्मविश्वास निर्माण करणे

सर्वप्रथम आवश्यक होते. न्यूनगंडमोचनार्थ म्हणूनच तुकोबा पुनःपुनः सांगतात—

१. तुका म्हणे नाही जातीसवे काम
२. वर्ण-अभिमाने कोण झाले पावन ?
३. यातायातीधर्म नाही विष्णुदासा
४. ब्राम्हण क्षत्रिय वैश्य शूद्र । चांडाळाही अधिकार
५. समर्थासी नाही वर्णावर्ण भेद
६. भेदाभेद भ्रम अमंगळ
७. तुका म्हणे याती । हो का तयाची भलती
८. यारे यारे लहान थोर । भलते याती नारीनर

अशी अनेक अवतरणे देता येतील.

तुकोबा हे जातिभेदावर हल्ला करूनच थांबत नाहीत; तर समाजात कुलहीनता किंवा कुळाचा व्यर्थाभिमान संरक्षणीय नव्हे, असे त्यांचे मत आहे—

शुद्ध हीन काही न पाहसी कूळ ।।

कुळभेदावरून तुकाराम लिंगभेदापर्यंत पोहचतात व स्त्रियांचा कैवार घ्यायला पुढे सरसावतात—

नरनारी याती । हो कोणी भलती ।

—असे सांगून ते नर वा नारी यांच्या 'याती'तील भेद नष्ट करून स्त्रियादी उपेक्षितांना समता प्रदान करतात. 'बाळे, नारी, नर । आदिकरोनी वेश्याही ' त्यांच्या या समतेतून सुटत नाहीत.

तुकारामांची अशी विचारसरणी स्त्री, बाळे, शूद्र इ. हीन समजल्या जाणाऱ्यांच्या हीनत्वविषयक भावनेतून रडत-पडत बाहेर पडली नाही; तशी ती निर्माण झाली नाही. कारण तुकारामांस कोण्या एका जातीस हीन वा उच्च लेखावयाचे नव्हते; तर त्यावेळच्या उच्चवर्गीयांच्या कल्पनेतून हीन समजल्या जाणाऱ्यांच्या मनातील रुखरूख त्यांना काढून

टाकावयाची होतो. ‘आपण लहान नाही, आपणही काही करू शकतो’ हे आत्मविश्वासपूर्वक वाटावे म्हणून तुकोबांनी उक्त प्रतिपादनाचा प्रपंच केला व अशिक्षित, अडाणी, अज्ञानीं समाजाला लवकर पटावे म्हणून सर्वसुलभ देवाधर्माचे व जवळच्या श्रद्धामार्गाचे माध्यम अंगीकृत कार्यासाठी निवडले. आपल्या देशातील जनता जागृत होण्यासाठीं बौद्धिकता तोकडी पडते; तर्क थिटा होतो; ज्ञान उणे होते. आश्रय अखेर भावनेचा, श्रद्धेचा आणि देवाधर्माचाच घ्यावा लागतो. या आसऱ्यावर प्रचंड प्रमाणात पसरलेल्या अज्ञ समाजाला जुनीच पण नव्यांचा पेहेराव चढवलेली तत्वे सांगावी लागतात; नव्हे ती पचनी पडतील असे सक्रिय वातावरण निर्माण करावे लागते.

म्हणूनच, तुकारामांनी आणखी पुढे जाऊन, समाजात आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी अज्ञ, भोळ्याभावड्या, हीनदीन दरिद्रांचा देवाला मध्ये घालून कैवार घेतला—

१. कृपावंत किती । दीन बहू आवडती ।।

२. तयासी नेणती । बहू आवडती ।।

असे सांगताना त्यांनी उपमन्यू, ध्रुवबरोबरच हीनदीनांचा उल्लेख केला—

पव्हे सुदामदेवाचे । फके मारी कोरडेच ।।

तुकोबांचा हा देव सुदाम्याच्या घरीच राबायचा; कोरडेच फके मारून उपेक्षितांचे दुःख काय असते हे अनुभवावयाचा ! दरिद्री, गांजलेल्यांची बाजू मांडून त्यांना तुकारामांनी दिलासा दिला व भोळ्या–भाविकांनाही देव साह्य होतो असा निर्वाळा बेधडकपणे देऊन टाकला !

नाहीतरी पिचलेल्या समाजाला पहिल्यांदा हेच सांगायचे असते व तेच नमके तुकोबांनी केले !

“श्रीगुरुदेव”–१९५७

# १४. तुकारामाची ‘ रांडापोरे ’

तुकाराम महाराज समाजाच्या सुखासाठी झटणारे होते. समाजाच्या भल्यासाठी त्यांची तळमळ होती. आपल्या लोकांना सुधरविण्याचे कंकणच हाती बांधलेल्या माणसाला कधीकधी रागवावे लागते. अशा रागावण्याचा परिणाम अनुकूल आणि प्रगतिपोषकच होतो. मोठी माणसे रागावतात म्हणून लहान लोक सुधरतात. अनेक साहित्यिक टीकाकारांकडून तुकाराम महाराजांच्या ‘रांडापोरां’ वर टीका होते, ती मुळात चुकीची आहे. तुकारामाची ‘ रांडापोरे ’ तळमळीतून जन्मली आहेत. जेंव्हा लोक ऐकत नाहीत तेव्हा तुकाराम कधीकधी एकदम त्वेषात येऊन बोलत--

काय करू आता न ऐकती बटकीचे ।
पुढे सिंदळीचे रडतील ।।

तुकारामाचे असे बोल खालच्या दर्जाचे व विकृत असते तर त्यांना आम्ही डोक्यावर घेतले नसते. पण तसे झाले नाही.

याबाबत एक गोष्ट लक्षात ठेवावयाला हवी की बहुजनसमाजाच्या जीवन-संस्कृतीची जाणीव नसणाऱ्यांनीच तुकारामाच्या ‘रांडापोरा’वर आक्षेप घेतले आहेत. देश, विभाग, जाती, स्थळ काल यांना सापेक्ष अशा शिष्टाशिष्ट कल्पना असतात. ‘रांडापोरे’ या शद्बातील खमकेपणा न समजून शिष्टभाषी आपल्या अपेक्षेने या शद्बास दूर लोटत असले तरी हा शद्ब बहुजनसमाजामध्ये सर्रास

वापरला जातो. 'पोरे' तर वावगी नाहीतच! सुशिक्षितांनाही त्यात कसल्याच विकृतीचा वास यावयाचा नाही. पण 'रांडा'चा अर्थ 'स्त्रिया' एवढाच ग्रामीण समाजात आहे. तो शब्द वापरण्यात अपमान, विकृती वगैरे खेड्यापाड्यात पाहिली जात नसते. तसे काही अशा उच्चारण्यात अभिप्रेतच नसते. ग्रामीणांत हा शब्द वापरताना अश्लीलता वा आमच्या मनात उभा राहणारा विकृतार्थ येत नाही.

शिदळी, बटकी यांप्रमाणे 'बरे तरी देऊ गांडीची लंगोटी' या पंक्तीतील 'गांडीची लंगोटी' या शब्दाचीही गोष्ट अशीच आहे. यांतील पहिला शब्द स्वतंत्र उच्चारला तर बरेचदा अश्लील अर्थ ग्रामीणांच्याही समोर येतो. मात्र तोच शब्द 'लंगोटी' या शब्दाच्या आरंभी जोडून आला की तो चांगला होतो. सर्रास तो वापरण्यात येतो, तेव्हा त्यात अश्लीलतेचा मागमूसही नसतो. त्यात तसे त्यांना काहीच–अगदी काहीच-दिसत नाही. ज्या लोकांसाठी तुकारामाने हा पाचवा वेद निर्माण केला त्या लोकांच्या शब्दांची पेरणी, वाक्प्रचारांचा वापर आपल्या अंभगवाणीत केला. आम्हा शिष्टभाषी लोकांना त्यात आक्षेपार्ह आढळावे, यात आमचा दोष आहे; तुकारामाचा त्याला इलाज नाही. संस्कृतातील क्लिष्ट भाषेतील वा आवरणाखालील विनोद आम्हास चालू शकतो. पण अश्लीलतेकडे वा शृंगाराकडे किमपिही न झुकणाऱ्या तुकारामाच्या 'रांडापोरां'चा आम्हाला मात्र राग येतो. तुकारामाने वापरलेले शब्द आज त्वेष आणतात. शृंगार–बिभत्सात त्याची परिणती बहुजनसमाजात मुळीच होत नाही, हे सत्य आहे. अनुभवावर आधारलेले हे विधान आहे, असे येथे मुद्दाम नम्रपणे सुचवावेसे वाटते.

शिवाय, तुकारामाच्याच काय पण गत शतकातील लोकहितवादी-सारख्यांच्या लिखाणात असे शब्द सर्रास आले आहेत. याचे आणखी एक कारण असेही असावे की, त्यावेळी असे वर्णन तितकेसे आक्षेपार्ह समजले जात नसावे. त्या काळाच्या भाषेस ते शब्द सहज पेलत असावेत.

तुकारामास आरोपीच ठरवावयाचे असेल तर मग ज्ञानेश्वर–मुक्तेश्वराचीही या आरोपातून मुक्तता होऊ शकत नाही! ज्ञानेशासारख्या बालकाने 'खरी टेको नेदी उडे। लाथौनि फोडी नाकाडे।' असे लिहिले किंवा मुक्तेश्वराने––

मद्यपाने झाकली दृष्टी,
शिश्न कवळुनि वाम मुष्टी,
भगिनीस म्हणे, हे गोरटी,
मज मैथुना मेळवी (विराट पर्व)

अशा तऱ्हेच्या ओव्या कीचकमुखी घातल्या. त्यातील अश्लीलतेचे समर्थन कोणत्याही तऱ्हेने होऊ शकत नाही. मुक्तेशज्ञानेशाच्या लिखाणापेक्षा तुकारामाच्या लिखणात ओज अन् तेज आहे; उलट वरील दोघांच्या उपरोक्त उक्तींत दृश्य समोर उभे राहत असल्यामुळे, त्यातील भाव कळल्यामुळे कल थोडा बीभत्स व उत्तानाकडे झुकणारा आहे. लोकहितवादी 'रांडवाजी'सारखे शब्द गतशतकाच्या मध्यात लिहू शकतात, त्याअर्थी भाषेतील अशा शब्दांच्या वापरासंबंधी तितकेसे आक्षेपार्ह त्यावेळी समजले जात नसावेच! शाहिरांच्या लावण्यांचा विचार येथे सोडून दिला तरी आधुनिक कवितेतील अशी कित्येक स्थळे आजही आक्षेपार्ह ठरविता येऊ शकतात आणि ते खपूही शकते!

तुकारामाच्या भाषेतील उपरोल्लिखित शब्दांवर आक्षेप घेताना वर्गविशिष्ट भाषेच्या कल्पनांतील फरकांची जाणीव ठेवायलाच हवी. महाराष्ट्राच्या काही भागांत 'बाया' किंवा 'बायका' म्हणणे स्त्रियांना अपमानाचे वाटते तर उलट काही भागांत 'लक्ष्मी' किंवा 'लक्षीम्या' म्हणणे स्त्रियांना मुळीच आवडत नाही. 'बाई' या शब्दाचा अर्थ काही भागात 'बाईल' असा घेऊन बायका भांडायला तयार होतात. पुणेरी भाषेत सर्रास शुद्ध म्हणून वापरला जाणारा साधा 'भोक' हा शब्द वऱ्हाड-

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वामित्व
अनुक्रम.......................... दि: ................
2092 निबंध
29679

भागात अगदीच घाणेरडा समजला जातो त्याऐवजी छेद, छिद्र किंवा छेद्र असा पर्यायवाची शब्द मुद्दाम वापरण्याची वऱ्हाडी लोक खास काळजी घेतात.

तेव्हा, तुकारामाची 'रांडापोरे' ही आज ज्यांच्या दृष्टिकोनातून आक्षेपार्ह ठरतात तशी ती वस्तुत: ठरावयास नकोत; असे हे प्रांजळ प्रतिपादन आहे !

" जनताजनार्दन "
दिवाळी अंक १९५७

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ...... वि: निबंध
...... २०१२ नों. क्र. २९५६९

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२०१२ निबंध
— समाप्त —
२९५६९
संग्र. शाखा (स्थल प्रत)

REFBK-0021681

# – आमची उपलब्ध प्रकाशने –

| | | |
|---|---|---|
| १. | काय गुन्हा केला ? (कादंबरी) : भाऊ मांडवकर | ४.०० |
| २. | विद्वान सोबती की कुशल गृहिणी ? (कादंबरी) गडकरी | ३.०० |
| ४. | माझी चाळीस पावंडं (कादंबरी) : भाऊ मांडवकर | ५.०० |
| ३. | वंचना (कादंबरी) : भाऊ मांडवकर | ३.५० |
| ५. | कानचिरी (कथा) : भाऊ मांडवकर | ३.०० |
| ६. | गळती कुचंबणा (शैक्षणिक लेख) : भाऊ मांडवकर | २.०० |
| ७. | कोलाम (प्रबंध) : भाऊ मांडवकर | २०.०० |
| ८. | दक्षिणदर्शन (प्रवासवर्णन) : भाऊ मांडवकर | ४.०० |
| ९. | आहुती (कविता) : पं. वि. हुलके | ३.५० |
| १०. | मराठीचे आद्यकवी मुकुंदराज (चरित्र) : साहित्यभूषण काटकर | १.०० |
| ११. | मृत्युंजय मार्कंडेय (चरित्र) : साहित्यभूषण काटकर | १.०० |
| १२. | शुद्ध कसे लिहावे ? : श्री. व सौ. मांडवकर | ०.५० |
| १३. | पानोळया (कविता) : भाऊ मांडवकर | २.५० |
| १४. | मुक्ती आणि इतर एकांकिका : गंगाधर महांवरे | २.५० |
| १५. | भंडारवाडी : बाजीराव पाटील | ३.०० |
| १६. | तुकारामाची 'रांडापोरे' (लेखसंग्रह) : भाऊ मांडवकर | ३.०० |

सेवा प्रकाशन, अमरावती–२.